सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | शनिवार, ३१ ऑगस्ट २०२४ | वर्ष दुसरे | अंक १५९ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com




# छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरणांवर डोकं ठेवून माफी मागतो-पंतप्रधान

## पंतप्रधान नरेंद्र मोदींनी शिवरायांचा पुतळा कोसळल्याप्रकरणी व्यक्त केला खेद

### ७६ हजार कोटी रुपयांच्या वाढवण बंदर प्रकल्पाचे भूमिपूजन
### पाच लाख रोजगाराच्या संधी निर्माण होण्याचा आशावाद
### मत्स्यव्यवसायसंबंधी पायाभूत सुविधा प्रकल्पांची पायाभरणी

पालघर : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ७६ हजार कोटी रुपयांच्या वाढवण बंदर प्रकल्पाचे सिडको ग्राउंड येथे भूमिपूजन करण्यात आले. वाढवण बंदर प्रकल्प हा जागतिक दर्जाचा प्रकल्प आहे. या वाढवण बंदर प्रकल्पाच्या माध्यमातून विकासाला चालना मिळण्यास मदत होणार आहे. वाढवण बंदर प्रकल्प हा पालघर जिल्ह्यातील डहाणू शहराजवळ आहे. यावेळी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार, केंद्रीय मंत्री सर्बानंद सोनोवाल हे देखील उपस्थित होते.

या बंदर प्रकल्पाच्या भूमिपूजनाच्या कार्यक्रमात बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मालवण येथील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्याप्रकरणी माफी मागितली. तसेच सुमारे १ हजार ५६० कोटी रूपयांच्या २१८ मत्स्यपालन प्रकल्पांचेही उद्घाटन आणि पायाभरणी करण्यात आली. या उपक्रमांमुळे मासेमारी क्षेत्रातील पायाभूत सुविधा आणि उत्पादकता वाढेल, तसेच पाच लाख रोजगार निर्माण होतील, असे सांगण्यात आले.



माझ्यासाठी आणि माझ्या सहकाऱ्यांसाठी छत्रपती शिवाजी महाराज फक्त एक नाव नाही, फक्त एक राजा नाही, तर शिवाजी महाराज आमच्यासाठी आराध्य दैवत आहेत. आमचे संस्कार वेगळे आहेत. मी आज महाराष्ट्रात आल्यावर सर्वात पहिले छत्रपती शिवाजी महाराजांची माफी मागण्याचे काम करत आहे. या घटनेमुळे ज्यांच्या भावना दुखावल्या आहेत, त्या शिवप्रेमींचीही मी माफी मागतो. माझे संस्कार वेगळे आहेत. आमच्यासाठी आमच्या आराध्य दैवताशिवाय काहीही मोठे नाही, असे पंतप्रधान मोदी यांनी सांगितले.

शिवरायांच्या चरणावर डोके ठेवून मी शिवराय आणि त्यांची पूजा करणाऱ्या शिवभक्तांची माफी मागतो. घडलेला प्रकार अत्यंत दुर्दैवी आणि वेदनादायी होता. पश्चाताप न होणाऱ्यांपैकी आम्ही नाही. काही जण सावरकर यांना नावे ठेवतात, त्यांनी माफी मागितली का? असा सवाल नरेंद्र मोदी यांनी केला.

### जिल्हा दूध संघाच्या अध्यक्षपदी गोकुळसिंह राजपूत बिनविरोध

# दूध संघाची टोलेजंग इमारत बांधाणार : पालकमंत्री सत्तार

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी

जिल्हा सहकारी दूध संघाचे संचालक गोकुळसिंग राजपूत यांची शुक्रवारी, ३० रोजी अध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली. पालकमंत्री अब्दुल सत्तार यांच्या हस्ते नवनिर्वाचित अध्यक्ष राजपूत यांचा सत्कार करण्यात आला. दूध संघाचे अध्यक्ष हरिभाऊ बागडे यांची राजस्थानच्या राज्यपालपदी नियुक्ती झाल्याने हे पद रिक्त झाले होते. दूध संघाच्या अध्यक्षपदाच्या निवडीसंदर्भात निवडणूक प्रक्रिया पार पडली. २००७ ते ०९ या काळातही राजपूत दूध सघाचे अध्यक्ष राहिलेले आहेत. यावेळी पत्रपरिषदेत पालकमंत्री अब्दुल सत्तार यांनी दूध संघाची जुनी इमारत पाडून नवीन टोलेजंग इमारत बांधणार असल्याचे सांगितले.

याप्रसंगी जिल्हा बँकेचे अध्यक्ष अर्जून गाढे, उपाध्यक्ष किरण डोनगावर, संचालक जगन्नाथ काळे, माजी सभापती किशोर बलांडे, सिल्लोड बाजार समितीचे सभापती केशवराव तायडे, संचालक नंदकिशोर सहारे यांच्यासह जिल्हा दूध संघाचे उपाध्यक्ष दिलीप निरपळ, संचालक नंदलाल काळे, कचरू डीके, राजेंद्र जैस्वाल, पुंडलिकराव काजे, श्रीरंग साळवे, संदीप बोरसे, शिलाबाई कोळगे, सुमित्राबाई चोपडे, अलका डोणगावकर, इंदूबाई सुरडकर, छत्रपती संभाजीनगर बाजार समितीचे सभापती राधाकिसन पठाडे, व्यवस्थापकीय संचालक सुरेश पहाडिया आदींची उपस्थिती होती.

भुकटी प्रकल्प उभारणार

दूध संघाची जुनी इमारत पाडून नवीन टोलेजंग इमारत उभारून एक आदर्श दूध संघ करणार आहे. जुन्या इमारतीला २० ते २२ वर्षे झाली आहेत. नवीन इमारतीसाठी तातडीने बैठक घेऊन नवीन इमारतीचाप्रस्ताव सादर केल्यास तत्काळ निधी मंजूर करून देण्याची नि:संदिग्ध ग्वाही मंत्री सत्तार यांनी दिली.

### राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या दौऱ्यानिमित्त अवकाश उड्डाणास बंदी!

पुणे : राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू या येत्या मंगळवारी, ३ सप्टेंबर रोजी पुणे दौऱ्यावर असणार आहेत. त्या पार्श्वभूमीवर सुरक्षा आणि कायदा सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी मंगळवारी सिम्बायोसिस विद्यापीठ लवळे परिसरातील शाळा बंद राहणार आहेत. तसेच सुरक्षेच्या पार्श्वभूमीवर पुण्यातील खासगी अवकाश उड्डाणांना बंदी घालण्यात आली असल्याची माहिती जिल्हाधिकारी सुहास दिवसे यांनी दिली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ३ सप्टेंबर रोजी पहाटेपासून रात्री बारा वाजेपर्यंत पुणे व पिंपरी-चिंचवड शहर तसेच ग्रामीण भागात पॅराग्लायडिंग, हॉट बलून सफारी, ड्रोन, मायक्रोलाइट एअरोप्लेन अशा खासगी अवकाश उड्डाणांना बंदी असणार आहे. तसेच या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तींवर भारतीय न्याय संहितेतील नियमानुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असेही जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशात नमूद करण्यात आले आहे.

## अरबी समुद्रात ४८वर्षांनंतर निर्माण झाले वादळ; गुजरातला धोका!

### हवामान विभागाकडून रेड अलर्ट जारी

अहमदाबाद : मुसळधार पाऊस आणि पुरानंतर आता गुजरातला असना चक्रीवादळाचा धोका निर्माण झालाय. तब्बल ४८ वर्षांनी अरबी समुद्रात निर्माण झालेले हे चक्रीवादळ ओमानच्या किनाऱ्याकडे सरकण्याची शक्यता आहे. हवामान विभागाने सौराष्ट्र आणि कच्छमध्ये रेड अलर्ट जारी केलाय. याठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता आहे.

हवामान तज्ज्ञांनी दिलेल्या माहितीनुसार, सागरी भागात पावसासोबतच ताशी ७० किमी वेगाने वारे वाहत आहेत. पुढील ३ दिवस येथे मुसळधार पावसाची शक्यता आहे. चक्रीवादळाचा धोका लक्षात घेता या भागातील लोकांना सतर्कतेचा आणि सागरी क्षेत्रापासून दूर राहण्याचा सल्ला देण्यात आला आहे. तर दुसरीकडे, मच्छिमारांना पुढील काही दिवस समुद्रात न जाण्याचा सल्ला देण्यात आला आहे. सौराष्ट्र आणि कच्छवर निर्माण झालेले कमी दाबाचे क्षेत्र पश्चिम-दक्षिणपश्चिम कडे सरकण्याची शक्यता आहे आणि कच्छ आणि लगतच्या पाकिस्तानी किनारपट्टीजवळील ईशान्य अरबी समुद्रात निर्माण होऊन शुक्रवारी चक्रीवादळात रुपांतर होण्याची शक्यता आहे. या वादळाला 'असना' असे नाव देण्यात आले आहे.

यंदा गुजरातमध्ये सौराष्ट्र आणि कच्छ प्रदेशात या वर्षी १ जून ते २९ ऑगस्ट दरम्यान ७९९ मिमी पाऊस पडला आहे, तर याच कालावधीत सरासरी ४३०.६ मिमी पाऊस झाला होता. या काळात सरासरीपेक्षा ८६ टक्के जास्त पाऊस झाला. मध्य आणि लगतच्या उत्तर बंगालच्या उपसागरावरील आणखी एक कमी दाबाचे क्षेत्र पश्चिम-वायव्य दिशेने सरकण्याची शक्यता आहे आणि शुक्रवारपर्यंत पश्चिम-मध्य आणि लगतच्या वायव्य बंगालच्या उपसागरावर अधिक चिन्हांकित होण्याची शक्यता आहे.



**छत्रपती संभाजीनगर महापालिकेच्या प्रियदर्शनी केंद्रीय प्राथमिक विद्यालय टर्फ मैदानाचे लोकार्पण आज होत आहे. सागर सोनार यांनी मैदानाचे टिपलेले हे अप्रतिम छायाचित्र.**

## एमजीएममध्ये विविध क्रीडा स्पर्धेतील विजेत्यांचा सन्मान

छत्रपती संभाजीनगर, दि.३० : महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या क्रीडा विभागाच्या वतीने राष्ट्रीय क्रीडा दिनाचे औचित्य साधून आंतर शालेय स्पर्धेचे एमजीएम स्पोर्ट्स क्लब अँड स्टेडियम येथे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेतर्गत रायफल शूटिंग, स्विमिंग आणि चेस या क्रीडा प्रकारांच्या स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. विद्यापीठाच्या आर्यभट्ट सभागृहात या स्पर्धेतील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते स्मृतिचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.



यावेळी, भारतीय क्रीडा प्राधिकरण छत्रपती संभाजीनगरचे सहायक संचालक सुमेध तरोडेकर कुलगुरू डॉ.विलास सपकाळ, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, अधिष्ठाता डॉ.जॉन चेल्लादुराई, संस्थेचे क्रीडा संचालक नितीन घोरपडे, विद्यापीठाचे क्रीडा प्रमुख प्रा.डॉ.दिनेश वंजारे, प्राध्यापक, विद्यार्थी व सर्व संबंधित उपस्थित होते.

या स्पर्धेसाठी रायफल शूटिंग प्रशिक्षक गीता मस्के, चेस प्रशिक्षक विलास राजपूत, स्विमिंग प्रशिक्षक धनंजय फडके यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या स्पर्धेच्या यशस्वितेसाठी डॉ. शशिकांत सिंग, जॉय थॉमस, डॉ. सदाशिव जव्हेरी, डॉ.श्रीनिवास मोतीयेळे, रहीम खान, सागर शेवाळे, अजय भोजने व सर्व संबंधितांनी प्रयत्न केले.

विविध स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांची नावे खालीलप्रमाणे आहेत.

शूटिंग स्पर्धा: शुटींग स्पर्धेत विविध वयोगटातील विविध स्पर्धांमध्ये एकूण ४३ पदकांचे यावेळी मान्यवरांच्या हस्ते वितरण करण्यात आले. यामध्ये २० सुवर्ण, १२ रौप्य आणि ११ कांस्य पदकांचा समावेश होता. प्रातिनिधिक स्वरूपात विजेत्यांची नावे खालीलप्रमाणे देण्यात आली आहेत.

**अंडर १४ : (पुरुष) –** १. प्रणव बैस : पोतदार शाळा, २. देवेंदर खरमाटे : संस्कार विद्यालय, ३. धैर्यशील जाधव : संस्कार विद्यालय, **अंडर १४ : (महिला)–** १. आर्या महाजन : स्टेट बँक ऑफिसर्स असोसिएशन पब्लिक स्कूल, २. अनू यादव : पोतदार इंटरनॅशनल स्कूल, ३. रविना यादव : पोतदार इंटरनॅशनल स्कूल, चेस स्पर्धा : चेस स्पर्धेत विविध वयोगटातील विविध स्पर्धांमध्ये एकूण ३६ पदकांचे यावेळी मान्यवरांच्या हस्ते वितरण करण्यात आले. प्रातिनिधिक स्वरूपात विजेत्यांची नावे खालीलप्रमाणे देण्यात आली आहेत. **अंडर १७ : (पुरूष)–** १. पुष्कराज कोडपे : एमजीएम स्कूल, २. श्रेयश लांडगे : पोतदार इंटरनॅशनल स्कूल, ३. व्यंकटेश पेन्सिलवर एमजीएम क्लोव्हरडेल स्कूल, **अंडर १७ : (महिला)–** १. आर्या लोंढे : स्टेट बँक ऑफिसर्स असोसिएशन पब्लिक स्कूल, २. सिया जांबूळकर : एमजीएम स्कूल, ३. सिद्धी दीक्षित : औरंगाबाद पोलिस पब्लिक स्कूल , स्विमिंग स्पर्धा : स्विमिंग स्पर्धेत विविध वयोगटातील विविध स्पर्धांमध्ये एकूण १२० पदकांचे यावेळी मान्यवरांच्या हस्ते वितरण करण्यात आले. प्रातिनिधिक स्वरूपात विजेत्यांची नावे खालीलप्रमाणे देण्यात आली आहेत. **अंडर १९ : ५० मीटर बॅक (पुरूष)–** १. राजविर रिंग पवार, २. ओम गाडेकर, ३. दिगंबर घुणसंगे, **अंडर १४ : १०० मीटर फ्री स्टाईल (महिला)–** १. संस्कृति सुराडकर, २. इशिता भावले, ३. सई गाडेकर.

## महाराष्ट्र पोलीस भरतीमध्ये गरुड झेपचे यश; २०० पोलिसांसह पालकांचा भव्य सत्कार सोहळा संपन्न

वाळूज महानगर (प्रतिनिधी) : गरुड झेप अकॅडमीच्या माध्यमातुन ग्रामीण भागातील कष्टकरी शेतकरी व अनाथ विद्यार्थ्यांसह हजारो विद्यार्थी या अकॅडमी मध्ये प्रशिक्षण घेत आहेत. नुकत्याच झालेल्या पोलीस भरती मध्ये गरुडझेपच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे त्या गुणवंत विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा आज भव्य सत्कार सोहळा गरुड झेप अकॅडमी च वतीने संपन्न झाला.



नुकत्याच झालेल्या १७ हजार पोलीस भरतीच्या जागेसाठी गरुड झेपच्या चारशे विद्यार्थ्यांनी परिक्षा दिली होती. त्यापैकी दोनशे पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी या परीक्षेत यश संपादन केले असुन महाराष्ट्रातील विविध जिल्हा पोलीस दलात हे विद्यार्थी रुजू झाले आहेत म्हणून बजाजनगर येथील साई गगन लॉन्समध्ये आज सकाळी ११ वाजेपासून दुपारी ४ वाजेपर्यंत हा भव्य दिव्य सत्कार सोहळा पार पडला. या सत्कार सोहळ्याप्रसंगी जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, सहा. पो. आयुक्त महेंद्र देशमुख आदींसह मान्यवर उपस्थित होते. यावेळी यशस्वी विद्यार्थ्यांसाठी लकी ड्रॉ द्वारे दुचाकी वाहन व इतर प्रोत्साहनपर बक्षीसे देण्यात आली.

यावेळी महाराष्ट्रात विविध ठिकाणी पोलीस दलात दाखल झालेल्या विद्यार्थ्यांनी गरुड झेप अकॅडमी बाबत कृतज्ञता व्यक्त करत प्रा. सुरेश सोनवणे व प्रा. निलेश सोनवणे यांचे आभार मानत आपल्या भावना व्यक्त केल्या. यावेळी भावना व्यक्त करताना अनेक पालक व विद्यार्थ्यांना आपले आनंदाश्रू आवरता आले नाही. या यशाचे श्रेय त्यांनी आई - वडील व त्यानंतर गरूड झेप कॅडमीचे असल्याचे सांगितले. गरुड झेप कॅडमीच्या माध्यमातून नुकत्याच पोलीस दलात दाखल झालेल्या एका पोलीसाने सांगितले की , माझ्याकडे फीस करण्यासाठी एक रुपयाही नव्हता त्यावेळी शिकत असतानाच गरुडझेप अकॅडमीने मला रोजगार उपलब्ध करून माझ्याकडून तयारी करून घेतली. अनेक वेळा मला आर्थिक मदत ही दिल्याचे सांगितले त्याचेच फळ म्हणजे मला पोलिस दलात नोकरी मिळाली.

### ९० मिनिटांत मेडलचा पाऊस, पॅरिस पॅराऑलिम्पिकमध्ये भारताने मिळवली तीन पदके

मुंबई: भारताच्या प्रीती पालने पॅराऑलिम्पिक २०२४मध्ये कांस्यपदक जिंकत इतिहास रचला आहे. तिने महिलांच्या १०० मीटर टी-३५ कॅटेगरी रेसमध्ये पदक जिंकले आहे. भारताचे हे या स्पर्धेतील तिसरे पदक आहे. प्रीतिने इतिहासही रचला आहे. कारण पॅराऑलिम्पिक स्पर्धेक ट्रॅक इव्हेंटमध्ये मेडल जिंकणारी प्रीती पहिली भारतीय खेळाडू ठरली आहे.

टी३५ कॅटेगरीच्या महिला १०० मीटर शर्यतीच्या फायनलमध्ये भारताच्या प्रीती पालने १४.२१ सेकंदात स्पर्धा पूर्ण करत तिसरे स्थान मिळवले. पहिले आणि दुसरे स्थान चीनच्या धावपटूंनी मिळवले. चीनच्या जिया(१३.३५ सेकंद) आणि गुओने (१३.७४ सेकंद)मध्ये पूर्ण करत रौप्य पदक मिळवले.

यावर्षी प्रीतीपालने कोबीमध्ये झालेल्या वर्ल्ड पॅरा ॲथलेटिक्स चॅम्पियनशिप २०२४मध्ये कांस्यपदक पटकावत पॅरिस पॅराऑलिम्पिकच्या फायनलमध्ये स्थान पक्के केले होते.

९० मिनिटांच्या आत तीन पदके

२९ ऑगस्टला भारताने पॅराऑलिम्पिकची जबरदस्त सुरूवात केली. मात्र पदकातालिकेत भारताले पहिले तीन पदके ३० ऑगस्टला मिळाली. प्रीतीच्या आधी नेमबाजीत अवनी लेखराने आणि मोना अग्रवालने अनुक्रमे सुवर्ण आणि कांस्यपदक जिंकले.

# जिल्ह्याच्या काही भागात ३ सप्टेंबरपर्यंत पावसाचा हवामान खात्याचा इशारा

### नागरिकांनी दक्षता घेण्याचे जिल्हा प्रशासनाचे आवाहन

अहमदनगर दि. ३०- जिल्ह्यात ३ सप्टेंबर २०२४ पर्यंत वीजांच्या कडकडाटासह वादळी वारा व हलक्या ते मध्यम स्वरुपाचा पाऊस होण्याची शक्यता भारतीय हवामान खात्याने वर्तवली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील नागरिकांनी दक्षता घेण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनामार्फत करण्यात आले आहे.

मेघगर्जनेच्या वेळी वीज चमकत असताना किंवा वादळीवारे वाहत असतांना झाडाखाली किंवा झाडांजवळ उभे राहू नये. वीजेपासून बचावासाठी सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा. धोकादायक ठिकाणी सेल्फी काढू नये. गडगडाटीच्या वादळादरम्यान व वीजा चमकतांना कोणत्याही विद्युत उपकरणांचा वापर करू नये. वीजेच्या सुवाहक भागांशी संपर्क टाळावा, ट्रॅक्टर्स, शेतीची अवजारे, मोटारसायकल, सायकल यांच्यापासून दूर रहावे.

मोकळे मैदान, झाडाखाली, टॉवर्स, ध्वजांचे खांब, विद्युत, दिव्यांचे खांब, धातुचे कुंपण, विद्युतवाहिनी अथवा ट्रान्सफार्मवर जवळ थांबू नये. सर्व प्रकारच्या अधांतरी लटकणाऱ्या, लांबणाऱ्या केबल्सपासून दूर रहावे. जाहिरात फलक (होर्डिंग्ज) कोसळून होणाऱ्या दूर्घटना टाळण्यासाठी दक्षतेची बाब म्हणून जाहिरात फलकांच्या (होर्डिंग्ज) आजूबाजूला थांबू नये व योग्य ती दक्षता घ्यावी.

वीजा चमकत असताना मोकळ्या जागेवर असल्यास सुरक्षेसाठी गुडघ्यावर बसून हाताने आपले कान झाकावे व आपले डोके दोन्ही गुडघ्यांच्यामध्ये झाकावे, जमीनीशी कमीतकमी संपर्क असावा. स्थानिक प्रशासनाद्वारे दिलेल्या सूचनांचे पालन करावे. सखल भागात राहणाऱ्या नागरिकांनी तातडीने सुरक्षितस्थळी स्थलांतर करावे. नदी, ओढे व नाल्याकाठच्या नागरिकांनी दक्ष रहावे, पाणीपातळीत वाढ होत असल्यास नागरिकांनी नदीपात्रातुन तसेच ओढे व नाले यापासून दूर रहावे व सुरक्षित स्थळी स्थलांतर करावे. नदी अथवा ओढे, नाल्यांवरील पुलावरुन पाणी वाहत असल्यास पुल ओलांडू नये. पूर पाहण्यासाठी गर्दी करू नये.

अतिवृष्टीमुळे भूस्खलन होण्याची व दरडी कोसळण्याची शक्यता असते. त्यादृष्टीने डोंगराच्या पायथ्याशी राहणाऱ्या लोकांनी दक्षता घ्यावी. वेळीच सुरक्षितस्थळी स्थलांतर करावे.



## मालवण घटनेच्या निषेधार्थ काँग्रेसचे धरणे आंदोलन

कन्नड :- दि.३१ ऑगस्ट - मालवण येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे नित्कृष्ट काम करणाऱ्या ठेकेदारांसह शासकीय अधिकारी, शासकीय अभियंते यांच्यावर गुन्हे दाखल करुन, राज्यातील शिंदे सरकारणे राजीनामा द्यावा, अशी मागणी करत, अखिल भारतीय काँग्रेस पक्षाच्या वतीने कन्नड शहरातील पिशोर नाका येथे अखिल भारतीय काँग्रेस पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस तथा माजी आमदार नामदेवराव पवार यांच्या नेतृत्वाखाली धरणे आंदोलन करण्यात आले. कन्नड शहर पोलिस स्टेशन पोलिस निरीक्षक बाळासाहेब भापकर आणि तलाठी दिपक एरंडे यांना निवेदन देण्यात आले. या प्रसंगी गणेश शिंदे, असद पठाण, विक्रम चव्हाण, याकूबभाई, मोगल वाघ, भास्करराव दांडगे, संतोष चव्हाण, आसीफ कुरेशी, मुजाहेद अली, नरेंद्र वैद्य, कारभारी केकान, धनंजय पिंपळे, प्रदिप दिवेकर, गोविंद शाहूराजे, पंजाबराव शेळके, जगन्नाथ जाधव, बाळासाहेब नागोडे, भास्कर इधे, अण्णासाहेब साबळे, जगन पवार, संतोष नरोडे, काकासाहेब जंजाळ आणि ऋषकेश आव्हाळे यांची उपस्थिती होती.या वेळी कन्नड शहर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक बाळासाहेब भापकर यांनी आपल्या सहकाऱ्यांसह चोख बंदोबस्त ठेवला होता.

## सोयगावात श्री संत सेना महाराज पुण्यतिथी साजरी



सोयगाव,दि.३० ऑगस्ट - नाभिक समाजाचे आराध्य दैवत श्री.संत सेना महाराज यांची ३८९ वी पुण्यतिथी सोहळा सोयगाव शहरातील आर्शिवाद जेन्टस् पार्लर येथे श्री संत सेना महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून पुण्यतिथी साजरी करण्यात आली.यावेळी नाभिक समाजाचे जेष्ठ नागरिक विनायक आप्पा राऊत,बळीराम सोनवणे,सुधाकर पंडित,आप्पा पंडित,दत्तू वाघ,राजू एलीस,दत्तू एलीस,रामा एलीस,यांच्या हस्ते पूजन करण्यात आले.व शहरातील माजी नगराध्यक्ष कैलास काळे,सुनील गव्हाडे,ड.योगेश पाटील,नगरसेवक राजेंद्र दुत्तोंडे,माजी नगरसेवक संजय मोरे,पत्रकार सुनील काळे,विजय पगारे,योगेश बोखारे,समाजसेवक दत्तू रोकडे,गोकुळ परदेशी,संदीप सोहणी,समाजसेवक अरुण सोहणी,अमोल निकम,सतीश मंडवे,भागवत मस्के,अजित काळे,आदींसह मोठ्या संख्येने समाज बांधव व मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सोयगाव शहर नाभिक समाजाचे भगवान पंडित,बापू पंडित,ललित पंडित,देवेंद्र पंडित,नितीन सोनवणे,सागर पंडित,सुनील वाघ, सोनू पंडित,सागर नेरपगारे,पप्पू नेरपगारे,जगदीश एलीस, ईश्वर सैदाणे,अजय नेरपगारे,आनंदा पंडित,गोलू पंडित,बंटी एलीस,अनिस पठाण,सोनू मोरे,संतोष शिंदे यांसह सर्व नाभिक बांधवांनी परिश्रम घेतले.

## नवीन टी३ प्रो ५जी लाँच

नवी दिल्ली - विवो या नाविन्यपूर्ण जागतिक स्मार्टफोन ब्रँडने आज वीवो टी३ प्रो ५जी सह त्याच्या टी३ मालिकेतील नवीनतम जोडणीची घोषणा केली. मालिका ढ सारख्याच टर्बो-चार्ज केलेल्या कामगिरीसह, टी३ प्रो ५जी स्नॅपड्रॅगन ७ जेन ३ चिपसेटद्वारे समर्थित आहे आणि सर्वोत्कृष्ट ५,५००एमएएच बॅटरीद्वारे समर्थित आहे, वापरकर्त्यांना हे सर्व स्लिम प्रोफाइलमध्ये मिळते . वीवो टी३ प्रो ५जी दोन आकर्षक रंगांमध्ये उपलब्ध आहे - सँडस्टोन ऑरेंज आणि एमराल्ड ग्रीन - ८जीबी + १२८जीबी व्हेरियंटसाठी २४,९९९ रुपये (सर्व करांसह) आणि ८जीबी + २५६जीबी व्हेरियंटसाठी रुपये २६,९९९ (सर्व करांसह) किंमत. हा स्मार्टफोन फ्लिपकार्ट, विवो इंडिया ई-स्टोअर आणि सर्व भागीदार रिटेल स्टोअरवर ३ सप्टेंबर, दुपारी १२ वाजेपासून विक्रीसाठी उपलब्ध असेल. ग्राहक खालील ऑफर देखील घेऊ शकतात.

## डॉक्टरांनी वाचवला लहान मुलीचा जीव

पुणे- १वर्ष ९ महिने वयाच्या लहानग्या अनुश्रीला खराडी येथील मणिपाल हॉस्पिटल मध्ये आपात्कालीन स्थितीत दाखल करण्यात आले होते, ती घरी खेळत असतांना दुसर्या मजल्यावरुन पडली, परिणामी तिच्या डोक्याला जबर मार लागून फेमर इन्ज्युअरी मुळे तिची शुध्द हरपली होती. तिला ज्यावेळी भरती करण्यात आले त्यावेळी तिला अनेक समस्यांनी ग्रासले होते, यामध्ये आकडी येणे, चक्कर येणे आणि असमान वागणे यांसारखी लक्षणे दिसत होती, यातून हे स्पष्ट झाले की तिच्या मेंदूला जबर मार लागला होता आणि अंतर्गत रक्तस्त्रावही होत होता.

# तहसिल कार्यालयावर विविध मागण्यांसाठी मोर्चा

## आदिवासींना वनहक्क कायद्यातून विस्थापित करण्याचा शासनाचा डाव

तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.३१ ऑगस्ट -तहसिल कार्यालयावर सत्यशोधक ग्रामीण कष्टकरी सभेचा दि.३० रोजी धडक मोर्चा काढण्यात आला होता,

आदिवासींचे हक्क संपविणारे वनविधेयक २०२३ तात्काळ रद्द करा, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या आश्वासनाची पूर्तता करा, अनुसूचित जाती जमाती यांच्या विरोधातील सुप्रीम कोर्टाचा क्रिमिलेयरचा निर्णय रद्द करा. मौजे पेडकवाडी येथील मयत रावजी मेंगाळ यांच्यावर वनविभागाकडून झालेल्या अन्याय अत्याचाराची चौकशी करुन संबंधिताला नुकसान भरपाई द्यावी या व इतर.मागण्यांसंदर्भात कन्नड तहसील कार्यालयावर



धडक मोर्चा काढण्यात आला होता

कन्नड शहरातील छत्रपती संभाजी राजे क्रिडा संकुल येथून हातात आपल्या वेगवेगळ्या मागण्यांचे फलक घेऊन निघालेला हा मोर्चा शिस्तबध्द पध्दतीने चालत तहसील कार्यालयावर धडकला. रस्त्याने या मोर्चातील शिस्टमंडळाने क्रांतीसुर्य महात्मा फुले,डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण केला. तहसिलदार विद्याचरण कडवकर, पोलिस निरीक्षक बाळासाहेब भापकर यांनी निवेदन स्विकारून आपल्या मागण्या शासनापर्यंत पोहचविण्याचे आश्वासन दिले.

या मोर्चात किशोर ढमाले, रावजी पथवे, आम आदमी पक्षाचे जिल्हाध्यक्ष सुभाष निकम पाटील, तालुकाध्यक्ष विनायक अकोलकर, शहराध्यक्ष रईस पवार, अतुल निकम पाटील, ऋग्वेद पाटील, इंजी.मिलिंद पाटील, विजय ढोणे,दिनकर दाभाडे,रतन मधे, बाबू मेंगाळ, शेषराव पथवे, बुधा गावंडे, बुधाबई पोकळे, नाथाबाई भुतांबरे, सुरेश मोरे, रतन सोनवणे, गंगुबाई गावंडे, सोमाबाई गावंडे, मल्हाबाई झिपा मधे यांच्यासह कन्नड तालुक्यातील आणि धुळे जिल्ह्यातील आदिवासी समाज बांधव, महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या.

या प्रसंगी कुठलाही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलिस प्रशासनाने चोख बंदोबस्त ठेवला होता.

## सोयगांव तालुक्यातील २४० पात्र दिव्यांगांना अब्दुल सत्तार यांच्याहस्ते साहित्याचे वाटप

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.३० ऑगस्ट

भारत सरकारच्या सामाजिक न्याय विभागाद्वारे मागील वर्षी दिव्यांगांची तपासणी करण्यात आली होती.तपासणी मध्ये सोयगांव तालुक्यातील २४० दिव्यांग पात्र ठरले.भारत सरकार अंगीकृत अलिम्को संस्थेद्वारे २४० पात्र लाभार्थ्यांना ६ जणांना बॅटरीवर चालणारी सायकल,६८ जणांना तीन चाकी सायकल,३९ जणांना व्हीलचेअर,८० जणांना श्रावण यंत्र,तर ४७ जणांना वॉकिंग स्टिक साहित्य वाटप पालकमंत्री ना.अब्दुल सत्तार यांच्या हस्ते



वाटप करण्यात आले. याप्रसंगी सोयगाव गटविकास अधिकारी दादाराव आहिरे,शिवसेना तालुकाप्रमुख प्रभाकर (आबा) काळे,कृ.बाजार समितीचे उपसभापती दारासिंग चव्हाण, शहरप्रमुख तथा नगरसेवक संतोष बोडखे,माजी उपसभापती धरमसिंग चव्हाण,गटनेते अक्षय काळे,कदीर शहा,राजू दुतोंडे,नगरसेवक संदीप सुरडकर,सरपंच गजानन ढगे,युवा नेते कुणाल राजपूत,हर्षल काळे,सलीम पठाण,सुरेश चव्हाण,शेख बबलू, राधेश्याम जाधव,राजू रेकनोद,विनोद राठोड,हिरा चव्हाण,श्रीराम चौधरी, समाधान तायडे,सांडू तडवी,वसंत बनकर,रमेश गव्हांडे,दिलीप देसाई,सांडू राठोड,नारायण राठोड, श्रवण जाधव,आदींसह लाभार्थ्यांची उपस्थिती होती.

## अंकुश भराड पाटील यांची वैजापूरला व पवन परदेशी कन्नड स्वच्छता निरीक्षकपदी नियुक्ती

खुलताबाद प्रतिनिधी. खुलताबाद नगरपरिषद येथे प्रथम नियुक्ती अपंग अनुशेष शिपाई दि.१.१०.२००७ रोजी. शासकीय नियमाप्रमाणे नियुक्ती. त्यांनतर शैक्षणिक पात्रता पुर्ण करुन छत्रपती संभाजी नगर .जिल्हाधिकारी यांच्या मान्यतेने दि.२२.१२ २०१८ रोजी लिपिक -टंकलेखन या पदावर पदोन्नती झाली.



आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन विभाग, संचालनालय मुंबई यांच्या आदेशान्वये दि.२१.८.२०२४ रोजी राज्य संवर्ग स्वच्छता निरीक्षक गट -क, श्रेणी -क मध्ये राज्य शासकीय सेवेत पदस्थापना होऊन खुलताबाद नगरपरिषद येथून वैजापूर नगरपरिषद येथे दि.२२.८.२०२४रोजी रुजू झाले. या प्रसंगी मुख्य अधिकारी विक्रम दराडे कार्यालयीन अधीक्षक जितेंद्र बोचरे पाणीपुरवठा इंजिनियर श्रीहरी चुडेकर . सहाय्यक प्रकल्प अधिकारी संजू सोंडवले. मनीषा लघाने . गणेश पवार अशोक भंडारी आप्पाराव देवकर सुखदेव घुसाळे सतीश भाऊ. संतोष आव्हाड भानुदास सोनवणे. शुभम देवकर सतीश भालेराव भगवान खंडागळे नितीन गोल्हार राहुल कांबळे खास पटेल यांच्या सर्व कर्मचारी उपस्थित होते

## स.भु.बिडकीन येथे तालुकास्तरीय योगासन स्पर्धा संपन्न

बिडकीन - पैठण तालुक्यातील श्री सरस्वती भुवन प्रशाला बिडकीन येथे क्रीडा व युवक सेवा संचालनालय पुणे, जिल्हा क्रीडा अधिकारी व तालुका क्रीडा अधिकारी पैठण यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तालुकास्तरीय योगासन स्पर्धा मोठ्या उत्साहात संपन्न झाल्या. या स्पर्धेचे उद्घाटन तालुका क्रीडा अधिकारी गीता साखरे यांच्या हस्ते तर मुख्याध्यापक धर्मेंद्र येवले तालुका क्रीडा संयोजक सोमनाथ टाक,



लक्ष्मण सपकाळ, उपमुख्याध्यापक युवराज पाडळे पर्यवेक्षिका मनिषा मिश्रा यांच्या उपस्थितीत संपन्न झाले. सर्वप्रथम मेजर ध्यानचंद व कुस्तीपटू खाशाबा जाधव यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या ऑलिम्पिक अल्बमचे विमोचन प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी क्रीड अधिकारी यांनी योगासनामुळे मन व शरीर यांचा संबंध येऊन शरीर व मन सदृढ होण्यास मदत होते, त्यामुळे विद्यार्थ्यांनी नियमित योगासने व प्राणायाम करावे , ज्यामुळे बुद्धी व स्मरणशक्ती तल्लख होते असे सांगितले.तालुका क्रीडा अधिकारी गीता साखरे यांनी विद्यार्थ्यांना खेळामुळे संकटांना सामोरे जाण्याची शक्ती वाढते त्यामुळे नियमित खेळत जा असे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शेख मोहम्मद आसिफ यांनी तर आभारप्रदर्शन राहुल शिंदे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अनुराधा मिरजकर सह सर्व शिक्षक शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनी प्रयत्न केले

## बिडकीन ग्रामपंचायत येथे ग्रामसभा संपन्न

बिडकीन दि. ३० ऑगस्ट - पैठण तालुक्यातील बिडकीन येथे ग्रामपंचायत कार्यालय येथे आज दि .२९ रोजी सकाळी दहा वाजता ग्रामपंचायत सरपंच अशोक धर्मे यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामसभाचे आयोजन करण्यात आले होते या ग्रामसभेत नागरिकांना मोठा प्रतिसाद दिला आहे, या सभा मध्ये - मागील सभा वृत्तात वाचून त्यास मान्यता देणे बाबत,बेटी बचाव बेटी पडाव अंतर्गत बालविवाह निर्मूलन कार्यक्रम राबिवणे,सन २०२३ व २०२४ अंतर्गत ड्रेनेज लाईन काम करणे बाबत, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना आढाव घेणे बाबत, विविध योजनेअंतर्गत घरकुल योजना राबवणे, पंतप्रधान आवास योजना लाभार्थी रजिस्ट्रेशन शंभर टक्के करणे बाबत , मुख्यमंत्री व प्रशिक्षण आढाव घेणे बाबत, महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना गाय गोठा विहीर रस्ते कामे पूर्ण करणे बाबत, प्रकाश नगर येथील सांडपाणी व्यवस्था करणे बाबत,१५ वित्त आयोग कामे पूर्ण करण्याबाबत, महाराष्ट्र राज्य सरकार व केंद्र शासनाच्या विविध योजना विषयी नागरिकांना माहिती देण्यात आली,बिडकीन गावातील समस्या तसेच विविध विकास कामाबाबत ग्रामसभा मध्ये चर्चा करण्यात आली यावेळी सरपंच अशोक धर्मे, ग्रामसेवक अरुण गोर्डे, पोलीस उपनिरीक्षक अशोक माने, जमादार संदीप धनेधर, ग्रामपंचायत सदस्य रमेश शिंदे,किरण गुजर, मधुकर सोकटकर,अमोल कोथिंबीरे, अविनाश राठोड, मिनाजोद्दीन ईनामदार, राहुल ठाणगे,सागर फरताळे,मोहन हिवाळे, ज्ञानेश्वर कांबळे,महेमुद शहा, अंकुश धर्मे, आदी सदस्य,पत्रकार, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## गंगापुरात श्रीकृष्ण जन्माष्टमी उत्सव साजरा

### पंधरा ते वीस हजार भाविकांनी घेतला कार्यक्रमाचा लाभ



गंगापूर दि.२९: गंगापूर शहरात गेल्या आठ दिवसापासून विठ्ठल आश्रमात सुरू असलेल्या श्रीकृष्ण जन्माष्टमी महोत्सव व त्रिशताब्दी महोत्सव उत्सवात साजरा करण्यात आला. विठ्ठल आश्रमात दिनांक २० पासून सुरू झालेल्या जन्माष्टमी महोत्सवाच्या निमित्ताने विविध कार्यक्रम झाले. यात दररोज काकडा आरती ज्ञानेश्वरी पारायण प्रवचन कीर्तन रोज भक्तांना विठ्ठल आश्रम परिवाराकडून प्रसादाची व्यवस्था करण्यात आली होती दिनांक २६ ला रात्री दहा ते बारा या वेळेत कीर्तनाच्या कार्यक्रमा नंतर श्रीकृष्णाचा जन्माष्टमी सोहळा संपन्न झाला.

दिनांक २७ ला विठ्ठल आश्रम संस्थानचे प्रमुख महाराष्ट्राचे प्रसिद्ध गाथा मूर्ती हरिभक्त परायण रामभाऊ राऊत महाराज यांचे काल्याचे किर्तन संपन्न झाले. तद नंतर भाविकांना महाप्रसाद देण्यात आला. या कार्यक्रमासाठी विविध राजकीय क्षेत्रातील नेत्यांनी व श्रीक्षेत्र पंढरपूर आळंदी पुणे अहमदनगर नेवासा शेवगाव पाथर्डी वैजापूर गंगापूर कन्नड सिल्लोड फुलंब्री धुळे जळगाव आदी गावातील भक्तगण आले होते सुमारे पंधरा ते वीस हजार भाविकांनी या धार्मिक सोहळ्याचा आनंद लुटला दिनांक २० रोजी उभारण्यात आलेला ध्वज दिनांक २७ सायंकाळी सहा वाजता सन्मानाने उतरवण्यात आला व या कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## अवजड व्यावसायिक वाहनांसाठी मॉड्युलर स्वॅपिंग तंत्रज्ञान

छत्रपती संभाजीनगर : सन मोबिलिटी, इलेक्ट्रिक वाहनांना ऊर्जा पायाभूत सुविधा आणि सेवा प्रदान करणारी आघाडीची कंपनी, ने आज हेवी इलेक्ट्रिक वाहनांसाठी जगातील पहिले मॉड्यूलर बॅटरी स्वॅपिंग तंत्रज्ञान सादर करून इतिहास रचला आहे. बस अँड कार ऑपरेटर्स कॉन्फेडरेशन ऑफ इंडिया (बीओसीआय)द्वारे आयोजित, प्रवास ४.० या आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये, कंपनीने बंगळुरूस्थित आघाडीच्या बस उत्पादक वीरा व्हेइकल्सच्या भागीदारीत आंतरशहर आणि ग्रामीण मार्गांसाठी भारतातील पहिल्या १०.५ मीटर बॅटरी स्वॅप करण्यायोग्य बसेस सादर केल्या. वीरा वाहनाच्या सर्व वाहनांमध्ये हे तंत्रज्ञान काम करेल.

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश, क- स्तर सोयगाव यांचे न्यायालय जि. औरंगाबाद. दिवाणी**

कि. अर्ज क्र.८९/२०२४ नि.

अर्जदारः- १) धोंडाबाई शंकर बोरसने वय-७० वर्ष धंदा-घरकाम रा.कवली, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद. २) पुनमचंद शंकर बोरसने वय-४५ वर्ष धंदा- शेती रा. वरीलप्रमाणे

-: विरुध्द :-

गैरअर्जदार :-

कोणीही नाही

प्रकरणः-

वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड.एस.पी. सुर्यवंशी, सोयगाव, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. अर्जदार क्र. १ चे पती व अर्जदार क्र.२ यांचे वडील कै. शंकर चुडामण बोरसने यांचा दिनांक ०७/०४/२०२१ रोजी वृद्धपकाळाणे मौजे कवली, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद येथे राहत्या घरी मृत्यु झालेला असून त्याच्या पश्चात वरील अर्जदार क्र. १ व २ हे वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात वकीलामार्फत दाखल आहे. अर्जदार क्र. १ व २ हे मयत कै. शंकर चुडामण बोरसने यांचे एकमेव वारस असून त्यांना शासकीय व निमशासकीय लाभासाठी वारस प्रमाण पत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदार क्र. १ व २ यांना वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदार क्र. १ व २ यांना कायदेशीररित्या योग्य ते वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

पुढील तारीख १९/०९/२०२४. आज दि.१४/०८/२०२४ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

आदेशावरुन,

क. लिपीक सहाय्यक अधिक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव.)

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश, क- स्तर सोयगाव यांचे न्यायालय जि. औरंगाबाद. दिवाणी**

कि. अर्ज क्र.९७/२०२४

अर्जदारः १) सुनिताबाई बंडू बिराडी, वय-३८वर्ष धंदा-घरकाम २) मयूर बंडू बिराडी, वय-२०वर्ष धंदा-शेती ३) निकिता बंडू बिराडी (माळी), वय-१८ वर्ष धंदा-शिक्षण सर्व रा. निंभोरा ता. सोयगाव, जि. औरंगाबाद

-: विरुध्द :-

गैरअर्जदार : कोणीही नाही

प्रकरणः वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड.एस.पी. सुर्यवंशी, सोयगाव, ता.सोयगाव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. अर्जदार क्र. १ चे पती व अर्जदार क्र.२ व ३ यांचे वडील कै. बंडू चिंधा बिराडी यांचा दिनांक ३१/०७/२०२० रोजी वृद्धपकाळाणे मौजे निंभोरा, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद येथे राहत्या घरी मृत्यु झालेला असून त्याच्या पश्चात वरील अर्जदार क्र. १ ते ३ हे वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात वकीलामार्फत दाखल आहे. अर्जदार क्र. १ ते ३ हे मयत कै. बंडू चिंधा बिराडी यांचे एकमेव वारस असून त्यांना शासकीय व निमशासकीय लाभासाठी वारस प्रमाण पत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदार क्र. १ ते ३ यांना वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या. कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदार क्र. १ ते ३ यांना कायदेशीररित्या योग्य ते वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

पुढील तारीख २६/०९/२०२४. आज दि. २४/०८/२०२४ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

विभागीय लिपीक दिवाणी न्यायालय क स्तर सोयगांव

आदेशावरुन,

क. लिपीक सहाय्यक अधिक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव.)

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश, क स्तर सोयगाव यांचे न्यायालय जि. औरंगाबाद.**

दिवाणी कि.अर्ज क्र. ८६ / २०२४ भिकन शंकर मंडवे, वय-४३ वर्ष धंदा-शेती रा.गलवाडा (अ.), ता. सोयगाव, जि. औरंगाबाद अर्जदारः-

-: विरुध्द :-

गैरअर्जदार : कोणीही नाही

प्रकरणः- वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणादवारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड.एस.पी. सुर्यवंशी, सोयगाव, ता.सोयगाव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. कै. शंकर भगवान मंडवे यांचा दिनांक ११/१०/२०१५ रोजी वृद्धपकाळाणे मौजे गलवाडा (अ.), ता. सोयगाव, जि. औरंगाबाद येथे राहत्या घरी मृत्यु झालेला आहे. तसेच अर्जदार यांची आई कै. अहिल्याबाई शंकर मंडवे यांचा देखील दिनांक २१/०८/२०२३ रोजी मौजे गलवाडा (अ.), ता. सोयगाव, जि. औरंगाबाद येथे राहत्या घरी मृत्यु झालेला आहे. त्यामुळे कै. शंकर भगवान मंडवे व कै. अहिल्याबाई शंकर मंडवे यांना वरील अर्जदार हे वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात वकीलामार्फत दाखल आहे. अर्जदार हे मयत कै. शंकर भगवान मंडवे व कै. अहिल्याबाई शंकर मंडवे यांचे एकमेव वारस असून त्यांना शासकीय व निमशासकीय लाभासाठी वारस प्रमाण पत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदार यांना वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

पुढील तारीख १९/०९/२०२४. आज दि. २४/०८/२०२४ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

आदेशावरुन,

क. लिपीक सहाय्यक अधिक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव.)

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश, क स्तर सोयगाव यांचे न्यायालय जि. औरंगाबाद. दिवाणी**

कि. अर्ज क्र.९६/२०२४

अर्जदारः १) कुसुम रामजी पाटील, वय-८४ वर्ष धंदा-घरकाम २) हरीश रामजी पाटील, वय-५१ वर्ष धंदा-नोकरी सर्व रा.घोसला, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद

-: विरुध्द :-

गैरअर्जदार : कोणीही नाही

प्रकरण: वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड.एस.पी. सुर्यवंशी, सोयगाव, ता.सोयगाव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. अर्जदार क्र. १ चे पती व अर्जदार क्र.२ यांचे वडील कै. रामजी मोतीराम पाटील यांचा दिनांक २०/०५/२०२४ रोजी वृद्धपकाळाणे मौजे पाचोरा ता.पाचोरा जि. जळगाव येथे मृत्यु झालेला असून त्याच्या पश्चात वरील अर्जदार क्र. १ व २ हे वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात वकीलामार्फत दाखल आहे. अर्जदार क्र. १ व २ हे मयत कै. रामजी मोतीराम पाटील यांचे एकमेव वारस असून त्यांना शासकीय व निमशासकीय लाभासाठी वारस प्रमाण पत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदार क्र. १ व २ यांना वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदार क्र. १ व २ यांना कायदेशीररित्या योग्य ते वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

पुढील तारीख २५/०९/२०२४. आज दि. २४/०८/२०२४ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

आदेशावरुन,

क. लिपीक सहाय्यक अधिक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव.)

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद**

पु. ता. १०/१०/२०२४

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं.. १०८/२०२४

१/- मनीषा लक्ष्मन करणकाळ, वय ४९ वर्ष, धंदा घरकाम, रा. पोहरी बु ता, सोयगाव, जि.छ. संभाजीनगर.

२/- दिपाली लक्ष्मन करणकाळ, वय २४. वर्ष, धंदा व रा. वरीलप्रमाणे.

३/- निकिता लक्ष्मन करणकाळ, वय १९ वर्ष, धंदा शिक्षण रा. वरीलप्रमाणे. ४/- पृथ्वीराज लक्ष्मन करणकाळ, वय १९ वर्ष, धंदा शिक्षण रा. वरीलप्रमाणे.

विरुद्ध

निल

प्रकरण :- वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. राजेश अ. गिरी, सोयगांव, ता. सोयगांव, जि. संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत लक्ष्मन जालम करणकाळ यांचा दिनांक १५/११/२०२३ रोजी मौजे पोहरी बु ता, सोयगाव, जि.छ. संभाजीनगर येथे मृत्यु झालेला असुन त्यांच्या पश्यात वरील अर्जदार क्रं. १ ते ४ हे वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्रं. १ ते ५ हे मयत लक्ष्मन जालम करणकाळ यांचे वारस असुन त्यांना शासकिय/निमशासकिय कामासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल

आजरोजी दिनांक २९/४/२०२४ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

आदेशावरुन,

क. लिपीक सहाय्यक अधिक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव.)

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद**

पु.ता.२४/१०/२४

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं.. ११०१२४

१/-कमलबाई नारायण सूर्यवंशी वय ५६ वर्ष, धंदा. घरकाम, रा. शिंडोळ, ता. सोयगाव, जि. छ. संभाजीनगर, २/- नरेश नारायण सूर्यवंशी वय ५६ वर्ष, धंदा. शेती, रा. वरीलप्रमाणे. ३/- भूषण नारायण सूर्यवंशी वय ५६ वर्ष, धंदा. शेती, रा. वरीलप्रमाण.

विरुद्ध

निल

प्रकरण :- वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र

मिळणेसाठी ॲड. राजेश अ. गिरी, सोयगांव, ता. सोयगांव, जि. संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज

दाखल केलेला आहे. मयत नारायण सोमाजी सूर्यवंशींयांचा दिनांक ०१/०९/२०२२ रोजी मौजे शिंडोळ ता,

सोयगाव, जि.छ. संभाजीनगर येथे मृत्यु झालेला असुन त्यांच्या पश्यात वरील अर्जदार क्रं. १ ते ३ हे वारस आहे,

असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्रं. १ ते ३ हे मयत लक्ष्मन जालम करणकाळ यांचे

वारस असुन त्यांना शासकिय/ निमशासकिय कामासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल

आजरोजी दिनांक १९/८/२०२४ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

आदेशावरुन,

क. लिपीक सहाय्यक अधिक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव.)

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद**

पु.ला ११/१०/२०२४

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं.. १०७/२४

१/-बिस्मिल्ला बी चांद शेख वय ५० वर्ष, धंदा. घरकाम, रा. गोंदेगाव, ता. सोयगाव, जि. छ. संभाजीनगर, २/- शेख अबुजर चांद, वय २५ वर्ष, धंदा. मजुरी, रा. वरीलप्रमाणे. ३/- शेख यास्मिन शेख चांद, वय २२ वर्ष, धंदा. घरकाम, रा. वरीलप्रमाणे.

विरुद्ध

निल

प्रकरण :- वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. राजेश अ. गिरी, सोयगांव, ता. सोयगांव, जि. संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत शेख चांद शेख गौस यांचा दिनांक २७/०६/२०२४ रोजी मौजे विघ्नहर्ता हॉस्पिटल पाचोरा, ता. पाचोरा, जि. जळगाव. येथे मृत्यु झालेला असुन त्यांच्या पश्यात वरील अर्जदार क्रं. १ ते ३ हे वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्रं. १ ते ३ हे मयत शेख चांद शेख गौस यांचे वारस असुन त्यांना शासकिय/निमशासकिय कामासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल

आजरोजी दिनांक २९/८/२०२४ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

आदेशावरुन,

क. लिपीक सहाय्यक अधिक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव.)

## जाहीर प्रगटन

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**

जा.क्र. २०२४/मशाका/जमाबंदी-१/जन्म-मृत्यु नोंद/सिआर-५१० उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड दिनांक २०/०८/२०२४

अर्जदार : नाजीमखान युसुफखान पठाण रा. गराडा ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार :- ग्रामपंचायत कार्यालय गराडा ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विषय :- जन्म-मृत्यु अधिनियम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विपयी अर्जदार यांनी अर्ज सादर करून अर्जदार यांना त्यांच्या मुलाचे जन्माचे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार यांच्या मुलाचा जन्म दिनांक १५/०७/२०१७ रोजी गराडा ता. कन्नड येथे झालेला आहे.

अर्जदार यांच्या मुलाचा जन्म दिनांक १५/०७/२०१७ रोजी गराडा ता. कन्नड कामासाठी जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

सदर जाहिर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांच्या मुलाचा जन्म दिनांक १५/०७/२०१७ रोजी गराडा ता. कन्नड येथे झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत म्हनजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक ०९/१०/२०२४ रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारास दिनांक १५/०७/२०१७ रोजी गराडा ता. कन्नड येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीतनंतर आलेला उजर/आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही.

करिता दिनांक २०./०८/२०२४ रोजी सदर जाहिर प्रगटन माझया सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड करिता

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# मराठवाडा वॉटर ग्रीड योजनेअंतर्गत दिवाळीपर्यंत घराघरात पाणी जाणार -आ.बबनराव लोणीकर

**तभा वृत्तसेवा**
**जालना / प्रतिनिधी**

भारताची वाटचाल विकसित देशाकडे सुरू असून २०४७ पर्यंत आपल्याला हे लक्ष्य गाठावयाचे आहे. हे लक्ष्य साधताना देशातील प्रत्येक महिलेच्या सुरक्षिततेसोबतच आर्थिक सक्षमीकरणासाठी केंद्र सरकार प्रयत्नशील आहे. महिलांच्या सर्वांगीण प्रगतीमुळे आपण विकसित भारताचे ध्येय नक्कीच गाठू, स्वयंसहायता गटाला आर्थिक ताकद देतानाच गरीबांसाठी घरकूल बांधण्याच्या कामाला गती देण्यात आली आहे. आतापर्यंत महाराष्ट्र राज्यात चार कोटी घरकूल वाटप करण्यात आली असून परतूर विधानसभा मतदार संघात अठरा हजार घरकुल बांधकामास मंजुरी देण्यात आली आहे. आगामी काळात महाराष्ट्र राज्यात ३ कोटी घरे बांधण्यात येतील. असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री तथा परतूर विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार बबनराव लोणीकर यांनी केले.

सावित्रीबाई फुले बाल संगोपन योजनेबाबत पुढे बोलताना आमदार लोणीकर म्हणाले की बालसंगोपन योजनेचा मुख्य उद्देश महाराष्ट्र राज्यातील अनाथ, निराश्रित, निराधार, बेघर, संरक्षण व निवाऱ्याची गरज असलेल्या ० ते १८ वयोगटातील मुलं मुलींना संस्थेत दाखल करण्याऐवजी पर्यायी कुटूंब उपलब्ध करुन देणे व संस्थेतील वातावरणाऐवजी कौटुंबिक वातावरणात त्यांचे संगोपन व विकास घडवून आणणे हा आहे.



आज दिनांक ३० ऑगस्ट २०२४ रोजी शुक्रवारी शंभु सावरगाव तालुका जिल्हा जालना येथे मराठवाडा वॉटर ग्रीड योजने अंतर्गत पन्नास हजार लिटर क्षमता असलेल्या जलकुंभाचे भूमीपूजन ढगी तालुका जिल्हा जालना येथे दलीत वस्ती अंतर्गत सामाजिक सभागृह (किंमत १०लक्ष रु) भूमिपूजन, मराठवाडा वॉटर ग्रीड योजने अंतर्गत ७६ हजार लिटर क्षमतेच्या जलकुंभाचे लोकार्पण आणी दोन अंगणवाडी खोली (किंमत २२ लक्ष ५० हजार) इमारती चे भूमिपूजन, पिंपळवाडी तालुका जिल्हा जालना येथे अटल वन योजनेअंतर्गत घनदाट वृक्ष लागवड आणी बांधकाम कामगारांना साहित्य वाटप कार्यक्रम, एरंड वडगाव तालुका जिल्हा जालना मराठवाडा वॉटर ग्रीड योजनेअंतर्गत ५९ हजार लिटर पाणीसाठा क्षमतेच्या जल कुंभाचे भूमिपूजन समारंभ सोहळा, सावरगाव भागडे तालुका जिल्हा जालना येथे दलीत वस्ती अंतर्गत सामाजिक सभागृह (किंमत १० लक्ष रुपये) भूमिपूजन आणी संत भगवान बाबा महाराजांच्या महाआरती महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांच्या उपस्थितीत संपन्न झाली यावेळी ते बोलत होते. या वेळी व्यास पिठावर ज्ञानेश्वर माऊली शेजुळ विकास पालवे जिजाबाई जाधव विक्रम उफाड गजानन उफाड डॉक्टर पालवे डॉक्टर शरद पालवे प्रभाकर पालवे गणेश खैरे प्रकाश इलग दिलीप जोशी दिलीप पवार अशोक डोके गणेश मोरे नंदू घोडे सौरभ माहुरकर गजानन राठोड आसाराम खरात विजय घाडगे रामेश्वर काकडे सुग्रीव चवरे विष्णुपंत शहाणे गजानन राठोड प्रमोद भालेकर जालना पंचायत समितीचे गटविकास अधिकारी संदीप पवार सरपंच शोभाबाई सदावर्ते उपसरपंच कृष्णा केंद्रे अंतिकाबाई सदावर्ते सायली सांगळे धोंडाबाई घुले दुर्गबाई चव्हाण विकास तुरेराव भगवान केंद्रे मारोती केंद्रे राहुल सदावर्ते संजय जगताप नरेश सांगळे विठ्ठल पवार लक्षमन सानप रमेश चाटे जनार्धन जगताप दिनकर चव्हाण तानाजी केंद्रे संजय सांगळे राजू घुले अशोक सदावर्ते सरपंच भीमराव खाडे उपसरपंच दत्ता नरवडे उद्धव तळेकर प्रभाकर तळेकर जनार्धन नरवडे सुभाष नरवडे दत्ता नरवडे पंढरीनाथ नरवडे राजू सिल्लोड भगवान नरवडे कैलाश सिल्लोडे खंडू नरवडे संतोष तळेकर सुभाषराव तळेकर राजू नरवडे पुंडलिक पालवे जयाजी गायकवाड शिवाजी पालवे भगवान पालवे गजानन पालवे सुधाकर कऱ्हाळे रणजित कऱ्हाळे रामप्रसाद कऱ्हाळे सुरेश पालवे गजानन पालवे धोंडिबा पालवे नागोराव पालवे प्रभाकर पालवे वसंत पालवे कल्याण डोके रमेश खाडे आलम खाडे भगवान खाडे निवृती खाडे शिवानंद पालवे संदीप ढाकणे सोनू सानप गणेश पालवे रमेश गिते भगवान गिते यांची उपस्थिती होती.

# जिल्हाप्रमुख ए.जे.बोराडे यांच्या गावनिहाय दौऱ्याला उत्स्फूर्त प्रतिसाद




**तभा वृत्तसेवा**
**मंठा/प्रतिनिधी**

ठाकरे गटाचे शिवसेना जिल्हाप्रमुख ए.जे. बोराडे यांनी शुक्रवार ता. ३० रोजी परतुर तालुक्यातील रायपूर, खांडवी, ठोंबरे टाकळी, शेलगाव, अंगलगाव, कुंभारी सातोना, बिडवे सातोना, वरफळ या गावातील ग्रामस्थांशी संवाद साधला. यावेळी गावपातळीवरील विविध प्रश्नांविषयी जिल्हाप्रमुख श्री बोराडे यांनी ग्रामस्थांशी चर्चा केली. यावेळी त्यांच्यासोबत उपजिल्हाप्रमुख माधवमामा कदम, परतुर तालुकाप्रमुख सुदर्शन सोळंके, मंठा पंचायत समितीचे माजी सभापती संतोष वरकड, परतूर शहर प्रमुख दत्ता पा. सुरंग, मंठा बाजार समितीचे संचालक बाबाराव राठोड, उप तालुकाप्रमुख डॉ.संतोष पवार, विभाग प्रमुख रामेश्वर शिंदे, उस्मान शेख, किरण कातारे यांच्यासह विविध गावचे नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. जिल्हाप्रमुख ए जे बोराडे यांनी ग्रामस्थांच्या भेटीगाठी घेतल्या. यावेळी रायपूर येथील संजय कुकडे सचिन कुकडे गजानन कुकडे शिवानंद कुकडे, खांडवी येथील चेअरमन अंकुशराव बरकुले, विकास मुरकुटे, वसंत बरकुले, दादाराव बरकुले, बालाजी बरकुले, विष्णू बरकुले, ठोंबरे टाकळी येथील विठ्ठलराव ठोंबरे, वटाणे, विजय ठोंबरे, ज्ञानेश्वर भले, कृष्णा भले, शेलगाव येथील विठ्ठल लिपणे, दत्ता लिपणे, अंगलगाव येथील आप्पासाहेब खंदारे, प्रमोद खंदारे यांच्यासह कार्यकर्ते पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संक्षिप्त

### जनसंवाद यात्रेचा पंडित गोविंदराव जाधव नाट्यगृहात झाला समारोप



**तभा वृत्तसेवा**
**अंबड/प्रतिनिधी**

मराठवाडयाचे २७% भूभागाचे क्षेत्रफळ आहे.त्यापैकी मराठवाड्याला फक्त ८% पाणी मिळते.सन १९९९ ला महाराष्ट्र सिंचन आयोगाने मापदंडानुसार मराठवाड्यामध्ये २६० टीएमसी पाण्याची तूट आहे. अशा स्वरूपाने आकडेवारी जाहीर केलेली आहे. मराठवाड्याचा पाण्याचा प्रश्न सोडवण्यासाठी २६० टीएमसी ची तूट भरून काढण्यासाठी कोकण खोऱ्यातून पाणी वळविणे हा महत्त्वाचा विषय आहे.कोकण खोऱ्यातून जवळजवळ १५५ टीएमसी पाणी वळवता येऊ शकतं. त्यासाठी जे काही नॅशनल वॉटर डेव्हलपमेंट थॉरिटीच्या माध्यमातून केंद्र सरकारने याची परवानगी द्यावी.राज्य सरकारने यात लक्ष घालून १५५ टीएमसी पाणी जे समुद्रात जाते ते तुटीचा प्रदेश या दृष्टिकोनातून ते पाणी मराठवाड्यात वळवणे गरजेचे आहे . कृष्णा खोऱ्यातील मराठवाड्याचा हिस्सा ७६ टीएमसी पैकी २५ टीएमसी देण्यात आले ५१ टीएमसीचं पाणी अद्याप मिळाला नाही.त्याची व्यवस्था केली पाहिजे. विदर्भामधील अतिरिक्त ३४ टीएमसी पाणी मराठवाड्याला दिलं तरी मराठवाड्याची तहान भागली जाईल.एकूण २४० टीएमसी पाण्याची व्यवस्था केली तर मराठवाड्याच्या सिंचनाच्या पाण्याचा प्रश्न सुटेल. यावेळी सर्वपक्षीय पदाधिकारी व कार्यकर्ते, शेतकरी बांधव उपस्थित होते.

### वाढोना जवळ झालेल्या अपघातात २३ वर्षीय युवक जागीच ठार



**तभा वृत्तसेवा**
**धावडा/प्रतिनिधी**

आज दिनांक ३० ऑगस्ट २०२४ वार शुक्रवार रोजी दुपारी २:३० वाजेच्या सुमारास अजिंठा बुलढाणा या महामार्गावर वाढोना गावाजवळ आयशर ट्रकचा व दुचाकीचा भीषण अपघात झाला आहे या अपघातात दुचाकीस्वार २३ वर्षीय तरुण हा जागीच ठार झाला असल्याची घटना घडली आहे. याविषयी सविस्तर माहिती अशी की भोकरदन तालुक्यातील वाढोना येथील युवक सतीश घोरपडे २३ यांनी नुकतेच नवीन घर वाढवणा गावाशेजारी बांधले होते यावेळी आज त्याच्या घराची घरभरणी असताना गावातून किराणा दुकानातून काहीतरी किराणा सामान घेऊन तो घरी जात असताना आयशर क्रमांक चक १८ इ- ०१४२ हा भरधाव अजिंठा कडून बुलढाणा कडे जात होता यावेळीच रस्त्याच्या साईडने आपली दुचाकी घेऊन घरी जाणाऱ्या सतीशला या आयशर ट्रकने धडक दिली व या धडके सुमारे २५ ते ३० फूट फरपटत नाहीत त्यानंतर हा आयशर ट्रक आसपासचे शेतकरी अपघात झाल्यानंतर धावल्यावर थांबला यावेळी अपघात झाल्याची कळताच त्यांनी घटनास्थळावरून पळ काढला यावेळी स्थानिक नागरिकांनी या तरुणाला पाहिले असता तो आपल्या गावातील सतीश घोरपडे असल्याचे समोर आले त्या वेळी ग्रामस्थांनी त्याला रुग्णालयात नेण्याचा प्रयत्न केला मात्र तोपर्यंत उशीर झाला होता व सतीश ने घटनास्थळावरच दम सोडला, या अपघाताची माहिती तात्काळ पारध पोलिसांना देण्यात आली पोलिसांनी घटनास्थळी येऊन पंचनामा केला आहे व ट्रक ताब्यात घेतला आहे, मात्र सुमारे अर्धा तास या तरुणाची बॉडी भर हायवे रोड पडून होती.पारध पोलीस घटना स्थान दाखल झाले होते व पुढच्या तपास पारध पोलीस करत आहेत

# राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी वतीने मूक मोर्चा

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**



मालवण येथील राजकोट किल्लयावर उभारण्यात आलेल्या युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा दुर्घटनाग्रस्त झाल्याबद्दल जालना जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने शहरातील शिवाजी महाराज पुतळ्यासमोर मूक मोर्चा जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार अरविंदराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आला. युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा उभारून केवळ आठ महिनेच झाले असतांना पुतळा पडतो ही बाब अत्यंत वेदनादायी आणि मनाला संताप आणणारे असून उभारणी करतांना अक्षम्य त्रुटी झाल्याचे नाकारता येत नाही. या दुर्घटनेचा निषेध व्यक्त करण्यासाठी व भविष्यात अशा दुर्घटना घडू नयेत यांची खबरदारी घेण्यासाठी राज्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने व जालना जिल्ह्यातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत आज दिनांक २९/ ०८ /२०२४ रोजी मूक मोर्चा करण्यात आला आहे. यावेळी जिल्हाध्यक्ष माजी आमदार अरविंदराव चव्हाण, ज्येष्ठ नेत्या शकुंतला कदम, जिल्हा उपाध्यक्ष आण्णासाहेब चितेकर, शहर कार्याध्यक्ष मिर्झा अन्वर बेग, महिला शहर अध्यक्ष रिंकल तायड, सामाजिक न्यायाचे जिल्हाध्यक्ष प्रभाकर घेवंदे ,कामगार आघाडीचे मराठवाडा कार्याध्यक्ष सतीश वाहुळे, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष रोहित अग्रवाल, युवती जिल्हाध्यक्ष शितल बारोटे, जेष्ठ सेलचे जिल्हाध्यक्ष नंदकिशोर दांडगे, सुरेश डावखरे, सुरेश खरात यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी या घटनेचा निषेध म्हणून सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या उपस्थिती जिल्हाधिकारी, जालना यांना निवेदन देण्यात आले.या प्रकरणात जे जे कोणी दोषी असतील त्यांच्याविरुद्ध अत्यंत कठोर कारवाई करण्यात यावी यांची मागणी देखील या निवेदना द्वारे करण्यात आली आहे.तसेच सरकारने अहोरात्र काम करून राजकोट किल्लयावर युगपुरुष व भारतीय नौदलाचे जनक छत्रपती शिवाजी महाराजांची प्रतिभा व दैदिप्यमान शौर्याचा इतिहास सांगणारे स्मारक आणि शक्तिशाली पुतळा पुन्हा उभारावा अशी आग्रही मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने जिल्हाधिकारी यांच्या कडे करण्यात आली आहे. याप्रसंगी सेवादलाचे जिल्हाध्यक्ष पद्माकर हांडे,भटक्या जमाती सेलचे जिल्हाध्यक्ष विजय सोनवणे, किसान सेलचे जिल्हाध्यक्ष शिवचरण बाळराज, जिल्हा सरचिटणीस संदीप राठोड,तालुका अध्यक्ष संतोष ढेंगळे, युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष उमेश मोहिते, सोशल मीडिया जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर कदम,कामगार आघाडीचे अनिल वानखेडे , महिला आघाडीचे उपजिल्हाध्यक्षा कांचन शिरभे, महिला तालुकाध्यक्ष संगीता मुळे, सलमान शेख , पप्पू भाई, सद्दाम चाऊस ,आरेफभाई , वैभव नालेगावकर, अँड. दावणगांवकर, अँड. शेखर पाटील, विष्णू घुले, दिनकर दराडे, भगवान उगले, सिद्धू शिंदे, श्रीराम पोटरे , गोवर्धन डोंगरे, आनंद मस्के ,संतोष घडे, सचिन ईरछे, राहुल लष्कर ,संजय चव्हाण यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# एम.एस.जैन शाळेसाठी आज जालन्यात शांतता रॅली

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

शहरातील अत्यंत प्रतिष्ठित म्हणून ओळख असलेल्या श्री एम.एस.जैन ही इंग्रजी माध्यमाची शाळा बंद करण्याचा निर्णय शाळेच्या संबंधित व्यवस्थापनाने घेतल्याने एकच खळबळ उडाली आहे. शाळा बंद करण्याबाबत शाळेच्या सूचना फलकावर पत्र डकविण्यासह पाल्यांच्या माध्यमातून पालकांनाही हे पत्र देण्यात आले आहे. तब्बल ४५ वर्ष जुनी असलेली व आज रोजीही सुस्थितीत असलेली शाळा अचानक बंद का करण्यात येत आहे, असा सवाल यानिमित्ताने उपस्थित होत आहे. ही शाळा श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघाच्या वतीने चालविली जाते. शाळा वाचविण्यासाठी आता मराठवाडा शिक्षक संघाने पुढाकार घेतला असून या संघाच्या माध्यमातून शाळेचे शिक्षक, कर्मचारी व पालक, आजी-माजी विद्यार्थी हे रविवारी १ सप्टेंबर रोजी शाळा बचाओ शांतता रॅलीत सहभागी होणार आहेत.

जैन इंग्लिश स्कूलमधून गत ४५ वर्षात हजारों विद्यार्थी शिक्षण घेऊन मोठे झाले आहेत. मात्र संस्था चालकांनी घेतलेल्या तुघलकी निर्णयामुळे अनेक माजी विद्यार्थ्यांमधूनही आश्चर्य व्यक्त केले जात आहे. हा निर्णय चुकीचा असून शाळा सुरू रहावी, यासाठी आपणही रॅलीत सहभागी होणार असल्याचे त्यांनी सांगितले. मराठवाडा शिक्षक संघाने या संदर्भात निवेदन प्रसिध्द केले असून याच्या प्रतिलिपी जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षणाधिकारी, छत्रपती संभाजीनगर येथील शिक्षण उपसंचालक कार्यालय, पुणे येथील शिक्षण संचालक कार्यालय, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षक, सदर बाजार पोलिस निरीक्षक, धर्मादाय आयुक्त कार्यालय जालना तसेच श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघालाही निवेदन पाठविण्यात आले आहे. निवेदनावर शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष रमेश आंधळे, सचिव संजय येळवंते, उपाध्यक्ष जगन वाघमोडे, सहसचिव दीपक शेरे, कार्याध्यक्ष एफ.ए.सय्यद, केंद्रीय सदस्य ज्ञानोबा वरवट्टे, प्रेमदास राठोड, सदस्य पी.यु.काकड, गणेश चव्हाण, आरेफ कुरेशी, नारायण मुंडे, भगवान धनगे, हाकीम पटेल, शेख खलील, गणेश म्हेत्रे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# तुझ्या -माझ्यातले, शिदोरीच्या भाकरी काव्यसंग्रहाचे रविवारी प्रकाशन!

**तभा वृत्तसेवा**
**जाफ्राबाद/प्रतिनिधी**



अनुभव प्रतिष्ठान च्या वतीने ग्रामीण कवी, विधीज्ञ ड. विठ्ठल काष्टे रचित तुझ्या- माझ्यातले व शिदोरीच्या भाकरी या दोन काव्यसंग्रहांचा प्रकाशन सोहळा रविवारी ( ता. ०१) सकाळी ११.०० वा. जाफ्राबाद शहरातील रेपाळा रोड स्थित गुरुकृपा लॉन्स येथे आयोजित करण्यात आला आहे. माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित प्रकाशन सोहळ्यास उद्घाटक आ. संतोष पाटील दानवे, डॉ. केशव देशमुख ( पुणे), चित्रकार श्रीधर अंभोरे, डॉ. संजीवनी तडेगावकर, प्राचार्य गजानन जाधव, यांची प्रमुख उपस्थिती राहील प्रा. मधुकर जोशी हे निवेदन करतील. प्रकाशन सोहळ्यानंतर हशर जाफ्राबादी, मुमताज पठाण, डॉ. शशीकांत पाटील,डॉ.सुहास सदाव्रते, र. तु. देशमुख, सैफी शहारुख, ड. शरद वाकडे, शेख साबेर, या निमंत्रित कवींचे कविसंमेलन होईल. असलम शाह ( सिल्लोड) हे सूत्रसंचालन करतील. तरी साहित्य प्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सोहळ्याचा लाभ घ्यावा असे आवाहन सुरेश दिवटे, डॉ. शेषराव पालकर, दीपक पाटील वाकडे, मोहनराव मुळे, गजानन उदावंत ,पुरूषोत्तम काष्टे आणि अनुभव प्रतिष्ठानचे पंडितराव तडेगावकर यांनी केले आहे.

# खडकपूर्णा येथील भोकरदन शहराला पाणी मिळण्यासाठी अमरण उपोषणाचा आज दुसरा दिवस

**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन/प्रतिनिधी**

भोकरदन शहरातील उस्मानपेठ केळणा नदी वरील पुलाचे काम तत्काल सुरु करण्यात यावे व खड़कपूर्णा प्रकल मार्फ़त भोकरदन शहराला पाणीपुरवठा करण्यात यावा या मागणीसाठी भोकरदन येथील उप विभागीय अधिकारी कार्यलया समोर दिनांक २९ ऑगस्ट पासून एम.आय. एम, पार्टिचे युवा शहर अध्यक्ष शेख जावेद यांच्यासह एम. आय. एम. च्या कार्यकर्त्यांनी अमरण उपोषण सुरू असून, आज उपोषणाचा दुसरा दिवस आहे, या उपोषणास शहरातील समाज कार्यकर्त्यांनी व अनेक पक्षाच्या कार्यकर्त्यांनी या उपोषणास जाहिर पाठीबा देण्यात आला आहे, भोकरदन आम आदमी



पार्टी चे जाहिर पाठिंबा, इसरसर खान पठान, साबेर शाह, अमर शाह, जुनेद कादरी नारायण सोन्नी, माजी नगर सेवक मोहम्मद नज़ीर, मा नगर सेवक अब्दुल कदीर बापू शिवसेनेचे सुरेश तळेकर, मिलिंद मोरे, जुनेद पठान, अनेक समाजसेवा कासह अनेक पक्षाच्या कार्यकर्त्यांनी जाहिर पाठीबा देण्यात आला आहे.

# आणाभाऊ साठेंचा लढा नव्याने लढण्याची गरज, प्रस्थापिताविरोधात पेटून उठा – सतीश घाडगे

## लहूजी सेनेचा जिल्हास्तरीय मेळावा: विधासभा निवडणुकीत देणार घाटगे पाटलांना जाहीर पाठींबा

**तभा वृत्तसेवा**
**अंबड/प्रतिनिधी**

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर, साहित्यरत्न लोकशाहीर आणणाभाऊ साठे यांच्यासह सर्व बहुजनांच्या महापुरुषाना अभिप्रेत असलेली दलित-वंचित-बहुजन समाजाची प्रगती आणि विकास अजूनही झालेला नाही. आजही मातंग आणि बहुजन समाज मुख्य प्रवाहात आलेला नाही.म्हणून दलित-वंचित-बहुजन समाजाचा केवळ राजकारणासाठी वापर करणाऱ्या प्रस्थापित राजकारण्यांना जागा दाखवून येणाऱ्या काळात परिवर्तन घडवा, असे आवाहन भाजपा नेते सतीश घाटगे पाटील यांनी बहुजन समाजाला केले. जालना तालुक्यातील विरेगाव येथे भाजपा नेते तथा घनसावंगी विधानसभेचे निवडणूक



प्रमुख सतीश घाटगे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत लहूजी सेनेने मातंग समाजाचा जिल्हा स्तरीय मेळावा घेतला.

केलापरिवर्तनाची दिशा ठरविण्यासाठी वंचित, दलितांच्या न्याय, हक्कासाठी आणि बहुजन समाजाच्या भविष्यासाठी येणाऱ्या काळात घनसावंगी विधानसभेतील बहुजना समाजाला न्याय देणाऱ्या नेतृत्वाच्या पाठीशी उभा राहण्याचा निर्धार मातंग व बहुजन समाजाने केला. जालना तालुक्यातील विरेगाव येथे लहूजी सावळे बहुजन क्रांती सेनेचे अध्यक्ष राधाजी शेळके, उपाध्यक्ष गणपतजी कांबळे व भाजपा नेते तथा घनसावंगी विधानसभेचे निवडणूक प्रमुख सतीश घाटगे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत मातंग व बहुजन समाजाचा जिल्हा स्तरीय मेळावा पार पडला या मेळाव्यात ते बोलत होते. लोकशाहीर, साहित्यसम्राट आणणाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त क्रांतीगुरू लहूजी साळवे बहुजन क्रांती सेनेच्या वतीने हा मेळावा आयोजित करण्यात आला होता.

यावेळी घाटगे पाटील यांनी समाज बांधवासोबत संवाद साधला. दलित-वंचित-बहुजन समाजाचा प्रस्थापितांनी केवळ राजकारणासाठी वापर केला. त्यांना त्यांच्या हक्कापासून वंचित ठेवलं आहे. आजही मातंग आणि बहुजन समाज समाजाच्या मुख्य प्रवाहात आलेला नाही. म्हणून प्रस्थापितांना या निवडणुकीत जागा दाखवून आपल्या पुढच्या पिढीच्या भविष्यासाठी परिवर्तनाला साथ देण्याचे आवाहन केले. वंचित, दलितांच्या न्याय- हक्कासाठी आणि बहुजन समाजाच्या हितासाठी येणाऱ्या काळात घनसावंगी विधानसभेत समाजाच्या विकासाचे व्हिजन असलेल्या सतीश घाटगे पाटील यांनाच बहुजन समाज साथ देणार असा विश्वास राधाजी शेळके, गणपतजी कांबळे यांनी दिला. या मेळाव्यास लहूजी साळवे बहुजन क्रांती सेनेचे युवा नेते शिवबाजी शेळके, मराठवाडा सचिव बाबासाहेब पाटोळे उपाध्यक्ष रमेश दाभाडे,महिला आघाडीच्या मराठवाडा अध्यक्ष कासाबाई शिर्गुळे,चंद्रकला गवळी, सर्जेराव पाटोळे यांच्यासह सर्व पदाधिकारी व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अग्रलेख...

# कवळिता संधीची क्षितिजे...

बदल ही एक शाश्वत प्रक्रिया आहे, असे म्हटले जाते. वर्तमानाला मागे टाकत भविष्याच्या दिशेने वाटचाल करणाऱ्या काळाचे बोट धरून ही प्रक्रिया आपले प्रत्येक पाऊल पुढे टाकतच असते. तो निसर्गाचा नियमच आहे. तो जीवनासारखाच नैसर्गिक आहे. तरीही, नैसर्गिकरीत्या होणाऱ्या बदलावर विसंबून न राहता आपल्याला हवे असतील तसेच बदल घडविण्याची महत्त्वाकांक्षा मनामनांत असेल तरच बदलाच्या नैसर्गिक प्रक्रियेसोबत नव्या संधी स्वतःहून समोर येऊन उभ्या राहात असतात. अपरिहार्यपणा म्हणून असे बदल स्वीकारण्याची मानसिकता केवळ हतबलपणास खतपाणी घालते. नव्या सहस्रकाच्या सुरुवातीपासूनच्या गेल्या जवळपास अडीच दशकांच्या काळात बदलाची प्रक्रिया जागतिक स्तरावर एकाच गतीने वेग घेऊ लागल्याने, भारतासारखा विशाल देश या प्रक्रियेत सहजच सहभागी होणे साहजिकही होते. कोणे एकेकाळी देशाची प्रचंड लोकसंख्या ही समस्या असल्याच्या समजुतीने देशाच्या जनमानसात अपराधीपणाची एक भावना बळावत चालली होती. जगाच्या मंचावरील बदलाच्या गतिमान प्रक्रियेत सहभागी होतानाही याच भावनेच्या प्रभावामुळे रुजलेली काहीशी पराभूत मनोवृत्ती पुसून टाकण्याची गरज होती. अशा काही गरजा स्वतःहून आपले महत्त्व अधोरेखित करत नसतात. त्यांचे महत्त्व नेमक्या वेळी ओळखावे लागते. काळासोबत होत गेलेल्या बदलांचा प्रभाव म्हणून त्या काळात भारतातही बदल होत गेलेच होते. कारण ती तर नैसर्गिक प्रक्रियाच असल्याने बदलांचा हा प्रवास होत असतानाही त्याची सामाजिक दखल फारशी गांभीर्याने घेतली गेली नसल्याने होत जातील ते सारे बदल निमूटपणे स्वीकारण्यापुरताच त्यांच्याशी समाजाचा संबंध राहिला. स्वातंत्र्यानंतरच्या काळात, काळासोबत होणारे असे बदल घडत गेले तरी या बदलांमुळे आत्मनिर्भरतेच्या विश्वासाचा काहीसा अभावच राहिल्याचे दिसते. भारतीय संस्कृतीत समाज किंवा समुदाय म्हणजे, सहस्र हात, सहस्र डोळे आणि सहस्र शिरे असलेला महाविशाल पुरुष असल्याचे वर्णन पाहावयास मिळते. व्यक्ती किंवा कुटुंब किंवा समाजगटाचे काही व्यक्तिमत्त्व असले, तरी विशाल समाजपुरुषाचे स्वतःचे व्यक्तिमत्त्व घडविणे हे एक मोठे आव्हान असते. त्यासाठी काळासोबत होणाऱ्या नैसर्गिक किंवा जाणीवपूर्वक घडविल्या जाणाऱ्या बदलांचा मागोवा घेत त्यामागे दडलेल्या प्रत्येक संधीचे सोने करण्याची समज समाजात रुजविण्याची गरज असते. ही गरज जेव्हा ओळखली जाते, तेव्हा बदलाच्या नैसर्गिक प्रक्रियादेखील समाजासमोर समाजानुकूल राहण्याकरिता संधींना सोबत घेऊनच नम्रपणे समोर उभ्या राहतात. लोकसंख्या ही समस्या नसून आपल्याला हवे तसे बदल घडविण्याची शक्ती असल्याची जाणीव समाजात रुजू लागली तसतसा सामाजिक मानसिकतेतील हा न्यूनगंड पुसला जाऊ लागला. गेल्या दशकभरात देशाच्या मानसिकतेत दिसणारा विश्वास आणि जगाच्या पाठीवर देशाला मिळत असलेली प्रतिष्ठा हा त्याचाच परिणाम आहे, यात शंका नाही. आत्मनिर्भर भारत, स्वयंपूर्ण भारत, मेक इन इंडिया, व्होकल फॉर लोकल अशा अनेक योजना या राजकीय स्वार्थाच्या किंवा सरकारी योजनांच्या केवळ घोषणा न राहता या प्रत्येक योजनेतून समाजासमोर संधींची नवी द्वारे खुली व्हावीत आणि त्यातून विकासाची क्षितिजे विस्तृत व्हावीत याकरिता जाणीवपूर्वक केल्या गेलेल्या प्रयत्नांची फळे दिसू लागली. सरकारी नोकऱ्यांतील रिक्त पदांचे आकडे दाखवत बेरोजगारीचे भूत उभे करून समाजात संभ्रम माजविण्याचा राजकीय खेळ सध्या पाहावयास मिळत असताना, बदलासोबत समोर येणाऱ्या संधींचे सोने करण्याच्या यशोगाथा अधोरेखित करण्याची गरज आहे. सरकारी नोकऱ्यांतील रिक्त पदे हा प्रत्यक्षात बेरोजगारीचा मान्य मापदंड नाही. विकासाच्या विस्तारणाऱ्या क्षितिजांवर रोजगाराच्या अन्य असंख्य संधी हात जोडून समोर उभ्या आहेत, हे ओळखण्याचीही गरज आहे. या संधींचे सोने करण्याचा आत्मविश्वास रुजविण्याऐवजी, नकारात्मक मानसिकतेतून केवळ सरकारी नोकऱ्यांतील रिक्त पदांच्या आकड्यांत गुरफटलेल्या राजकारणाने समंजसपणा दाखविण्याचीही गरज आहे. याची असंख्य उदाहरणे गेल्या १० वर्षांतील विकासाच्या विविध प्रकल्पांतून देशाने अनुभवली आहेत. कोणाही एका विकास प्रकल्पामुळे, त्या प्रकल्पासोबतच्या अनुषंगिक उद्योगांना व सेवांना चालना मिळत असते. या उद्योगांची अथवा सेवांची मागणी वाढली की तेथील रोजगाराच्या संधी वाढतात, त्यामुळे आर्थिक स्थैर्य प्राप्त होऊन अर्थकारणास चालना मिळाली की कौटुंबिक जीवनमान सुधारते. जीवनशैली उंचावली की मागणी वाढते आणि मागणी व पुरवठ्याच्या गुणोत्तरानुसार पुरवठा करणाऱ्या उद्योग व सेवांचा विस्तार होऊन पुन्हा रोजगार वाढतात. हा अर्थशास्त्राचा नियम विकास प्रकल्पांच्या उभारणीतून सिद्ध झाला आहे. विकासाचे अनेक प्रकल्प आज रोजगाराच्या नव्या संधीचे सोने करण्याचे आव्हान देत रोजगारक्षम पिढीसमोर उभ्या आहेत. देशाच्या कानाकोपऱ्यात सुरू असलेल्या कोणत्या ना कोणत्या प्रकल्पांतून मिळणाऱ्या या संधींमुळे अर्थशास्त्राच्या या सिद्धांतास सत्यतेची साथ सापडली आहे. देशाला जागतिक आर्थिक महासत्तांच्या रांगेत बसविण्याच्या संकल्पाची ही वाटचाल नजरेआड करून चालणार नाही. संभ्रम माजविण्याच्या प्रयत्नांचा गदारोळ सुरू असतानाही, या वाटचालीचे नवे पाऊल पुढे पडत असल्याने, भविष्यात संधींना वाकविण्याच्या आत्मविश्वासाची नवी रूपे आता साकार होताना दिसत आहेत हादेखील एक शुभसंकेतच म्हणावा लागेल. अमेरिका समृद्ध आहे म्हणून तेथील रस्ते चांगले आहेत, असे नव्हे तर रस्ते चांगले असल्यामुळेच अमेरिका समृद्ध आहे, असा तेथील एका माजी राष्ट्राध्यक्षाचा दावा भारतातील महामार्गांच्या उभारणीतील विक्रमी वाटचालीची प्रेरणा ठरला आहे. १० वर्षांपूर्वी सन २०१३-१४ पर्यंत, देशातील राष्ट्रीय महामार्गांची लांबी सुमारे ९८ हजार किलोमीटर एवढी होती. गेल्या केवळ १० वर्षांत त्यामध्ये सुमारे ५० हजार किलोमीटरची भर पडली. विकासाच्या गतीचे गणित समजून घेण्याकरिता ही आकडेवारी पुरेशी उपयुक्त ठरते. महामार्ग हा केवळ दळणवळणाचा वेग वाढविण्याचा उपाय नसतो, तर त्यांच्या उभारणीमुळे अनुषंगिक उद्योगांना चालना मिळते, रोजगाराच्या संधी वाढतात आणि महामार्गांच्या क्षेत्रातील जनजीवनाचे राहणीमानही उंचावून त्याचा देशाच्या समृद्धीची क्षितिजे विस्तारतात. त्यामुळे विकास प्रकल्पांचे मोकळेपणाने स्वागत व्हावयास हवे. कोणत्याही नव्या विकास प्रकल्पातून निर्माण होणाऱ्या संधी नाकारणे हा करंटेपणा ठरेल आणि त्यातून मोठे सामाजिक नुकसान होईल, याची जाणीव ठेवून विकास प्रकल्पांचा राजकारणासाठी वापर करण्याची मानसिकता झिडकारून आता या संधींच्या स्वागतासाठी समाजाने उभे राहावयास हवे.

अशी एक अनोखी संधी आता महाराष्ट्रासमोर हात जोडून उभी राहिली आहे. जगभरातील काही मोजक्या बंदरांच्या क्षमतेशी बरोबरी करू शकेल अशा प्रस्तावित दिघी बंदराच्या कामाला केंद्रीय मंत्रिमंडळाने बुधवारी मंजुरी दिली आहे. भारतभूमीच्या गळ्यात औद्योगिक स्मार्ट शहरांचा कंठहार घालण्याचा मोदी सरकारचा संकल्प साकारण्याच्या प्रक्रियेचे पुढचे पाऊल या बैठकीत पडले. राष्ट्रीय औद्योगिक कॉरिडॉर विकास प्रकल्पांतर्गत देशातील १० राज्यांमध्ये २८ हजार ६०० कोटी रुपये खर्चाच्या १२ महत्त्वाकांक्षी प्रकल्पांमध्ये दिघी बंदराच्या विकास प्रकल्पाचा समावेश ही महाराष्ट्राच्या विकासाची वाट विस्तारणारी मोठी संधी ठरणार असून त्याचे सोने करण्याकरिता सर्वांनी सिद्ध व्हावयास हवे. या एका प्रकल्पामुळे दीड लाख कोटींची गुंतवणूक राज्यात अपेक्षित आहेच; पण थेट रोजगाराच्या सुमारे साडेनऊ लाख आणि अप्रत्यक्ष रोजगाराच्या सुमारे ३० लाख नव्या संधीही उपलब्ध होणार आहेत. देशाचे औद्योगिक परिदृश्य बदलण्याची ही नवी प्रक्रिया म्हणजे आपल्याला हवे तेच बदल घडविण्याच्या महत्त्वाकांक्षी मानसिकतेचेच एक प्रतिबिंब ठरणार आहे. वर्तमानाला मागे टाकून भविष्याकडे वाटचाल करणाऱ्या काळाचे बोट धरून चालणाऱ्या बदलाच्या प्रक्रियेनेही आनंदी व्हावे आणि नैसर्गिकतेचा पठडीबाजपणा झुगारून नवा अवतार धारण करावा, अशाही अनोख्या संधीचे स्वागत करायलाच हवे.

## इतस्ततः

**डॉ. विवेक राजे**

# ...या प्रश्नाचे उत्तर काळच देईल

कोलकात्ता येथील एका सरकारी मेडिकल कॉलेजला संलग्न हॉस्पिटलमध्ये कार्यरत डॉक्टर प्रशिक्षणार्थी महिलेला ड्यूटीवर असताना बलात्कार करून मारून टाकण्यात येते. कुणीतरी नेहमीच त्या हॉस्पिटलशी संबंधित तरुण या प्रसंगी संशयित म्हणून पकडला जातो. ही बातमी कळताच अचानक काही-शे लोकांचा जमाव त्या दवाखान्यावर चालून जातो. दवाखान्याची नासधूस केली जाते, कार्यरत असलेल्या डॉक्टरांनादेखील हिंसेचे लक्ष्य केले जाते. यावर जेव्हा त्या राज्यातील विरोधी पक्ष आणि जनता आंदोलनाचा पवित्रा घेते, तेव्हा तेथील मुख्यमंत्री, ज्या स्वतःच गृहमंत्री आणि आरोग्यमंत्री या नात्याने याला जबाबदार आहेत, स्वतःच या विरोधात मार्च काढतात. ज्यांनी निर्देश देत कृती करायची त्याच आंदोलनाचा पवित्रा घेतात. त्या कुणाला वाचवताहेत की कुणा समाजाच्या लोकांना वाचवण्यासाठी प्रयत्न करताहेत, हे सांगणे कठीण आहे. पण सामान्य माणूस त्यातही हिंदू अस्वस्थ आहे.

उदयपूर येथे दोन विद्यार्थी एकमेकांवर चाकू हल्ला करतात. त्यातील एक जबर जखमी होतो. उपचारांदरम्यान त्याचे निधन झाले, अशी अफवा पसरते. काही-शे लोकांचा जमाव त्या दवाखान्यावर चालून जातो. बंदची हाक दिली जाते. हिंसाचार घडवून आणला जातो. दहशतीचे वातावरण पसरते. कन्हैयालाल साहू या टेलरिंग फर्म चालवणाऱ्या हिंदू माणसाच्या २०२२ मध्ये झालेल्या हत्येपासूनच उदयपूरमधील हिंदू अस्वस्थ आहे. शेजारी बांगलादेशातील विद्यार्थी आंदोलन हिंसक होऊन त्या देशाच्या पंतप्रधानपदी विराजमान व्यक्तीला देश सोडून भारतात पळून यावे लागते. त्या देशाच्या अल्पसंख्यक हिंदू नागरिकांना हिंसेचे लक्ष्य केले जाते. अंतरिम सरकार स्थापन झाल्यावरही तेथील हिंदू विरोधी हिंसाचार सुरूच राहतो. केंद्र सरकार आपल्या पद्धतीने यावर कारवाई करीत असले, तरी भारतातील हिंदू या सर्व प्रकाराने अस्वस्थच आहे. तेथील हिंदूंना संरक्षण देण्यात यावे म्हणून तसेच या धार्मिक हिंसाचाराचा निषेध म्हणून भारतात अनेक ठिकाणी शांततापूर्ण निदर्शने आणि बंदची हाक दिली जाते. या बंदच्या वेळी नाशिकसारख्या शांतताप्रिय शहरात ठरावीक वस्तीत दगडफेक, मोडतोड, हिंदू-मुस्लिम समाजातील दोन समूहात हाणामारी अशा घटना घडतात. वैजापूर येथे हरिनाम सप्ताहात बोलताना कुणी एक महंत रामगिरी महाराज, मुहंमद पैगंबरांच्या आयेशा या अल्पवयीन मुलीशी झालेल्या विवाहाचा दाखला देत (संदर्भ : सहिह-अल-बुखारी ५१३३/सुनन अन नसाई ३२५५) काही टिप्पणी करतात. टिप्पणी स्त्रियांवरील एका समाजात होणाऱ्या अत्याचारासंबंधी असते. त्यावरून मुस्लिम समाज आक्रमक होताना दिसतो. अनेक राजकीय नेते यात अकारण तेल ओतण्याचे उद्योग करीत अल्पसंख्यक मुस्लिम समाजाचे तुष्टीकरण करण्याचा प्रयत्न करतात. ते चुकूनही या संदर्भात मुस्लिम धर्म ग्रंथांमध्ये काय लिहिले आहे, याचा उल्लेख करीत नाहीत. उलटपक्षी मुस्लिम समाजाच्या चुकीच्या धर्म भावनांना खतपाणी घालत भडकवण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे आधीच अहंकारी असलेला मुस्लिम समाज, आमच्या धार्मिक भावना दुखावल्या गेल्या, हे कारण सांगत आक्रमक होतो. बदलापूर येथील एका शाळेत दोन लहानशा चिमुरड्यांसोबत नको तो प्रसंग घडला. पोलिसांनी गुन्हा नोंदविण्यास टाळाटाळ केली. राजकीय हस्तक्षेपानंतर गुन्हा नोंदविण्यात आला. पण एकूण प्रकरणाला राजकीय वळण देण्यात आले.

हे सगळे, स्वातंत्र्य मिळून ७७ वर्षं झाली तरी आपण एकजिनसी समाज निर्माण करू शकलो नाही, ही वस्तुस्थिती दाखवणारे आहे. त्यामुळे आत्ता या घडीला या देशातील प्रत्येकच माणसाने दोन प्रश्नांचा विचार करणे आवश्यक ठरते. एक म्हणजे देशाची फाळणी धर्माच्या आधारावर होऊन पाकिस्तान आणि भारत असे एक मुस्लिमबहुल तर एक हिंदुबहुल असे दोन देश निर्माण केले गेले. त्यानंतर आपसातील मतभेदांमुळे पाकिस्तानचे दोन तुकडे होऊन बांगलादेश अस्तित्वात आला. पाकिस्तानातील तसेच बांगलादेशातील हिंदूंना पद्धतशीरपणे हिंसेच्या मार्गाने नामोहरम करण्यात आले. आज तेथे हिंदू अतिअल्पसंख्यक झाले आहेत. त्यांना तेथे कोणतेही विशेष अधिकार नाहीत, कोणत्याही कायद्याचे संरक्षण नाही. ते तिथे सुरक्षित नाहीत तसेच या दोन्ही देशांतील हिंदू विरोधातील हिंसाचारामुळे थोड्याच कालावधीत पाकिस्तानात व बांगलादेशात हिंदू धर्मीयांचे अस्तित्व उरणार नाही, असे स्पष्ट दिसते आहे. भारतात मात्र मुस्लिम समाजाला अल्पसंख्यक हा विशेष दर्जा देण्यात आला असून त्यांची लोकसंख्या तसेच त्यांच्या हातातील एकूण संपत्तीत भरघोस वाढ झालेली दिसते. तरीही भारत आणि पाकिस्तान व बांगलादेशमधील मुसलमानांची हिंदू समाजाप्रती असलेली वागणूक सारखीच दिसते. त्यामुळे पाकिस्तान-बांगलादेशातील आणि भारतातील मुस्लिम वेगळे आहेत का? आणि जर वेगळे नसतील तर इतिहासकाळात आपण केलेल्या चुका हिंदू समाज केव्हा आणि कशारीतीने दुरुस्त करणार? कारण भारतातील मुस्लिम समाज आजही भारतीय राष्ट्रीयत्वात विलीन झालेला नाही. हा समाज आपली वेगळी संस्कृती, वेगळ्या धर्मश्रद्धा , वेगळी वस्ती, वेगळी भाषा, वेगळ्या सामाजिक चालीरीती ठेवण्यात धन्यता मानताना दिसतो. तो आजच्या काळातदेखील 'नबी कि सुन्नत पर चलना' या धर्मवाक्यानुसारच सामाजिक, कौटुंबिक आणि वैयक्तिक वागणूक ठेवण्यात धन्यता मानताना दिसतो. मग स्वतंत्र भारताने दिलेल्या स्वातंत्र्याचा गैरफायदा घेऊन हे 'सेव्ह गाझा' म्हणून टी शर्ट घालून मिरवतात. बांगलादेशमधील हिंदूंवर होणारे अत्याचार याच मुस्लिम समाजाच्या खिजगणतीत नसतात. हा मुस्लिम समाजाचा हलकटपणा हिंदू समाजाला अस्वस्थ करतो. हे सगळे भारतातील मुस्लिम समाज जाणूनबुजून करीत असतो, असे समजण्यास जागा आहे. मागील जवळजवळ शंभर वर्षे या समाजाला आपल्याबरोबर घेण्याचे प्रयत्न हिंदू समाजाने व या देशातील नेतृत्वाने केलेले आहेत. राजकीय नेतृत्वाने नेहमीच यांच्या एकगठ्ठा मतांसाठी यांना डोक्यावर घेतले आहे. आता मात्र सर्व राजकीय पक्षांना बाजूला सारून हिंदू समाजाने यावर काही कृती करण्याची वेळ आलेली आहे. कारण मुस्लिम समाजाला राष्ट्रीयत्व समजत नाही. पॅन इस्लामची संकल्पना जी त्यांच्या धर्म ग्रंथात दिलेली आहे, जगात असलेल्या विविधतेने आणि वंश श्रेष्ठत्वाच्या भावनेमुळे अस्तित्वात येणे अशक्य आहे, हे समजून घेण्याची या समाजाची तयारी नाही. पंजाबी मुसलमान जर बंगाली मुसलमानाला आपल्या बरोबरीचा समजत नसेल तर मध्य पूर्वेतील अरबी मुस्लिम, आशियाई मुस्लिम समाजाला बरोबरीचे स्थान कधीच देणार नाहीत, ही वस्तुस्थिती अनेक अनुभव घेऊनही हे मान्य करण्यास तयार नाहीत. अश्रफी मुस्लिम अजलफी मुसलमानांना आपल्या मुली देत नाहीत, त्यांच्या हातचे जेवत नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. याच धर्तीवर अन्सारी, कुरेशी मुसलमान आपसात रोटी-बेटी व्यवहार करत नाहीत. भारतीय मुस्लिम समाज देशाच्या मुख्य प्रवाहात येण्यास तयार नाही. भारतीय राष्ट्रीयत्वात विलीन होण्यास तयार नाही, ही वस्तुस्थिती आहे. मुस्लिम समाज कोणत्याही इतर विचारधारेशी, राष्ट्रीयत्वाशी, या देशातील व्यवस्थेशी तादात्म्य साधू शकत नाही, विलीन होणे तर शक्यच नाही. या प्रश्नाचे, परिस्थितीवर मात करणारे उत्तर काळच देईल. तोवर हिंदू समाजाने आपली सगळी ताकद एकवटली तरच... अन्यथा...???

९८८१२४२२२४

## वेध

**प्रफुल्ल क. व्यास**

# राहुल गांधींचे किळसवाणे राजकारण

सामान्य नागरिकांना किळसवाण्या राजकारणाचा संताप येऊ लागला आहे. एरवी राजकारण हा गावखेड्यातील पारावर बसून चर्चिला जात असलेला विषय होता. दूरचित्रवाणीवर राजकीय चर्चाही मन लावून ऐकल्या जात होती. आता मात्र या राजकारणाची अक्षरश: उबग येऊ लागली आहे. देश, समाजाच्या विकासावर चर्चा होण्याऐवजी कुरापत काढून दिवसभर एकाच विषयावर रवंथ करण्याचा अतिशय घाणेरडा पायंडा राजकारणात पडतो आहे. देश स्वतंत्र झाल्यानंतरही दोन धर्मांमध्ये वाद सुरूच आहे; किंबहुना त्यात वाढ होत आहे. दोन धर्मातील वाद पेटत राहणे, ही काही राजकीय पक्षांची निकड झाली आहे. त्याशिवाय त्यांना राजकारणाची पोळीच भाजता येत नाही. नेते राजकारण करतात आणि जनता त्यात पोळली जाते. देशात हिंदू आणि मुस्लिम हे दोन धर्म म्हणजे जणू 'भारत-पाकिस्तान' अशी परिस्थिती या राजकारण्यांनी करून ठेवली आहे. सत्ताधाऱ्यांना कोंडीत पकडण्यासाठीचे शस्त्र मिळत नसल्याने आता ते जातीवर उतरले आहेत. गावात पाळल्या जाणारी जात आता राजकारणापर्यंत पोहोचली आहे. दोन दिवसांपूर्वी नाही का काँग्रेसचे कायम 'युवा' नेते राहुल गांधी यांना दीन-दलित, आदिवासी आठवले. एखाद्या जातीचे उत्थान करण्यासाठी त्या जातीचा वापर केला तर एकवेळ समजू. पण, त्या माध्यमातून घृणाच निर्माण होणार असेल तर त्याला काय म्हणावे? खेळ म्हणा वा स्पर्धा (नोकरी सोडून) यात जात, धर्माने अद्याप प्रवेश केला नाही. मात्र, देशातील गोरगरीब, शेतकरी, अल्पसंख्यक आणि काँग्रेसचे तारणहार असलेल्या राहुल गांधींना २४ ऑगस्ट रोजी प्रयागराजसारख्या पवित्र गावात अवदसा आठवली. 'संविधान का सन्मान और उसकी रक्षा' या कार्यक्रमात स्वत:चा टीआरपी वाढवण्याच्या नादात त्यांनी 'मिस इंडिया' या स्पर्धेत दलित, आदिवासी वा ओबीसी महिला दिसत नसल्याची गुगली टाकली. राहुल गांधींनी टाळ्याही घेतल्या. पण, हा विनाकारण उपद्व्यापच नाही का? जगात ऑलिम्पिक व ॲथ्लेटिक स्पर्धा होतात. त्याच तोडीची ही पण स्पर्धा असते. त्यात कुठे जाती-भेद बघितला जातो. परंतु, सत्ताधाऱ्यांवर तोंडसुख घेताना दुसरे मुद्देच नसल्याने या महाशयांना आता महिलांची 'मिस इंडिया' स्पर्धाच आठवली. त्या ठिकाणी जातीचा उल्लेख केल्याने आता राहुल गांधींच्या नेतृत्वात देशात जाती-जातींमध्ये भांडणं लागल्यास त्याला जातनिहाय 'फाळणी' म्हणावी लागेल. देशात धर्मा-धर्मात तर वितुष्ट आहेच; आता असेच जाती-पातीचे राजकारण झाले तर राहुल गांधी यांना दुसऱ्या 'फाळणीचे जनक'च म्हणावे लागेल. सत्ताधाऱ्यांनी राहुल गांधी यांच्या विदुषकी वागण्याने त्यांना 'पप्पू'पर्यंत नेले. राहुल गांधी यांना घरातूनच राजकारणाचे बाळकडू मिळाले आहे. महात्मा गांधी यांचा वारसाच ते सांभाळत आहेत. इंदिरा गांधी, राजीव गांधी, सोनिया गांधी आणि आता राहुल गांधी खिंड लढवत आहेत. या खिंडीत टिकून राहण्यासाठी ते आता मिस इंडियावर उतरले. राजकारणाच्या जुगारात कोणत्यावेळी कोणता पत्ता फेकायचा याचे चांगले ज्ञान त्यांनी अवगत केले आहे. देशाचे विरोधी पक्ष नेते हे महत्त्वाचे पद सांभाळत असलेले राहुल गांधी विदेशातून उच्च शिक्षण घेऊन आले आहेत. पंतप्रधानांवर थेट बोलण्याची एकही संधी ते सोडत नाहीत. प्रयागराजला त्यांनी पंतप्रधान देश सुपर पॉवर होत असल्याचे बोलतात. पण, ९० टक्के जनता आजही सिस्टमच्या बाहेर आहे. त्यामुळे हा देश सुपर पॉवर कसा बनेल, असा प्रश्न त्यांनी विचारला. मात्र, स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवापर्यंत आताचे सलग १० वर्षे आणि अधले मधले काँग्रेसेत्तर सरकार सोडले तर जवळपास ५० वर्षे हा देश काँग्रेसच्याच हातात होता. मग आता सिस्टमच्या बाहेर असलेल्या ९० टक्के जनतेला त्यावेळी आत घेण्यास कोणी अडवले होते. त्यावेळीही 'वारे इंदिरा तेरा खेल; सस्ती दारू महेंगा तेल' हेच नारे लागत होते. त्या तुलनेत आजही महागाई वाढतेच आहे. विरोधकांनी सामान्य नागरिकांच्या मनाला भिडेल, अशा महागाईसारख्या मुद्यावर सरकारला जाब विचारावा. पण, अशा कुरापतींमध्येच विरोधक समाधान मानत आहेत. देश कायम तप्त ठेवण्यात त्यांना समाधान वाटते आहे. सरकारकडे जातनिहाय जनगणनेची मागणी करण्यात येत आहे. तीच मागणी रेटून धरा, त्यावरच पुढचे राजकारणही करा. पण, शेजारी शेजारी राहणाऱ्या दोन जातींमध्ये आग लावण्याचे महापाप करू नका. आयुष्याच्या शेवटच्या टप्प्यात नातेवाईक कामाला येत नाहीत. शेजारीच धावून येतात. मग, तो कोणत्याची जातीचा असो राहुलबाबा! देशात जातनिहाय वैयक्तिक कटूता असू शकेल. पण, सध्या शेजाऱ्यांमध्ये जातीवरून वाद नाहीत. आता त्यात तेल टाकू नका. जेवढे करत आहात तेच या देशावर तुमचे उपकार आहेत. आतापर्यंत आईच्या पदराआड राजकारण करता करता जातीच्या आड राजकारण करू नका...

९८८१९०३७६५

## प्रासंगिक

**मोरेश्वर बडगे**

# महाआघाडीत महाबिघाडीची ठिणगी

दोन वर्षांपूर्वी एकनाथ शिंदे यांनी ४० आमदार फोडून उद्धव ठाकरे यांचे सरकार पाडले. हे बंड उद्धव ठाकरे यांच्या जिव्हारी लागले. आपल्या आमदारांनी खोके घेऊन दगा दिला, असा 'नॅरेटिव्ह' त्यांनी सुरू केला. त्यातूनच '५० खोके, एकदम ओके' हा नारा जन्माला घातला. बंडखोरांना गद्दार म्हणणे, शिंदे सरकारला मिंधे सरकार म्हणणे हा प्रकारही खूप चालला. शेवटी थकले. आता आपल्याबद्दल जनतेत सहानुभूती आहे, असे सांगत ठाकरे फिरत आहेत. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत त्यांच्या उबाठा म्हणजे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने सर्वाधिक २१ जागा लढवल्या. त्यापैकी फक्त ९ जागा ते जिंकू शकले. काँग्रेसने सर्वाधिक जागा जिंकल्या. मात्र, शरद पवार यांच्या राष्ट्रवादीचा स्ट्राईक रेट सर्वाधिक होता. त्यामुळे येत्या विधानसभेसाठी तिकिटाकरिता पवारांच्या 'बुकिंग विंडो'वर रांग दिसते आहे. फोडाफोडीमध्ये शरद पवार वस्ताद आहेत. आतापर्यंत त्यांनी अनेक पक्ष, अनेक नेते फोडले. जिंकू पाहणाऱ्या घोड्यावर लोक पैसे लावतात. त्या हिशोबाने उमेदवारांचा लोंढा पवारांकडे आहे. महाआघाडी, महायुतीमुळे यावेळी जागावाटप दोघांसाठीही कमालीचे किचकट होणार आहे. हमखास जिंकणाऱ्या अनेक जागा मित्रपक्षांच्या कोट्यात गेल्याने भाजपाचीही पंचाईत झाली आहे. कोल्हापूरचे समरजीतसिंह घाटगे हे भाजपाचे जुने नेते. ते यावेळी इच्छुक आहेत. मात्र, कागलची जागा अजितदादा पवार यांच्या कोट्यात असल्याने घाटगे यांची कोंडी झाली. तेथे हसन मुश्रीफ जिंकत आले आहेत. त्यामुळे नाईलाजाने घाटगे यांनी शरद पवारांची तुतारी हाती घेतली. पुणे जिल्ह्यातील इंदापूरचे ज्येष्ठ नेते हर्षवर्धन पाटील यांचीही तशीच केस आहे. तिथेही अजितदादा गटाचा उमेदवार गेल्या दोन निवडणूक जिंकत आला आहे. देवेंद्र फडणवीस यांनी काही मधला मार्ग काढला तरच या पाटलाला रोखता येईल. अन्यथा हर्षवर्धन पाटील यांना उचलायला शरद पवार टपून बसले आहेत. अशा अनेक घाटगे, पाटलांचा शोधाशोध पवारांनी चालवला आहे. पवारांचा पक्ष म्हणजे बागायतदार, जमीनदार, सहकार सम्राटांची बांधलेली मोळी असते. त्यामुळे पक्ष अनेकदा फुटूनही पवार ५०-५५ जागा काढत आले. मग त्यांच्याकडे जाणाऱ्या नेत्यांना गद्दार म्हणायचे का? भाजपासोबत गेलेल्या आमदारांना उद्धव ठाकरेंनी गद्दार म्हटले. उद्धव आता 'शरद पवारांचे खोके, एकदम ओके' म्हणण्याची हिंमत करतील का? राजकारणात येणे-जाणे चालू असते. ज्यांना जायचे असेल त्यांना आम्ही



अडवणार नाही, असे खुद्द भाजपाचे प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी जाहीर केले आहे. विधानसभा निवडणुकीला अजून दोन-अडीच महिने आहेत. त्यामुळे कुंपणावरचे खूप सारे पुढारी इकडून तिकडे जाताना दिसतील.

महाविकास आघाडी एकत्र निवडणूक लढते आहे. मात्र, जागावाटपाचा घोळ होणारच. लोकसभेला ४८ जागा वाटताना दमछाक झाली. विधानसभेला तर २८८ जागा वाटायच्या आहेत. मुंबईमध्ये ३६ जागा आहेत. तिथलं वाटप ठरलं आहे, असे उबाठाचे प्रवक्ते खा. संजय राऊत यांनी जाहीर केले. काँग्रेसने लगेच त्याचे खंडन केले. मुंबईत काँग्रेसने १६ जागांवर दावा केला आहे. शरद पवार ८ जागा मागताहेत. मग ठाकरे यांच्यासाठी उरतं काय? तुम्ही लिहून ठेवा. यावेळी महाआघाडी नाही, महाबिघाडी होणार. शरद पवार यांच्या एका वक्तव्याचे मला नवल वाटले. आम्हाला मुख्यमंत्रिपदात रस नाही. आम्हाला फक्त निवडणूक जिंकायची आहे, असे पवारांनी मीडियाशी बोलताना सांगितले. गंमत इथेच आहे. पवारांना मुख्यमंत्रिपदात रस नाही तर मग या वयात ते एवढी धावपळ का करीत आहेत, हा प्रश्न अनेकांना पडला तर त्यांनी पवारांना ओळखलेच नाही, असे म्हणावे लागेल. शरद पवार 'हो' म्हणतात; त्याचा अर्थ 'नाही' असा घ्यायचा असतो आणि 'नाही' म्हणत असतील तर 'हो' असा घ्यायचा असतो. एका बोटावरची थुंकी दुसऱ्या बोटावर नाचवतच पवारांनी ५०-५५ वर्षे राजकारण केले आहे. ताजे उदाहरण म्हणजे शेकापचे ज्येष्ठ नेते जयंत पाटील. नुकत्याच झालेल्या विधान परिषद निवडणुकीत पवारांनी जयंत पाटलांना पाठिंबा जाहीर केला होता. मात्र, निवडून आले उद्धव ठाकरे यांचे पीए मिलिंद नार्वेकर. याला म्हणतात शरद पवार. बिचारे जयंत पाटील. या वयात शरद पवारांवर विश्वास ठेवून फजिती करून घेतली. पवारांच्या वक्तव्याने उद्धव ठाकरे यांना गुदगुल्या होत असतील. कारण त्यांना मुख्यमंत्री व्हायचे आहे. यासाठीच मुख्यमंत्रिपदाचा चेहरा आधी जाहीर करा, असा हट्ट त्यांनी चालवला आहे. आजच आपले पत्ते खुले करण्याइतके पवार कच्चे लिंबू नाहीत. अजितदादा बाहेर गेले; पण आत असलेल्या त्यांच्या अनेक सहकाऱ्यांना मुख्यमंत्री व्हायची इच्छा आहे. आजच बोलले तर प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील अस्वस्थ होतील, मग पाडापाडी होईल. पवारांना हे कळते. त्यामुळे त्यांनी सारे पत्ते खिशात ठेवले आहेत. पण या वयात एवढी धावपळ? पवारांनी राष्ट्रवादी नावाचे वेगळे दुकान लावले; त्याला २५ वर्षे झाली. पण त्यांनी कधीही मुख्यमंत्रिपदासाठी हट्ट धरला नाही. एकदा त्यांना संधी होती. तरीही त्यांनी मुख्यमंत्रिपद घेतले नाही. ते काँग्रेसला म्हणजे विलासराव देशमुखांना देऊन मलाईची खाती घेतली. मग आता त्यांना मुख्यमंत्रिपद का हवं आहे? त्याचे कारण त्यांची लाडकी कन्या खासदार सुप्रिया सुळे. पवारांनी अनेकांना मोठे केले. पण मुलीला ते मुख्यमंत्री करू शकले नाहीत. एक बाप म्हणून आयुष्याच्या सायंकाळी त्यांचे मन त्यांना खात असेल. अर्थात त्याला सुप्रियाही जबाबदार आहेत. त्या लोकप्रिय नाहीत. त्यांच्याच पक्षातले नेते सुप्रियाला मानत नाहीत. दिल्लीच्या लॉबीमध्ये शरद पवारांची मुलगी एवढीच त्यांची ओळख आहे. यावेळी मात्र काहीही करून सुप्रियाला महाराष्ट्राची पहिली महिला मुख्यमंत्री करायचे, असे पवारांनी मनावर घेतले आहे. ऐनवेळी पवार आपले पत्ते काढतील. तोपर्यंत आपल्या घटक पक्षांना संभ्रमावस्थेत ठेवायची सर्कस सुरू राहील. पवारांचा राजकीय संन्यास मुलीच्या राज्याभिषेकानंतरच होऊ शकतो. पण पवारांना उशीर झाला आहे. विमान उडाले आहे.

पवारांच्या या स्वप्नातला सर्वात मोठा अडथळा म्हणजे देवेंद्र फडणवीस. त्यामुळेच तुम्ही पाहाल शरद पवार आणि इतर सर्वांचे टार्गेट आहेत फडणवीस. मराठा समाजाच्या आरक्षणाचे आंदोलन शरद पवारांच्याच छुप्या पाठिंब्याने सुरू आहे, हेही आता लपून राहिलेले नाही. बदलापूरमध्ये मुलींवर झालेल्या अत्याचाराचे राजकारण झाले. आता कोकणात छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळला. त्यावरूनही विरोधकांनी राजकारण तापवले आहे. एकीकडे सारे विरोधी नेते आणि दुसरीकडे एकटे देवेंद्र फडणवीस असा हा सामना आहे. 'एक अकेला देवेंद्र क्या करेगा?' असे एकेकाळी सुप्रिया सुळे म्हणाल्या होत्या. देवेंद्र काय करणार? हे लांबलेल्या निवडणूक निकालात कळेल. आज काय दिसते? जवळपास आठ ते दहा राजकीय पक्ष आणि त्यांचे डझनाने बंडखोर निवडणुकीच्या आखाड्यात उतरणार आहेत. मतविभाजनाचा फायदा महायुतीलाच होईल.

९८५०३०४१२३
(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

## वाचक पत्रे

### भय इथले संपत नाही

बदलापूर अत्याचार प्रकरण, कोल्हापूर अत्याचार-हत्या प्रकरण, साताऱ्यातील आत्महत्या प्रकरण, मागील महिन्यातील यशश्री शिंदे प्रकरण यामुळे सर्वत्र भीतीचे आणि दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. आता दिवसाढवळ्या बाहेर पडणेही मुश्कील झाले आहे. या सर्व घटनांचा परिणाम शाळेत जाणाऱ्या मुलींच्या मनावर झालेला आहे. एक सत्य प्रसंग सांगायचा म्हटला तर आमच्या घरी घरकामासाठी मदतीला येणाऱ्या महिलेने सांगितले की, अशा ज्या घटना घडत आहेत त्यामुळे माझी मुलगी भीतीने शाळेत जायला तयार नाही. घाबरून मुली मनोरुग्ण झाल्या तर याला जबाबदार कोण? सरकारचे घोषवाक्य आहे की, शिकलेली आई घर पुढे नेई. प्रत्येक मुलगी भविष्यात आई होणार असते. पण ती घाबरून शिक्षण बंद करणार असेल तर ती घर पुढे कसे नेणार? या नराधमांना जन्माची अद्दल घडवायला हवी. अशा वासनाधांना कठोरातील कठोर शिक्षा देण्यासाठी सरकारला भाग पाडणे हे सुजाण नागरिकांचे प्रथम कर्तव्य आहे.

**दीपाली गीते**/९८२२००४०५४

### काँग्रेस दिशाभूल करतेय्

जम्मू-काश्मीरमध्ये होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेस आणि नॅशनल कॉन्फरन्स या दोन्ही पक्षांनी आघाडी बनवली आहे. त्यात नॅशनल कॉन्फरन्स पक्षाच्या स्वतंत्र जाहीरनाम्यात, आपल्या पक्षाचे सरकार आल्यानंतर ३७० आणि ३५अ या दोन्ही कलमांचे पुनरुज्जीवन करण्याचे स्पष्ट आश्वासन देण्यात आले आहे. याचबरोबरीने दगडफेक करणाऱ्यांना आणि अतिरेक्यांना सोडणे, पाकिस्तानबरोबर संबंध वाढवणे अशी अनेक आश्वासनेही त्यांनी दिली आहेत. मात्र, काँग्रेस पक्षाचे नेते याबाबतीत काहीही बोलायला तयार नाहीत. लग्न तर करायचे आहे आणि ब्रह्मचर्यही पाळायचे आहे, अशा अजब अडचणीत काँग्रेस पक्ष सापडला आहे. ३७० आणि ३५ अ चे समर्थन करावे तर देशभरात असंतोषाला सामोरं जावं लागेल आणि विरोध करावा तर एकट्याने काश्मीरमधील निवडणूक लढवण्याची ताकद नाही. मात्र, काहीही झाले, अगदी या आघाडीचे सरकार आले तरीही या दोन्ही कलमांचे पुनरुज्जीवन करण्याचा घटनात्मक मार्ग कायमचा बंद झाला आहे, हे दोन्हीही पक्ष जाणून आहेत. त्यामुळे काश्मीरमधील जनतेची दिशाभूल करणे, हाच या आघाडीचा उद्देश आहे, हे लक्षात येते.

**शिवराम वैद्य**/९८५०५१८०१८

### गणेशाचे विडंबन नको

गणेशोत्सव जवळ आला की, वातावरण भक्तिमय झालेले असते. याचाच फायदा घेऊन कंपन्या आपले उत्पादन खपवण्यासाठी आटोकाट प्रयत्न करतात. गणेशोत्सवाच्या काळात जाहिरातीमध्ये सर्रास गणेशाचा वापर होताना दिसतो. श्री गणेश ते उत्पादन कसं चांगला आहे, त्याची किंमत कशी कमी आहे, हे उत्पादन वापरण्याचे फायदे काय आहेत, तसेच त्याच्यावर किती डिस्काऊंट आहे, असे सांगताना दिसतो. एखाद्या चारचाकी किंवा दुचाकीची वाहनाची जाहिरात असेल तर गणेश स्वतः वाहन चालवत आहे, असे दाखवले जाते. एखादा खाद्यपदार्थ किंवा मिठाई असेल तर गणेशोत्सवाच्या काळात त्याचा नैवेद्य श्री गणेशाला दाखवल्यामुळे गणेश कसा प्रसन्न होतो, असेही दाखवले जाते. या जाहिराती म्हणजे श्रीगणेशाचा अपमान आणि विडंबनच आहे. गणेशभक्तांनी अशा जाहिरातींवर बंदी घालायला हवी आणि अशा कंपन्यांची उत्पादने न घेण्याचा ठोस निर्णय घ्यायला हवा. हाच यावरील एक जालीम उपाय आहे.

**प्रकाश जोशी**/नागपूर

### वायू प्रदूषण घटले; भारतीयांना आनंद!

जगातील सगळे देश वायू प्रदूषणामुळे त्रस्त झालेले असताना भारतीयांसाठी खूशखबर आली आहे. २०२२ मध्ये भारतातील वायू प्रदूषण १९.३ टक्क्यांनी घटले आहे. त्यामुळे भारतीयांचे आयुर्मान ५१ दिवसांनी वाढले असल्याचा निष्कर्ष शिकागो विद्यापीठाने केलेल्या अभ्यासातून पुढे आला आहे. प्रदूषण घटविण्यात भारताचा बांगलादेशनंतर दुसरा क्रमांक लागतो. अमेरिकेतील शिकागो विद्यापीठाच्या एनर्जी पॉलिसी संस्थेने २०२१ आणि २०२२ मधील जागतिक वायू प्रदूषणाचा अभ्यास केला. याबाबतचा 'एअर क्वालिटी लाईफ इंडेक्स २०२४' हा अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला. सर्वच दक्षिण आशियाई देशांमधील वायू प्रदूषण कमी झाल्याचा निष्कर्ष या अहवालातून समोर आला आहे. देशातील ज्या जिल्ह्यांमध्ये राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रम राबविला जातो, तेथील प्रदूषण १९ टक्क्यांनी घटले, तर जेथे या कार्यक्रमाचा अभाव आहे, तेथील प्रदूषण १६ टक्क्यांनी घटले, असेही शिकागो विद्यापीठाच्या या अहवालात म्हटले आहे. सार्वजनिक आरोग्य राखण्यासाठी प्रदूषण घटविणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. आपण झाडे लावून ती जगविण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. नदी, जलाशय यात कारखान्याचे दूषित पाणी न सोडता त्यावर प्रक्रिया झाली पाहिजे. आपल्याकडे त्यासाठी आवश्यक असलेले तंत्रज्ञान आणि साधनेही आहेत; पण त्याचा वापर करण्यासाठी राजकीय इच्छाशक्तीची गरज आहे. नुकतेच भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही वृक्षारोपण संदर्भात 'एक पेड मां के नाम' ही घोषणा केली आहे. त्याप्रमाणे आपणही आपल्या आईच्या नावाने एक झाड लावू या आणि ते प्रामाणिकपणे संगोपन करूया तरच देशातील प्रदूषण कमी होण्यासाठी मदत होईल.

**संतोष राऊत**/९९६०१०४३४५

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

धाराशिव
दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## राज्यस्तरीय स्पर्धेसाठी दारफळच्या जि.प. शाळेच्या मुलींची निवड

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३० ऑगस्ट -**

बारामती येथे दि.३० व ३१ ऑगस्ट ते १ सप्टेंबर कालावधीत होणाऱ्या राज्यस्तरीय सब ज्युनियर १४ वर्षाखालील स्पर्धेसाठी आसावरी घुटे, प्रगती जाधव, सिध्दी हावळे सानिका भोयटे यांची धाराशिव जिल्हा Tennikoit रिंग टेनिस संघात निवड झाली आहे.

राज्यस्तरीय स्पर्धे साठी खेळाडूंची जिल्हा संघात निवड झाल्याबद्दल मुख्याध्यापक बिभीषण पाटील, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष भैरवनाथ जाधव, पोलीस पाटील सचिन जाधव, धर्मराज जाधव, सरपंच रवींद्र जाधव



यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले.

## ▶▶संक्षिप्त वृत्त...



### भोसले हायस्कूलची नवभारत साक्षरता अभियान प्रसार व प्रचार फेरी संपन्न

**धाराशिव, दि.३० ऑगस्ट -**


शहरातील श्रीपतराव भोसले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय यांच्या वतीने भारत सरकार द्वारा नवभारत साक्षरता अभियानांतर्गत भारतीय एकही नागरिक असाक्षर न राहता शिक्षणा पासून वंचित राहू नये या करिता सदर अभियान राबविण्यात येत आहे. सदर अभियानाचा शालेय परिसरात प्रसार व प्रचार फेरीचे आयोजन करण्यात आले होते. या फेरीत प्रशालेचे मुख्याध्यापक नंदकुमार नन्नवरे, प्रशासकीय अधिकारी साहेबराव देशमुख, राजेंद्र आंबेवाडीकर, डॉ. विनोद आंबेवाडीकर, शेषनाथ वाघ, श्यामराव राठोड, दिपक केंगार, शिवाजी भोसले शिक्षक शिक्षकेत्तर विद्यार्थी उपस्थित होते.



### नागूर येथे अखंड हरीनाम सप्ताह संपन्न

**लोहारा, दि.३० ऑगस्ट -**

लोहारा तालुक्यातील नागूर येथे दरवर्षी प्रमाणे श्रावण महिण्यात हनुमान मंदिरात दि.२१ ते २७ ऑगस्ट या कालावधीत संपन्न झाला. या काळात चोवीस तास विणा मंदिरात उभा असतो. ज्ञानेश्वर ग्रंथाचे वाचन, महिलांचे भजन, प्रवचन आणि किर्तन यामुळे भक्तीमय वातावरण निर्माण झाले होते. गावातील सर्व समाजातील लोक आवडीने एकत्र येऊन हा अखंड हरीनाम सप्ताह उभा करतात यात अनेक हभप. महाराजांच्या प्रवचन आणि किर्तनाच्या श्रवणाचा आनंद गावातील जनतेला मिळतो. हभप. धनंजय रोंगे पाटील रिंगणीकर महाराज, इंद्रजीत चव्हाण महाराज कास्तीकर, हभप. लिंबराज चव्हाण महाराज कास्तीकर, हभप. ज्ञानेश्वर कोळी महाराज कास्तीकर, हभप. पाटील महाराज रिंगणीकर, हभप. श्रीहरी ढेरे महाराज यांच्या किर्तन सेवेचा तर हभप. बाबासाहेब विठ्ठलराव जाधव, हभप. यशवंत विलास चंदनशिवे, हभप. सुभाष मारूती क्षीरसागर यांच्या प्रवचनाचा लाभ सहा दिवस ग्रामस्थांनी घेतला.



### ढगपिंपरी शाळेत विद्यार्थ्यांना मोफत शालेय किटचे वाटप

**परंडा, दि.३० ऑगस्ट -**

सेवा सहयोग फाउंडेशन यांच्या सहयोगाने आज दि.२९ ऑगस्ट रोजी जि.प. प्राथमिक शाळा ढगपिंपरी येथे शाळेतील विद्यार्थ्यांना मोफत शालेय किट वाटप करण्यात आले. यावेळी विशेष सहकार्य लाभलेले असे सिध्देश्वर कोळी व शाळेचे मुख्याध्यापक दत्तात्रय सोनवणे यांच्या प्रयत्नाने हे शालेय किट मुलांना प्राप्त झाले. हे किट वाटप करताना उपस्थित सरपंच प्रज्ञा काळे, शालेय समितीचे अध्यक्ष शरद पाटील, बप्पा काळे, रविंद्र पाटील, बाळासाहेब भंडार, अनिता चिपडे, संगीता ठोगे, नम्रता हांडे, वंदना इंगळे, गणेश वाघमोडे, पुजा कात्रे, सुजाता कुंभार, डॉ. सोमनाथ शिंदे, संभाजी काळे, बिभीषण तरंगे, समाधान नागणे, बप्पा हावळे शाळेतील विद्यार्थी व गावातील समस्त ग्रामस्थ उपस्थित होते.



### तावशीगडच्या सरपंचपदी महेश घोटाळे यांची निवड

**लोहारा, दि.३० ऑगस्ट -**

लोहारा तालुक्यातील तावशीगड ग्राम पंचायतीच्या सरपंच पदी महेश घोटाळे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. महेश घोटाळे यांची बिनविरोध निवड जाहीर होताच समर्थकांनी फटाके व गुलाल उधळत आपला आनंद साजरा केला. तावशीगड ग्राम पंचायतीच्या कार्यालयात सरपंच पदासाठी निवडणूक घेण्यात आली. यावेळी सरपंच पदासाठी महेश घोटाळे यांचा एकमेव उमेदवारी अर्ज आल्याने निवडणूक निर्णय अधिकारी यांनी महेश घोटाळे यांची बिनविरोध निवड जाहीर केली. यावेळी ग्रामपंचायत तावशीगडचे ग्रामसेवक, आजी माजी सरपंच, उपसरपंच, सदस्य व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### तेर येथे मुलींना लाठीकाठी चालविण्याचे प्रशिक्षण

**तेर, दि.३० ऑगस्ट -**

धाराशिव तालुक्यातील तेर येथील जि.प. कन्या प्रशालेत लाठीकाठी चालविण्याचे प्रशिक्षण सुरू करण्यात आले आहे. मुलींना स्वसंरक्षण करता येणे गरजेचे आहे. या दृष्टीने तेर येथील जि.प. कन्या प्राथमिक शाळेत मुलींना तेर ग्रामपंचायतचे सदस्य नवनाथ पसारे यांच्या मार्गदर्शनाखाली लाठीकाठी चालविण्याचे प्रशिक्षण सुरु करण्यात आले आहे.

# तुळजाभवानी मंदीर परिसर ५४ कोटींची विकास कामांचा आरंभ होणार



### आ. राणाजगजितसिंह पाटील यांची माहिती...

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.३० ऑगस्ट -**

श्री तुळजाभवानी मंदीर परिसर विकास कामांचा आराखडा प्रक्रिया अंतिम टप्यात असुन यातील मंदिर परिसरातील विकास कामांचा निविधा १५ सप्टेंबर पर्यत बऱ्यापैकी कामाचा निविदा अंतिम होवुन वर्क ऑर्डर देण्यासाठी आपण प्रयत्नशिल राहणार असल्याची माहिती आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी बोलताना पाटील पुढे म्हणाले कि, कुलस्वामिनी आई तुळजाभवानी मातेच्या मंदीर पपरिसरातील विकास कामांसाठी ५४ कोटी रुपयांच्या काही निविदा प्रसिध्द झाल्या असुन काही होणार आहेत. पुरातत्व विभागाने या कामांची निविदा प्रसिद्ध केली आहे. एक ते दोन कामे तांत्रिक अडचणीमुळे थांबले असुन येत्या आठ दिवसात या तांत्रिक अडचणी दुर केल्या जाणार आहेत. तिर्थक्षेत्र तुळजापूर विकास कामांना अंदाजे १५०० कोटी रुपये खर्च येणार आहे. यासाठी केंद्र राज्य सीआरएस फंड तसेच आमदार, खासदार यांच्याकडे निधी मागितला जाणार आहे. तुळजाभवानी मंदीर या राज्य संरक्षित मंदिराच्या जतन व दुरुस्तीसाठी विविध कामे करण्यात येणार असुन यामुळे मंदिराचे पुरातन रूप कायम ठेवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. भूसंपादन कमी असणार आहे तिर्थक्षेत्र तुळजापूर येथील रिंगरोडच्या अंर्तबाह्य भागा लगत विकास कामे करण्याचे नियोजन आहे.

तुळजाभवानी मंदिरातील जतन व दुरुस्ती कामाचे ६ भाग म्हणजे टप्पे करण्यात आले आहेत. त्यात पहिला भागात भुयारी मार्ग, यज्ञ मंडप, सभा मंडप व भवानी शंकर मंदीर सभा मंडप व भवानी शंकर मंदीर जतन व दुरुस्ती हे ११ कोटी ३६ लाखांचे काम आहे. दुसरा भागात कार्यलयीन, प्रशासकीय इमारत, पोलीस चौकी, खुला प्रेक्षक मंच, गोमूख तीर्थ, दत्त मंदीर, मातंगी मंदीर, कल्लोळ तीर्थ, निंबाळकर महाद्वार, मार्तंड ऋषी मंदीर, टोळ भैरव मंदीर, दीप माळ, शिवाजी महाद्वार व ओवऱ्या, खंडोबा व यमाई मंदीर जतन व दुरुस्ती अशी १२ कोटी ९ लाखांची कामे आहेत.

तिसरा भागात तुकोजीबुवा मठाकडील दगडी संरक्षण भिंत, दगडी फरशी, आवश्यकतेनुसार दगडी पायऱ्या, महावस्त्र अर्पण केंद्र जतन व दुरुस्ती अशी ९ कोटी ४६ लाखांची कामे आहेत. चौथा भागात महंत तुकोजी बुवा मठावरील ओव्हऱ्या, आराध्य खोलीवरील ओव्हऱ्या, आराध्य खोली दगडी फरशी जतन व दुरुस्ती अशी ९ कोटी ४५ लाखांची कामे आहेत. पाचवा भागात मुख्य प्रवेशद्वार व जिजामाता महाद्वार जतन व दुरुस्तीचे ७ कोटी २१ लाख आणि सहावा भागात लिफ्ट व रॅम्पचे ४ कोटी २५ लाख असे ५३ कोटी ८४ लाख ४७ हजार ७ रुपयांच्या कामांना मान्यता देण्यात आली आहे. सर्व कामे पुरात्तव विभागाच्या मार्गदर्शनाखाली. छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्या जवळ तसेच शहरात चार व नॅशनल, हायवे वर चार अशा आठ कमानी उभारल्या जाणार आहेत.

सध्या श्री तुळजाभवानी मंदीर गाभारा सोनेरी करण्याचा विषय स्थगित करण्यात आला आहे. यावेळी नितीन काळे, माजी नगराध्यक्ष बाळासाहेब शिंदे, सचिन रोचकरी कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती सचिन पाटील, शांताराम पेंदे उपस्थितीत होते.

## सिद्धेश्वर विद्यालय येथे विद्यार्थ्यांच्या कष्टातून साकारली परसबाग



**तभा वृत्तसेवा**
**खसगी, दि.३० ऑगस्ट**

सिद्धेश्वर विद्यालयातील इको फ्रेंडली क्लब आणि राष्ट्रीय हरित सेनेच्या वतीने शाळेतील वीस गुंठे जमिनीवरती वांगी, टोमॅटो, हिरवी मिरची, फुलकोबी, गवार, भेंडी, पालक, मेथी, चुका अशा विविध पालेभाज्या आणि फळभाज्याची लागवड करून या परसबागेतील पालेभाज्या आणि फळभाज्यांचा इयत्ता पाचवी ते आठवी विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहारात याच भाजीपाल्याचा वापर करण्यात येणार आहे.

त्यामुळे सर्वच भाजीपाला सहजतेने उपलब्ध होणार असून विद्यार्थ्यांना सकस आणि पोषण आहार या माध्यमातून मिळणार आहे. वीस गुंठे वरती पालेभाज्या आणि फळभाज्या लागवड करणारी तालुक्यातील अशी एकमेव शाळा आहे.

त्यावेळी राष्ट्रीय हरित सेनेचे सर्व विद्यार्थी आणि इको फ्रेंडली क्लबच्या सर्व विद्यार्थ्यांनी उपस्थित राहून सर्वांनी स्वकष्टाने हा परस्पर तयार केला आहे. त्यावेळी मुख्याध्यापक माशाळे, राष्ट्रीय हरित सेनेचे गुरव, प्राध्यापक काडरामे, प्राध्यापक डाळिंबे, किरण अंकुशे, कांबळे जी.एन., सेवक एस.पी. पुजारी विष्णू गायकवाड सुरेश जमादार यांचे सहकार्य लाभले.

ही सर्व रोपे डाळिंब येतील रोपवाटेकडून आणण्यात आले. लाकडी बरोबरच खत व्यवस्थापन म्हणून भेसळ डोस देण्यात आले आहे.

## तेरणा महाविद्यालयास उत्कृष्ट क्रिडा महाविद्यालयाचा पुरस्कार




**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३० ऑगस्ट**

धाराशिव येथील तेरणा महाविद्यालयास डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर विद्यापीठाचा शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ या वर्षीचा उत्कृष्ट क्रीडा महाविद्यालय सन्मान प्राप्त झाला.

त्याचबरोबर महाविद्यालयातील मयुरी पवार आणि जान्हवी पेठे यांना खो-खो या क्रीडा प्रकारात अतुलनीय काम गिरी केल्याबद्दल उत्कृष्ट खेळाडू म्हणून सन्मानित करण्यात आले. त्यांच्या या यशाबद्दल आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक घोलक यांचा सत्कार केला.

या कार्यक्रम प्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ.जी.जी. हिडगे, डॉ. तुळशीराम उकिरडे, प्रा. बालाजी काकडे तसेच बालाजी निचळ उपस्थित होते.

## डॉ. बापूजी साळुंखे विधी महाविद्यालयात दोन दिवसीय कार्यशाळा



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३० ऑगस्ट**

डॉ. बापूजी साळुंखे विधी महाविद्यालय, आय.एल.एस. विधी महाविद्यालय पुणे, स्विस एड आणि युरोपियन युनियन यांच्या संयुक्त विद्यमाने निर्धार समानतेचा प्रकल्पा अंतर्गत दि.२९ व ३० ऑगस्ट रोजी कौटुंबिक हिंसाचार व त्या संदर्भातील कायदा आणि विविध शासकीय अशासकीय यंत्रणांच्या भूमिका या विषयावर दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

पहिल्या दिवसाची सुरुवात अमोल काळे (प्रशिक्षक) यांनी स्त्रियांवरील हिंसाचार समजून घेताना. या विषयावर विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले. प्रशिक्षणा दरम्यान अमोल काळे यांनी हिंसा म्हणजे काय? हिंसेचे प्रकार, ओळख व सत्ता आणि महिलांवरील हिंसा यांचा परस्पर संबंध याबाबत मार्गदर्शन केले. दुसऱ्या दिवसाची सुरुवात जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव वसंत यादव यांनी कौटुंबिक हिंसाचार आणि न्यायालयीन प्रक्रिया याबाबत मार्गदर्शन केले. सखी वन स्टॉप सेंटरच्या ॲड. प्रियंका जाधव यांनी सेंटर बद्दल माहिती दिली. त्यानंतर ॲड. परिक्रमा खोत यांनी कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण करणारे कायदे आणि त्यांच्या तरतुदी विविध कृती प्रकाराद्वारे विद्यार्थ्यांना समजावून सांगितल्या.

भुजंग भोसले जिल्हा संरक्षण अधिकारी महिला व बालविकास विभाग यांनी कौटुंबिक हिंसाचारातील जिल्हा संरक्षण अधिकारी यांची कर्तव्ये याबाबत मार्गदर्शन केले.

सदर कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी प्राचार्य डॉ. कायला क्रिष्णमूर्ती, प्रा.डॉ. संजय आंबेकर, प्रा. कैलास शिकारे, दिपाली चव्हाण, सुरज व्हरकट, श्रुती जाधव व बालाजी गुरव यांनी कार्यशाळेचे व्यवस्थापनाच्या नियोजनाची महत्वपूर्ण भूमिका पार पाडली. तसेच निर्धार समानतेच्या प्रकल्पातील ४५ विद्यार्थ्यांनी आपली उपस्थिती नोंदवली.

## श्रीपतराव भोसले हायस्कूलमध्ये राधा-कृष्ण वेशभूषा स्पर्धा संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३० ऑगस्ट**

श्रीपतराव भोसले हायस्कूल मध्ये कृष्ण जन्माष्टमी व गोपाल काला या दिनाचे औचित्य साधून पाचवी विभागामध्ये राधा व कृष्ण या वेशभूषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

या स्पर्धेमध्ये इ. पाचवीच्या वर्गातून १७० मुलामुलींनी उस्फुर्त सहभाग नोंदवला सर्व विद्यार्थ्यांनी अत्यंत आकर्षक अशा वेशभूषा केल्या होत्या.

विद्यार्थ्यांच्या वेशभुषा पाहून संस्था सरचिटणीस प्रेमा सुधीर पाटील, प्रशासकीय अधिकारी आदित्य पाटील व प्रशालेचे प्राचार्य नंदकुमार नन्नवरे, उपप्राचार्य संतोष घार्गे, उपमुअ पी.एन. कदम, डी.ए. देशमुख, पर्यवेक्षिका बी.बी. गुंड, एन.एन. गोरे आदी मान्यवरांनी सर्व मुला मुलींचे मनापासून कोडकौतुक केले व सर्वांच्या पाठीवर शाब्बासकीची थाप दिली वेशभुषा स्पर्धा संपन्न झाल्या.



## 'टिस'च्या विद्यार्थ्यांची नळदुर्ग महाविद्यालयात अभ्यास दौरा

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.३० ऑगस्ट**

नळदुर्ग कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय येथे टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्स येथील राज्यशास्त्र विषयाच्या विद्यार्थ्यांनी कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय नळदुर्ग येथील राज्यशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांची अभ्यास भेट घेतली.

या कार्यक्रमांमध्ये टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्स येथील डॉ. आशिष नवनीत यांनी अभ्यास भेटीच्या पाठीमागचा उद्देश विद्यार्थ्यांना सांगितला. त्यानंतर डॉ.निलेश शेरे यांनी अशा अभ्यास भेटी मधुन विचारांची देवाण-घेवाण होते आणि यातुनच विद्यार्थी प्रगल्भ होतो. तसेच या अभ्यास गटामध्ये उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल, राजस्थान दिल्ली,



केरळ या राज्यातील विद्यार्थ्यांशी आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना वैचारिक संवाद करता आला. त्यामुळे निश्चितच याचा फायदा आपल्या विद्यार्थ्यांना होईल, असे मत व्यक्त केले. यानंतर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांबरोबर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले व विद्यार्थ्यांनी विविध विषयावर चर्चा केली. महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्य डॉ. सुभाष राठोड यांनी अभ्यास गटाचे प्रमुख डॉ. आशिष नवनीत व त्यांच्यासोबत आलेले सर्व विद्यार्थी यांचा सत्कार केला.

हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्रा. बालाजी क्षिरसागर, प्रा. राजेंद्र म्हमाने, रमेश सर्जे यांनी परिश्रम घेतले.

## एसबीआय बँकेसमोर मोटरसायकलींमुळे वाहतुकीची कोंडी

### परंडा न.पा., पोलीस प्रशासनाने कारवाई करण्याची मागणी...

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.३० ऑगस्ट**

शहरातील मुख्य बाजारपेठेत असलेल्या एसबीआय बँकेसमोर रस्त्यावर मोटरसायकली लावल्याने वाहतुकीची कोंडी दररोज होत असल्याने याचा व्यापाऱ्यासह सर्वसामान्यांना मोठा त्रास सहन करीत मंडई चौक ते डीसीसी बँके पर्यंतचा मार्ग मोठी कसरत करीत काढावा लागत आहे. नगरपालिका व पोलीस प्रशासनाने याची गांभीर्याने दखल घेऊन रस्त्यावर उभी असलेल्या मोटरसायकल चालकांवर कारवाई करावी, अशी मागणी



नागरिकातून केली जात आहे.

एसबीआय बँक ही बाजार पेठेतून इतरत्र हलवावे यासाठी लोकप्रतिनिधींनी आवाज उठवला होता मात्र त्याचा काहीच उपयोग झाला नाही. ही बँक तालुक्याची असल्याने या बँकेचे मोठ्या प्रमाणावर खातेदार असुन ते बँकेच्या व्यवहारासाठी दररोज येतात. शहराच्या मध्यभागी बँक आहे या बँकेत येणाऱ्यांना आपली वाहने उभी करण्यासाठी जागा नसल्याने खातेदार बँकेच्या समोर अंरुद असलेल्या रस्त्यावर मोटारसायकली उभी करून बँकेत जातात त्यांच्या मोटरसायकलीमुळे रस्त्यावरून दुसरी वाहने जाताना वाहतुकीची कोंडी होते. त्यामुळे व्यापाऱ्यांसह सर्वसामान्य नागरीकांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. एखाद्या मोटरसायकलला धक्का लागून पडल्यास त्याचे झालेले नुकसानी भरपाई द्यावे लागते म्हणून इतर वाहन चालक जोरजोराने होर्न वाजवत असतात त्याचा मोठा त्रास सर्व सामान्य नागरिकांना व व्यापाऱ्यांना होतो.

मात्र बँकेत बसलेल्या अधिकाऱ्यांवर त्याचा काहीच फरक पडत नाही. नगरपालीका प्रशासण व पोलीस प्रशासणाने रस्त्यावर उभी असलेल्या मोटारसायकल चालकांवर कारवाई करावी, अशी मागणी नागरीकांतुन केली जात आहे.

## तेर येथे शालेय साहित्याचे वाटप

**तभा वृत्तसेवा**
**तेर, दि.३० ऑगस्ट -**

धाराशिव तालुक्यातील तेर येथे संत सेना महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त २५० वह्यांचे तेर येथील जिल्हा परिषद कन्या शाळेतील विद्यार्थीनीना वाटत करण्यात आले.

यावेळी अमोल कस्तुरे, लक्ष्मण राऊत, सुरेश माने, हरिदास झांबरे, काकासाहेब राऊत, जनकराज जगदाळे, सोमनाथ यादव, दत्ता सुरवसे, बबलू राऊत, संदीप राऊत यांच्यासह तेर येथील ग्रामस्थ उपस्थित होते.

## जुनी पेन्शन योजना व अन्य मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य
# नगर परिषद नगरपंचायत संघटनांचा बेमुदत संप

**तभा वृत्तसेवा**
**किल्लेधारूर दि.३० ऑगस्ट**

किल्ले धारूर, २९ ऑगस्ट २०२४: महाराष्ट्र राज्य नगरपरिषद नगरपंचायत संवर्ग कर्मचारी संघटनेच्या वतीने जुनी पेन्शन योजना लागू करण्याच्या मागण्या तसेच अन्य मागण्यांसाठी बेमुदत संप पुकारण्यात आले आहे.

महाराष्ट्र राज्यातील अधिकारी, कर्मचारी संघटनेच्या वतीने दिनांक २९/०८/२०२४ रोजीपासून बेमुदत संप पुकारला जात आहे.. न.प. कर्मचाऱ्यांच्या बहुतांश प्रलंबीत मागण्या बाबत शासन प्रशासन प्रमुखांकडील बैठकामध्ये वारंवार चर्चा होउन देखील, प्रत्यक्ष निर्णयास होत असलेल्या शासनाच्या अनाकलनीय विलंबामुळे संवर्ग तसेच नप

कर्मचाऱ्यांमध्ये कमालीचा असंतोष असून तीव्र स्वरूपाची नाराजी व्यक्त होत आहे त्या संपात महाराष्ट्र राज्य नगरपरिषद नगरपंचायत संवर्ग कर्मचारी संघटनेचा पूर्णपणे पाठिंबा देण्यात येत आहे. जर महाराष्ट्र शासनाने २९/०८/२०२४ रोजी हतर सर्व संघटनांनी संप पुकारला आहे, परंतु महाराष्ट्र राज्य नगरपरिषद नगरपंचायत संवर्ग कर्मचारी संघटनेच्या वतीने जर जुनी पेन्शन व यापूर्वीच्या निवेदनातील मागण्या लागू न झाल्यास हीच नोटीस समजून महाराष्ट्र राज्य नगरपरिषद नगरपंचायत संवर्ग कर्मचारी संघटना त्याचा बेमुदत संपात सहभागी होऊन सर्व ३८७ नगरपरिषद नगरपंचायती बंद करण्यात येतील याची शासनाने दक्षता घ्यावी, तसेच हीच पूर्व नोटीस समजण्यात यावी.या संपामध्ये संघटनेचे श्री.सचिन डावकर अध्यक्ष श्री. केशव नाईकवाडे उपाध्यक्ष श्री. सुदर्शन शिनगारे सचीव श्री. संजय जुजगर श्री. माणिक लोखंडे श्री. माणिक गायसमुद्रे श्री. इशरत मोमीन श्री. श्रीकृष्णा नागरगोजे श्री. विजय चटप श्री. ऋषिकेश तांबवे श्री. बापु लोखंडे श्री. भागवत डोईफोडे श्री. महेंद्र सिरसट श्री. आकाश सिरसट श्री. माणिक मा. लोखंडे श्री. जयराम गायसमुद्र श्री. विठ्ठल सिरसट श्री. ज्ञानेश्वर माने श्री. विलास डोईफोडे श्री. कैलास गायसमुद्रे श्री. गैणा शिंदे श्री. गौतम सिरसट श्रीमती शालुबाई सिरसट सहभागी होते



### २९ ऑगस्ट २०२४ पासून सुरू होणाऱ्या संपात ३८७ नगरपरिषद आणि नगरपंचायतीतील कर्मचाऱ्यांचा सहभाग

## परळी शहरात बनावट ग्रीस कारखान्यावर
# स्थानिक गुन्हे शाखेची छापेमारी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३० ऑगस्ट**

दि २८/०८/२०२४ रोजी स्था.गु.शा.बीड येथील पोलीस हवालदार विष्णु सानप यांना गुप्त बातमी मिळाली की, बसवेश्वर कॉलनी परळी येथे इमस नामे रियाज रहीम शेख हा त्याचे राहते घरात व घराचे परिसरात बेकायदेशिर रित्या दुचाकी व चारचाकी वाहनास लागणारे बनावट ग्रीस तयार करत आहे. अशी खात्रीलायक बातमी मिळालेवरुन सदरची माहिती मा.श्री.उस्मान शेख, पो.नि.स्थागुशा यांना दिली. त्यानंतर दिनांक २८/८/२०२४ व दिनांक २९/८/२०२४ रोजी सदर कारवाई करणेकामी श्री. उस्मान शेख पो.नि.स्थागुशा स्वत: व आपल्या अधिपत्याखालील अंमलदार व पो.स्टे.परळी शहर येथील अधिकारी व अंमलदार यांचे तसेच पुरवठा विभागाचे श्री.सुरेश डोईजड व पंचासह परळी शहरातील बातमी ठिकाणी पोहचुन छापा टाकला असता एका घराचे शटरमध्ये एक इसम मिळुन आला त्यास नाव विचारले असता त्याने त्याचे नाव रियाज रहीम शेख वय ३२ रा. बसवेश्वर कॉलनी बीड असे सांगितले त्यानंतर शटर व घराचे परिसरात वेगवेगळया खोलीमध्ये ऑईल व ग्रीस उत्पादने भरलेले बकेट व डब्बे दिसले सदरचे साहित्य वाहनाचे ग्रीस बनवण्यासाठी व पॅंकिग करण्यासाठी लागणारे साहित्य व कच्चे मेटरियल मिळुन आले त्यावरुन सदर इसमास नोटीस देवुन ग्रीस व आईल उत्पादनासाठी व पॅंकिगसाठी लागणारा परवाना व इतर आवश्यक कागदपत्रे दाखविण्यासाठी कळविले परंतु सदर इसमाने ग्रीस व आईल उत्पादनासाठी व पॅंकिगसाठी लागणारा परवानाचे कागदपत्र हजर केले नाही. तसेच जप्त मालामध्ये IMP-L- premium -P-3 Grease चे डब्यांवर प्लॉट नं.०२ वाळुंज एमआयडीसी औरंगाबाद, VISCO PLUS premium -P-3 Grease चे बकेटवर प्लॉट नं. १२, समता कॉलनी, परळी वैजनाथ जि.बीड व VISCO PLUS RPM² 20-W-40 चा ऑईचे डब्यावर प्लॉट नं.१२ एमआयडीसी परळी जि.बीड असा उत्पादन, पॅकींग व विक्री साठीचा पत्ता असलेले बकेट व डब्बे मिळुन आले आहेत. वास्तविक लोकांना फसवणुक करुन बनावटीकरण करण्याचे उद्देशाने वरील पत्ते टाकुन सदर बनावट ग्रीस व ऑईलचे उत्पादन हे बसवेश्वर कॉलनी परळी वै. जि.बीड येथे राहते घरी करत असतांना सदर इसम मिळुन आलेला आहे.

आरोपी रियाज रहीम शेख रा.बसवेश्वर कॉलनी परळी यांचे ताब्यातुन बनावट ग्रीस व आईल तयार करण्यासाठी लागणारे ग्रीस, वेगवेगळया रंगाचे पावडर, केमीकल व काळसर तेलकट उग्र वास येत असलेले पदार्थ असे एकुण ७,८२,०८५/- रु चे मुद्येमालासह बनावट ग्रीस व ऑईल हे त्याचे स्वत:चे घरात स्वयंपाक खोलीचे बाजुला तयार ठेवत असल्याने त्याने स्वत:च्या व इतरांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा रितीने ज्वलनीशिल पेट्रोलियम पदार्थ उत्पादन व साठवणुक करत असतांना साहित्यांसह मिळुन आल्याने त्याचे विरुध्द पो.स्टे.परळी शहर येथे कलम ३१८(४) भारतीय न्याय संहिता सह पेट्रोलियम पदार्थ कायदा १९३४ चे कलम २३ व जिवनाश्यक वस्तु अधिनियम क .३,७ प्रमाणे कायदेशीर कारवाई करण्यात आलेली आहे.

सदरची कामगिरी मा.श्री. अविनाश बारगळ पोलीस अधीक्षक,बीड , मा.श्री. सचिन पांडकर अपर पोलीस अधीक्षक बीड यांचे मार्गदर्शनाखाली पोनि श्री. उस्मान शेख स्था.गु.शा.बीड, पोह/विष्णु सानप,गणेश हांगे तसेच पो.स्टे.परळी शहर येथील सपोनि शिंदे, सपोनि गुट्टेवार, पोह/गिते, येलमटे, भताने व पुरवठा विभागाचे लिपिक श्री. सुरेश डोईजड यांनी मिळुन केलेली आहे.

## शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी पात्रुड येथे
# दोन तास रास्ता रोको आंदोलन

### वाहनांच्या लांबच लांब रांगा

**तभा वृत्तसेवा**
**पात्रुड दि.३० ऑगस्ट**

खरीप २०२० चा प्रलंबित पीकविमा तात्काळ वाटत झाला पाहिजे, खरीप २०२३ व रब्बी २०२३-२४ चा पीकविमा सरसकट सर्वांना मिळाला पाहिजे, ई-पीक पहाणीची अट रद्द करून सोयाबीन, कापसाचे अनुदान सरसकट सर्वांना तात्काळ वाटप झाले पाहिजे, शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी झाली पाहिजे, कापसाला दहा हजार आणि सोयाबीनला सात हजार हमीभाव मिळाला पाहिजे, शेतात जाण्यासाठी पाणंद रस्ते झाले पाहिजेत, गुजरवाडी ते शेंडगे वस्ती व गुजरवाडी ते सातपुते वस्ती रस्त्याचे मजबुतीकरण झाले पाहिजे, शिंदेवाडी येथील पुलाचे काम तात्काळ चालु झाले पाहिजे, लहामेवाडी गावचा रस्ता चांगल्या दर्जाचा झाला पाहिजे, भगवान नगर रस्त्याचे काम तात्काळ चालु झाले पाहिजे, टालेवाडी येथील प्रलंबित ३३ केव्ही सब स्टेशन झाले पाहिजे, राजेवाडी येथील कुंडलिका नदीवरील बंधारा तात्काळ दुरुस्त झाला पाहिजे व केंडे पिंपरी येथे नवीन बंधारा बांधला पाहिजे, पात्रुड गावचे गावठाणा फिडर तात्काळ चालु झाले पाहिजे, पात्रुड ते घळाटवाडी रस्त्याचे रुंदीकरण व मजबुतीकरण झाले पाहिजे या आणि अशा वेगवेगळ्या मागण्यांसाठी शुक्रवार दि. ३० ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी १० वा. लोणगाव फाटा, पात्रुड येथे शेतकरी नेते ॲड भाई नारायण गोले पाटील, नौमानभाई चाऊस, बालासाहेब येवले, फजलुभाई पटेल व नितीन येवले यांनी या आंदोलनाचे आयोजन केले होते. यावेळी पात्रुड, लऊळ, ढोरगाव, लोणगाव, भगवान नगर, गुजरवाडी, शिंदेवाडी, लहामेवाडी, टालेवाडी व परिसरातील शेतकरी बांधव व शेतकरी पुत्र मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थित माजलगाव तहसील प्रशासनाला मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले. आंदोलन स्थळी पोलीस प्रशासनाने चोख बंदोबस्त राखला.

## स्वा.सावरकर महाविद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३० ऑगस्ट**

येथील स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून बंकट स्वामी महाविद्यालयाचे क्रीडा संचालक डॉ. शंकर धांडे यांची उपस्थिती होती कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर हे होते. व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ. राजेश ढेरे यांची उपस्थिती होती.

याप्रसंगी बोलताना डॉ. शंकर धांडे म्हणाले की भारतीय हॉकीमध्ये मेजर ध्यानचंद यांचे योगदान अमूल्य आहे. भारतीय हॉकीला वेगळी दिशा आणि प्रेरणा देण्याचे काम मेजर ध्यानचंद यांनी केले. मैदानी खेळाची सध्या पिढीला गरज आहे.खेळामुळे आरोग्य निरोगी राहते. अध्यक्षीय समारोपात डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर म्हणाले की मेजर ध्यानचंद यांचे योगदान सर्व खेळाडूंना प्रेरणादायी आहे.शिक्षण घेत असताना अभ्यासाबरोबर खेळही महत्त्वाचा आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे क्रीडा संचालक डॉ. छत्रपती पांगरकर यांनी केले ते म्हणाले की मेजर ध्यानचंद यांचा जन्मदिवस क्रीडा दिन म्हणून साजरा केला जातो. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. विशाल नाईकनवरे यांनी केले व आभार प्रा. दिपा देशपांडे यानी मानले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील विद्यार्थी प्राध्यापक कर्मचारी यांची उपस्थिती होती.

## आज केज येथे स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कूलमध्ये
# तालुकास्तरीय शालेय व्हॉलीबॉल स्पर्धा

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.३० ऑगस्ट**

स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कूल येथे तालुकास्तरीय शालेय व्हॉलीबॉल स्पर्धाचे आयोजन करण्यात आले होते या स्पर्धेचे उद्घाटन शाळेचे अध्यक्ष श्री. अंकुशराव इंगळे साहेब यांच्या हस्ते झाले कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक श्री. कोकीळ सर प्रमुख पाहुणे श्री. चाटे सर शिक्षण विस्तारधिकारी केज शाळेचे सचिव श्री. गदळे सर उपस्थित होते यावेळी मेजर ध्यानचंद यांचे प्रतीमेचे पुजन करण्यात आले व राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा करण्यात आला.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. विनोद गुंड क्रीडा संयोजक यांनी केले या कार्यक्रमाला मार्गदर्शन श्री. श्री. चाटे सर व श्री. गदळे सर यांनी केले वेळी राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त खेळाडूना क्रीडा विषयक व व्हॉलीबॉल खेळाविषयी खेळाडूना महिती दिली यावेळी राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त शाळेतील खेळाडूचा सत्कार प्रमुख पाहुणेच्या हस्ते करण्यात आला या स्पर्धला क्रीडा शिक्षक श्री. कोंथबीरे सर, श्री शिंदे सर, श्री. जाधव सर, श्री. ढाकणे सर, श्री. जोगदंड सर श्रीमती गिरी मॅडम,श्रीमती सोनार मॅडम,उपस्थित होते.या स्पर्धेला पंच म्हणून श्री. सोनवणे सर यांनी काम पाहिले कार्यक्रमाला क्रीडा शिक्षक यांचा सत्कार श्री विनोद गुंड सर क्रीडा संयोजक यांनी केला या स्पर्धेला तालुक्यातील अनेक शाळेतील खेळाडूनी सहभाग नोंदवला .



## जिल्ह्यात १२ सप्टेंबर रोजी रात्री
# २४ वाजेपर्यंत मनाई आदेश लागू

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३० ऑगस्ट**

मराठा, ओबीसी,धनगर व इत्तर समाजाचे, राजकीय पक्षाचे, संघटनांचे विविध प्रकारचे होणारे उपोषणे,आंदोलने, सभाचे अनुषंगाने तसेच आगामी काळामध्ये पोळा सण साजरा होणार आहे तसेच सद्या जिल्हयात राजकीय हलचाली व घडामोडीमुळे मोर्चे, निदर्शने, आंदोलने,धरणे, रस्ता रोको यासारखे आंदोलने सुरु असून किरकोळ कारणावरुन तणाव निर्माण होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच सद्याच्या कालावधीत मराठा,ओबीसी,धनगर आरक्षण मागणीसाठी सर्व समाज अक्रमक आहेत. या करिता कायदा व सुव्यवस्था अबाधित राहवी यासाठी मनाई आदेश जारी करण्यात आले असल्याचे अपर जिल्हादंडाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी प्रसिध्दी पत्रकात नमूद केले आहे.

दिनांक २९ ऑगस्ट २०२४ रोजीचे ००.०१ वाजेपासून ते १२ सप्टेंबर २०२४ रोजीचे २४.०० वाजेपर्यंत बीड जिल्हयात या कालावधीत महाराष्ट्र पोलीस कायदा ३७ (१) (३) अन्वये काढण्यात येणा-या प्रतिबंधात्मक आदेशामध्ये मोर्चे, निदर्शने, आंदोलने, धरणे आंदोलने यासारख्या आंदोलनामध्ये पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तीचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येण्यास निर्बंध राहील. जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधीत राहावी या करीता कलम ३७ (१) (३ ) अन्वये मनाई आदेश जारी केला आहे.

शासकीय कर्तव्य पार पाडणा-या कर्मचा-यां व्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीस सार्वजनिक ठिकाणी किंवा त्यांच्या जवळपास खालील बाबीस मनाई करण्यात आली आहे.या अन्वये शस्त्र, सोटे ,काठी, तलवार, बंदूक, लाठया, काठया, कोणतेही दाहक पदार्थ, किंवा स्फोटके, दगड, किंवा इतर क्षेपाणस्त्रे, शरीरास इजा होणा-या वस्तू बाळगण्यास मनाई करण्यात आली आहे. आवेशी भाषणे, अंगविक्षेप, विडांबनात्मक नकल, सभ्यता, नितिमत्ता यास बाधा येईल किंवा ज्यामुळे राज्याची सुरक्षिता धोक्यात येईल, किंवा अराजकता माजेल अशी चित्रे, निशाणी, घोषणा फलक किंवा इतर कोणतीही वस्तू जवळ बाळगू नये.जाहिरपणे घोषणा करणे, गाणी म्हणणे, वाद्य वाजविणे किंवा कोणतीही कृती जे देशाच्या संविधानातील मुल्यांच्या विरुध्द असेल किंवा देशाचा मान व सार्वभौमत्व यांना इजा पोहचणार असेल किंवा सार्वजनिक सुरक्षा आणि सामाजिक सलोखा यांना हानी पोहचणारी असेल, व्यक्तीच्या किंवा शवांच्या किंवा प्रेते किंवा आकृती,किंवा त्यांच्या प्रतिमा यांचे प्रदर्शन यासाठी मनाई आहे. पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येता येणार नाही, मिरवणूका मोर्चे काढता येणार नाही. कोणताही मोर्चा, सभा, मिरवणूक व तत्सम कोणतीही कृती करण्यासाठी त्या क्षेत्रातील सक्षम पोलीस अधिका-यांची पूर्वमान्यता घेणे आवश्यक राहील. तसेच विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणूकीस लागु राहणार नाहीत व अशी कोणतीही मनाई राज्य शासनाच्या मंजूरीशिवाय १५ दिवसापेक्षा जास्त मुदतीपर्यंत अमलात राहणार नाही.

## सन २०१८ चा पिकविम्याची रक्कम देण्यासाठी टाळाटाळ करणाऱ्या
# विमा कंपनीला जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाकडून रक्कम अदा करण्याचे आदेश

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३० ऑगस्ट**

मौजे कुंबेफळ येथील शेतकरी सुरेखा रतन थोरात यांना इ.स.२०१८ मधील पिकविमा नुकसानभरपाईची रक्कम मिळालेली नव्हती त्यामुळे त्यांनी ॲड.बालाप्रसाद सारडा यांच्या मार्फत जिल्हा ग्राहक आयोगामध्ये तक्रार दाखल केली असता त्या तक्रारीची दखल घेवून सदरील ग्राहक आयोगाचे अध्यक्ष श्री.हरीश गो.अडके व सदस्या सतिका ग.शिरदे यांनी ओरिएंटल इन्शुरन्स कंपनी लि.ला सुरेखा रतन थोरात यांना रक्कम रु.६६ हजार ९७७ देण्याचे आदेशित केलेले आहे.



याबाबत सविस्तर माहिती अशी की, सुरेखा थोरात यांची मौजे कुंबेफळ ता.केज जि.बीड येथे गट क्र.४३ मध्ये शेतजमीन आहे. खरीप हंगाम २०१८ या काळासाठी तिने ओरिएंटल इन्शुरन्स कंपनीकडून पिकाच्या नुकसानीसाठी पिकविमा घेतलेला होता. सदरील वर्षी पिकांचे नुकसान झाल्यामुळे कुंबेफळ येथील बर्याच शेतकर्यांना विम्याची रक्कम मिळाली होती तसेच विमा कंपनीने विम्याची रक्कम तक्रारदार यांच्या खात्यात वर्ग केली आहे असे सांगितले परंतू थोरात यांना सदरील रक्कम मिळाली नव्हती त्यामुळे त्यांनी जिल्हा ग्राहक तक्रार आयोगात तक्रार दाखल केली. सदरील तक्रारीमध्ये विमा कंपनी व स्टेट बँक ऑफ इंडिया या दोघांनीही आपले म्हणणे व आपली बाजू मांडली सर्व पक्षाची बाजू ऐकून मा.ग्राहक तक्रार निवारण आयोग यांनी सुरेखा रतन थोरात यांना विमा कंपनीने ६६ हजार ९७७ रुपये निकाल दिनांकापासून ४५ दिवसात देण्याचे आदेशित केलेले आहे यामुळे संबंधित विमा कंपनीला ग्राहक आयोगाचा चांगलाच दणका बसला आहे. सदर पिकविम्याची रक्कम मिळण्यासाठी मौजे कुंबेफळ येथील सरपंच विष्णु थोरात यांनी तक्रारदार यांच्यासाठी पाठपुरावा केला तसेच सदरील तक्रारदार यांच्यातर्फे ॲड.बालाप्रसाद सारडा यांनी काम पाहिले.

## जिनियस इंग्लिश स्कूल येथे दहीहंडी उत्सव जल्लोषात साजरा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३० ऑगस्ट**

जिनिअस इंग्लिश स्कूल व समर्थ नर्सिंग स्कूल बापुजी नगर नगर धानोरा रोड बीड येथे श्रीकृष्ण जन्माष्टमी व दहीहंडी उत्सव उत्साहात संपन्न झाला या जन्माष्टमी महोत्सवामध्ये सर्व शिक्षकांनी श्रीकृष्ण जन्म ते सुदामाची भेट हे सर्व प्रसंग नाटकाच्या स्वरूपामध्ये विद्यार्थ्यांसमोर सादर केले ही आगळीवेगळी कल्पना आमच्या प्राचार्या आदरणीय देशपांडे मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षकांनी कृष्णाचा जन्म बालपण ते सवंगडी राधा कृष्णाचं नातं सुदामाचं आणि कृष्णाचं नातं अगदी सहज आणि उत्कृष्टरित्या नाटकाच्या स्वरूपात सादर करण्यात आला त्याचबरोबर शाळेतील सर्व मुलींनी तसेच मुलांनी दहीहंडी फोडून दहीहंडी उत्सव जल्लोषात साजरा केला या कार्यक्रमासाठी सर्व शिक्षकांनी बहुमूल्य योगदान दिले या कार्यक्रमाला बहुसंख्य पेरेंट्स उपस्थित होते सर्व विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमात उत्साहाने सहभाग नोंदवला.

# अशे जगावे ते लोकांच्या कायम स्मरणात राहावे : पु.अक्षय ऋषी महाराज

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३० ऑगस्ट**

जगनाराने अशा रीतीने जगावे. त्यातून प्रत्येकाने काहीतरी शिकून घ्यावे. जे जगणे व मरणे या दोन्हीह विषयात असावे. जीवन एक अजब कहानी आहे. जन्माशिवाय जन्माच्या कहाणीचा प्रारंभ ही होत नाही आणि मरणाच्या डगरीवर या जीवनाच्या कहाणीचा शेवट निश्चित रूपात आहे. अशीच जन्माची कहाणी भगवान श्रीकृष्णाची आहे. आज त्यांचा जन्मदिवस जो गोकुळाष्टमी नावाने लाखो करोडो लोक साजरा करतात. ज्या दिवशी जन्माला आपण येतो. त्यादिवशी महोत्सव साजरा केला जात नसतो. मात्र त्या जन्मानंतर त्याच्याकडून घडलेल्या कार्याने लोकांची डोळे जर दिपवले गेले असतील नाव लौकीक मिळवला असेल तर तो जन्म दिवस लोकांच्या कायम स्मरणात राहून चिरंतन स्वरूपात साजरा केला जातो. म्हणूनच असं जगावं की लोकांच्या कायम स्मरणात असावं जन्म तर निश्चित आहे. मरणही निश्चित आहे. कर्म करणाराचे स्मरण सुद्धा निश्चित आहे. मनुष्य जीवन मिळवणे हे बहुमूल्य आहे. .म्हणून आपण आपल्या जगण्यात विवेक ठेवायला हवा. असे मत चातुर्मास निमित्त बीडच्या जैन भवन मध्ये आयोजित प्रवचनातून पु. अक्षय ऋषी महाराज यांनी व्यक्त केले.

प्रत्येक मानावाने आपले आयुष्य हिर्याप्रमाणे चमकणारे ठेवावे. जे त्याची पैलू सद्गुणाच्या सत्कर्मात घासून अलंकाररुपी जीवनाच्या कोंदनात अलंकृत असे ठेवावे. पण दुष्कर्माचे बियाणे रोपन करून दुष्करमाचं उत्पन्न घेऊन आपलं आयुष्य का बरं ! वाईट रीतीने घालवावं असा प्रश्न उपस्थित करत अक्षय ऋषी महाराज म्हणाले की, विषारी सर्प डंक मारल्यानंतर थोडावेळ वेदनेतुन शांत करतो. मात्र दुष्कर्म रुपी भुजंगाचे डंक ही जीवनाला त्याच्या नशेमध्ये आयुष्यभर गुंतवून ठेवून आपले आयुष्य नष्ट करतात. वाईट कर्म त्याचे विष जन्म जन्मांतर कष्ट देतात. या मूल्यवान जीवाला लोकांच्या मदतीला पडून सालंकृत करावे हे सांगताना ते म्हणतात कुरु देशाचा राजकुमार मृगयेला आरण्यात जातो. त्यावेळी एका नरभक्षाकडून एक जीव त्या ठिकाणी अचानक पडतो तो जीव घाबरलेला भयभीत अवस्थेत पाहून क्षत्रिय बाणा निडर असणाराच्या डोळ्यात आसवे येतात. त्याला आसवे येण्याचे कारण विचारतात. तो सांगतो मला मरणाची भीती नाही मरण तर केव्हातरी येणारच आहे. मात्र आता मी ज्या कार्यासाठी जात आहे हे कार्य मला माझ्या मरणापेक्षा महत्त्वाचे वाटत आहे. कारण मी एका ब्राह्मणाच्या मदतीसाठी जात आहे आणि हे कार्य जर माझ्या हातून घडले तर मला माझ्या जीवनात धन्यता वाटेल म्हणून मला ते कार्य होत नाही याची काळजी वाटत आहे. मी ही कार्य झाल्यानंतर आपणास सोबत येण्यास तयार आहे. कृपया मला परवानगी द्यावी मी आपणास त्या प्रकारची वचन देत आहे. मी हे वचन पाळणार हे ऐकून नरभक्षीने विचार केला काही दिवसाचा प्रश्न आहे तो जीव परत येईल परत आल्यानंतर त्या जीवाला प्रसन्न होते, हे पाहून नरभक्षीने सांगितले हा तर मरणाला भीत नाही रडतही नाही प्रसन्न आहे. त्यावर तो जीवं सांगतो मला मृत्यूचे भय नाही मी पाप कर्म केलेले नाही, जो पाप कर्म करतो तोच भीऊन मृत्युला घाबरतो. या दृष्टांतावर महाराजांनी सांगितले जेथे जन्मच नाही तेथे मरणही नाही.

# शेतकऱ्यांचा रखडलेला विमा तत्काळ खात्यावर जमा करण्याची मागणी

## अखील भारतीय किसान काँग्रेसच्यावतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० ऑगस्ट**
जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांचा पीकविमा रखडलेला आहे. वारंवार आंदोलने करूनही शेतकऱ्यांच्या वीमा मिळाला नाही. शेतकऱ्यांच्या खात्यावर तत्काळ वीमा जमा करावा या मागणीसही इतर मागण्यांसाठी अखील भारतीय किसान काँग्रेसच्यावतीने जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांना निवेदन सादर करण्यात आले.
जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या विविध समस्या आणि मागण्यांसंदर्भात शुक्रवारी अखील भारतीय किसान काँग्रेसचे पदाधिकाऱ्यांनी जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांना निवेदन सादर केले. यामध्ये जलजीवन मिशनच्या कामात भ्रष्टाचार करणाऱ्या अधिकारी आणि कंत्राटदारावर कार्यवाही करावी, पेट्रोल, डिझेल आणि जीवनाश्यक वस्तु यांची वाढलेले भाव कमी करावेत, शेतमालाला उत्पन्नावर आधारीत भाव द्यावा, नाफेड केंद्र चालू करण्यात यावे, मालवण येथील छत्रपती शिवाजी महाराज पूतळा कोसळल्याप्रकरणी संबंधित अधिकारी, कंत्राटदारावर कार्यवाही करावी, वसमत येथील राष्ट्रवादीच्या सभेप्रसंगी मराठा बांधवावर केलेल्या लाठीचार्जची चौकशी करावी, शेतकऱ्यांना पीककर्ज देण्यासाठी बँकाना आदेशीत करावे, मंजूर झालेले गोठे, विहीरी यामध्ये दलाली करणाऱ्यावर योग्य ती कार्यवाही करावी, घरकुलाचे अनुदान तीन लाख रूपये करावे, सीएस सेंटरवर नियंत्रण ठेवावे, नवीन सोलर तत्काळ देण्यात यावेत, कुणबी नोंदी सापडलेल्यांना प्रमाणपत्रे देण्यात यावेत, जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांच्या रिक्त जागा तत्काळ भराव्यात, जळालेले रोहीत्र, झुकलेले पोल, तारा तत्काळ दुरूस्त कराव्यात आदी मागण्यांचा समावेश आहे. यावेळी किसान काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष एकनाथ शिंदे, उपाध्यक्ष नामदेव जाधव, बालासाहेब नायक, विठ्ठल मुटकुळे, फुलाजीराव शिंदे, गणेश मुटकुळे, प्रल्हाद शिंदे, आनंदा पवार, बालासाहेब सवंडकर, बद्रीनाथ घोंगडे सुभाष चाटसे आदीसह शेतकरी उपस्थित होते.

# वसमत शहरात तीन लाखांचा प्रतिबंधित गुटखा जप्त



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० ऑगस्ट**
वसमत शहरातील काजीपुरा भागात एका ठिकाणी वसमत शहर पोलिस आणि स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने छापा मारून ३ लाख १३ हजार ९०० रूपयांचा शासनाने प्रतिबंधीत केलेला गुटखा पकडला.
पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे साहेब यांचे आदेशाने जिल्हयात अवैद्य धंदे विरूध्द विशेष मोहीम राबविण्यात येत असुन हिंगोली जिल्हयातील अवैध धंद्याच्या शोध घेवुन त्यावर कठोर कार्यवाही करण्यात येत आहे. दि ३० ऑगस्ट रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि. विकास पाटील यांनी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला अवैध धंद्याची माहिती काढुन कार्यवाही करण्याचे आदेश दिल्यावरून, गुन्हे शाखेचे पथक वसमत शहर व परिसरात रात्रगस्त पेट्रोलींग करीत असतांना गोपनिय माहिती मिळाली की, इसम नामे इम्रान खान आयुब खान पठाण, वय २४ वर्ष, रा. काजीपुरा, वसमत हा स्वतःच्या घरामध्ये शासनाने प्रतिबंधीत केलेला गुटख्याची साठवणुक केली आहे अशी खात्रीलायक माहिती मिळाल्यावरून स्थानिक गुन्हे शाखेचे व पो.स्टे. वसमत शहरचे पथक संयुक्तरीत्या मिळालेल्या माहितीच्या ठिकाणी काजीपुरा, वसमत येथे पहाटे ०३.३० वा. छापा मारला असता सदर ठिकाणी महाराष्ट्र शासनाने प्रतीबंधीत केलेला राजनिवास, गोवा, विमल, वजीर असा एकुण ३,१३,९०० रू चा मुद्देमाल मिळुन आला. सदरचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन गुटखा साठवणुक करणारा इसम नामे इम्रान खान आयुब खान पठाण, वय २४ वर्ष, रा. काजीपुरा, वसमत याचेविरूध्द शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यानंतर सुध्दा अवैध धंद्याविरूध्द कठोर कार्यवाही करण्यात येणार असल्याचे पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी सांगीतले आहे.
सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती अर्चना पाटील, पो. नि विकास पाटील, स्था.गु.शा. यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे सपोनि शिवसांब घेवारे, पोलीस अंमलदार नितीन गोरे, आकाश टापरे, आजम प्यारेवाले, नरेंद्र साळवे, हरिभाऊ गुंजकर तसेच पो. स्टे. वसमत शहरचे सपोउपनि शेख हकिम, शेख नयर, राठोड, मपोशि, सिता पोले यांच्या पथकाने केली आहे.

# क्षयरोगमुक्त ग्रामपंचायत अभियानासाठी एकत्रित प्रयत्नांची गरज– अप्पर जिल्हाधिकारी खुशालसिंह परदेशी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० ऑगस्ट**
क्षयरोगापासून आपले गाव, आपला तालुका तसेच आपला जिल्हा मुक्त करण्यासाठी गाव पातळीपासून सर्वांनी एकत्रित प्रयत्न करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी खुशालसिंह परदेशी यांनी केले.
राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमाअंतर्गत क्षयरोगमुक्त ग्रामपंचायत कार्यक्रमा अंतर्गत जिल्ह्यातील ४१ ग्राम पंचायतीना क्षयरोगमुक्त ग्रामपंचायत म्हणून घोषित करण्यात आले आहे. या सर्व ग्रामपंचायतींचा जिल्हा नियोजन सभागृहात गौरव करण्यात आला. या कार्यक्रमासाठी अप्पर जिल्हाधिकारी खुशालसिंह परदेशी, मुख्य कार्यकारी अधिकारी अनुप शेंगुलवार, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. कैलास शेळके, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. नितीन तडस, डॉ. कौस्तुभ दासगुप्ता, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. देवेंद्र जायभाये, डॉ. अभिजीत बांगर, सर्व गट विकास अधिकारी, सर्व तालुका आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी यांच्यासह ग्रामपंचायतीचे सरपंच तसेच आशाताई उपस्थित होत्या.
यावेळी जिल्हाधिकारी परदेशी पुढे बोलताना म्हणाले, आपला भाग टीबीमुक्त करण्याची प्रत्येकाची जबाबदारी आहे. केवळ सार्वजनिक आरोग्य विभागावर अवलंबू न राहता आपण आपल्या परिसरातील नागरिकांना उत्तम आरोग्य सेवा प्रदान केल्या पाहिजेत, सर्वात चांगल्या आणि दर्जेदार आरोग्य सेवा प्रदान केल्यामुळेच आज आपण या ग्राम पंचायत टीबी मुक्त करु शकलो आहोत. हिंगोली जिल्ह्यातील टीबी विभाग हा सर्व आधुनिक यंत्रणांनी संपन्न असल्याने सर्व तपासण्या आणि औषधोपचार देखील मोफत केले जातात. याचा सर्व नागरीकांनी लाभ घेतला पाहिजे. जिल्ह्यात येत्या सप्टेंबर महिन्यापासून टीबी मुक्तीसाठी लसीकरण कार्यक्रमाची सुरुवात होणार आहे. सर्वांनी ही लस घेतली पाहिजे आणि आपला जिल्हा टीबी मुक्त म्हणून राज्य पातळीवर आला पाहिजे. यासाठी कोणतीही शंका असेल तर टीबी विभागाशी संपर्क करून आपण ही लस घेतली पाहिजे. जेणे करून भविष्यात आपल्याला टीबी होणार नाही याची दक्षता आरोग्य विभाग घेणार आहे. परंतु यासाठी सर्व नागरिकांनी विभागाला सहकार्य करणे गरजेचे आहे. टीबी आजाराबाबत जास्तीत जास्त जनजागृती करुन आपला जिल्हा टीबीमुक्त करण्यासाठी एकत्रित प्रयत्नाची गरज आहे. हिंगोली जिल्हा राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमाच्या अंमलबजावणीत राज्यात दुसऱ्या क्रमांकावर आहे. तसेच हिंगली जिल्हा एसएनसी उपक्रमात कास्यपदकासाठी पात्र ठरला आहे.



**हिंगोली– नूतन जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांची भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी सदीच्छा भेट धेत त्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. यावेळी अ‍ॅड के के शिंदे, शहराध्यक्ष कैलाशचंद काबरा, अ‍ॅड अमोल जाधव, युवा जिल्हाध्यख पप्पू चव्हाण यांची उपस्थिती होती.**

## संक्षिप्त वृत्त

### आरती देवकते यांना राज्यस्तरीय नागरीरत्न पुरस्कार



हिंगोली– जिल्हा परिषद प्राथमिक शाळा लोहगाव येथे प्राथमिक शिक्षिका म्हणून कार्यरत असणाऱ्या उपक्रमशिल शिक्षिका सौ.आरती रामप्रसाद देवकते यांना महात्मा ज्योतिराव फुले शिक्षक परिषदेमार्फत दिला जाणारा राज्यस्तरीय नागरीरत्न पुरस्कार २०२४ जाहीर झाला असून दि.८सप्टेंबर२०२४ रोजी कुसुम सभागृह, नांदेड या ठिकाणी पुरस्कार वितरण सोहळा संपन्न होणार आहे. सूर्यकांताताई पाटील, श्रीमंत भुषणसिंह राजे होळकर,जयप्रकाश दांडेगावकर, गिरीषभाऊ जाधव, डॉ नागेश कल्याणकर व आयोजक व्यंकटराव जाधव यांच्या उपस्थितीत हा पुरस्कार वितरण सोहळा संपन्न होणार आहे.

### राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संगम व पथसंचलन

हिंगोली– राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, जिल्हा हिंगोली (आरएसएस) द्वारा हिंगोली शहरामध्ये बाल संगम व पथसंचलन दि १५ सप्टेंबर २०२४ रविवार रोजी आयोजित करण्यात आले आहे. या संगमाचे एकत्रीकरण जिल्हा परिषद शाळा मैदानावर सकाळी १० वाजता होणार आहे व त्यानंतर तेथुन पथसंचलन निघणार आहे. पथसंचलन शहराच्या मुख्य मार्गावरून पदक्रांत करणार आहे. तसेच या संचालनाचा समारोप जिल्हा परिषद शाळा मैदानावर होईल व त्यासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ चे ज्येष्ठ स्वयंसेवक मार्गदर्शन करतील. या संगमास वय १२ ते १७ वर्ष वयोगटातील (वर्ग ७ वी ते १२ वी ) बाल स्वयंसेवक भाग घेऊ शकतील. पुण्यश्लोक आहिल्याबाई होळकर यांच्या जीवनाचा आदर्श आणि त्यांच्या कार्याची ओवी लक्षात घेऊन हा कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला आहे. या माध्यमातून भारतीय संस्कृतीचे संवर्धन आणि हिंदुचे शक्ति प्रदर्शन करण्याचे उद्दिष्ट आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, जिल्हा हिंगोली यांच्यातर्फे सर्व हिंदू बांधवांना आवाहन करण्यात येते की आपण या संगमामध्ये व पथसंचलनामध्ये आपल्या पाल्यांना गणवेशासह सामील करावे.

### कोनाथा येथे चोरांचा धुमाकुळ

वसमत– तालुक्यातील कोनाथा येथे मध्यरात्री गावामध्ये अज्ञात व्यक्ती आले होते. मध्यरात्रीच्या सुमारास त्यांनी गावात शिरून मोटर सायकल शामराव पौळ यांची मोटरसायकल त्यांच्या राहत्या घरून एम एच ३८ एजी ४३ ३१ या क्रमांकाची गाडी रात्री चोरीला गेली व तसेच शेतामध्ये बालाजी साखरे यांच्या दोन शेळ्या यांच्या आखाड्याहून चोरांनी लंपास केल्या संभाजी बेडे यांची एक शेळी त्यांच्या शेतातून चोरट्याने नेली. चोरीच्या एकामागोमाग घडल्या आहेत. गावात सध्या भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. हट्टा पोलीस स्टेशन येथे अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. पुढील तपास हट्टा पोलीस ठाण्याचे पोलिस करीत आहेत.

# बैल पोळा, गणेशोत्सव, गौरी सणानिमित्त बाजारपेठेत विक्रीसाठी विविध साहीत्य



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० ऑगस्ट**
बैलपोळा, श्री गणेशोत्सव तसेच गौरीपूजनानिमित्त येथील गांधी चौक, जवाहर रोड आदी भागात विविध साहीत्य विक्रीसाठी आले असून खरेदीसाठी नागरिकांची गर्दी होत आहे.
दि २ सप्टेंबर रोजी बैल पोळा असून बाजारात बैलांसाठी सुंदर आणि आकर्षक झुली, घुंगरमाळा तसेच शिंगांना लावण्यासाठी रंग, दोऱ्या आदी साहीत्य विक्रीसाठी आले आहेत. ग्रामीण भागातून शेतकरी या दुकानांवर खरेदीसाठी गर्दी करीत असतांना दिसत आहे. तसेच घरोघरी बैलपोळा साजरा करण्यात येत असल्यामुळे मातीपासून बनवलेली बैलांच्या सुंदर जोड्या, गाय वासरू खरेदी करण्यासाठी नागरिक येत आहेत. याच महिन्यात गणेशोत्सवाला सुरूवात होणार असून यानिमित्त येथील बाजारपेठेत सुंदर आणि आकर्षक विविध आकाराचे आणि उंचीचे गणपती लोकांचे लक्ष वेधून घेत आहेत. इलेक्ट्रीकल दुकाने, जनरल स्टोअर आदीवर सजाववटीसाठी साहीत्य आले आहेत. तसेच गौरीपूजनासाठी गौरीचे आकर्षक आणि सुंदर मुखवटे, हात तसेच इतर साहीत्य मोठ्या प्रमाणात विक्रीसाठी आल्यामुळे बाजारपेठ साहीत्यांनी फुलून गेल्याचे दिसत आहे.

# सिध्दीविनायक गणपती मंदिर परिसरात सभागृहासाठी ३० लाखांचा निधी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० ऑगस्ट**
शहरातील नगरपरिषद वसाहत सिद्धिविनायक गणपती परिसरात आ. तान्हाजीराव मुटकुळे यांच्या प्रयत्नांने सभागृहासाठी ३० लाख रुपये मंजूर करण्यात आला. या सभागृहाचे भूमि पूजन भाजपाचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी माजी नगराध्यक्ष बाबारावराव बांगर, जिल्हा सरचिटणीस उमेश नागरे, प्रशांत सोनी, विश्वनाथराव घुगे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये कार्यक्रम संपन्न झाला. याप्रसंगी या परिसरातील कर्मचारी सुमित बांगर, सुधाकर पाटील, गणेश गंगावणे, दसरथ हरणे, अशोकराव काळे, तुळशीराम तारे, शुभम राठोड, सुरेश घुगे, केदार गुरु, अशोक गुरु, विजय काळे कैलास ठीठे, उमेश वर्मा, इंदुताई शिंदे सुमनबाई सुकते, बेबी गायकवाड ,जमुनाबाई बनसोडे, प्रयगबई तायडे, नंदाबाई मस्के, बबिता गायकवाड, अमोल शेळके, गणेश गायकवाड आदी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे नियोजन निखिल बांगर यांनी केले होते.

# जलतरण स्पर्धेत महात्मा ज्योतिबा फुलेचा सावता गाभणे प्रथम



**तभा वृत्तसेवा**
**कळमनुरी, ३० ऑगस्ट**
जिल्हास्तरीय स्विमिंग स्पर्धा जिल्हा क्रीडा संकुल लिंबाळा (मक्ता) हिंगोली या ठिकाणी संपन्न झाल्या. त्यामधे कळमनुरी येथील महात्मा ज्योतिबा फुले कनिष्ठ महाविद्यालय सावता विठ्ठल गाभणे हा १९ वर्षे वयोगटात स्विमिंग मध्ये जिल्हास्तरीय स्पर्धेत २०० मीटर फ्रीस्टाइल स्पर्धेत जिल्ह्यातून प्रथम क्रमांक पटकावत त्यानेच १०० मीटर बॅक स्ट्रोक जलस्तरण मध्ये जिल्ह्यातून प्रथम क्रमांकाचे घव घवघवीत यश मिळविले आहे. त्याच्या या यशाबद्दल त्याचे व मार्गदर्शक शिक्षक प्रा ए टी पवार, डी आर ढोकणे यांचे सर्वत्र कौतुक होत असून या निमित्याने हु बहीर्जी स्मारक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा आ जयप्रकाश दांडेगावकर साहेब सचिव पंडितराव देशमुख माजी आमदार कोषाध्यक्ष मा उमाकांत शिंदे वापटीकर यांचेसह सर्व संचालक मंडळाने अभिनंदन केले आहे. या भूषणावह कामगिरी बद्दल शाळा समितीचे अध्यक्ष अँड अशोकराव सावंत, कनिष्ठ महाविद्यालयाचे अध्यक्ष शरद सावंत व सर्व सदस्य यांचेसह प्राचार्य तान्हाजी जगताप यांनी बारावी विज्ञान शाखेत शिकत असलेल्या सावता गाभणे या जलतरणपटू चे अभिनंदन केले आहे. विद्यालयाच्या वतीने पर्यवेक्षक एस मुलगीर, पर्यवेक्षक रउफ शेख, सुनिल ठाकरे यांच्यासह सर्व प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आनंद व्यक्त केला आहे.

# हिंगोलीतील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरू करण्याबाबत बैठक



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० ऑगस्ट**
येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरू करण्याबाबत शासनाचे लक्ष वेधण्याकरीता शहरातील व्यापारी, प्रतिष्ठित नागरिक, राजकीय पक्षाचे पुढारी तसेच पत्रकार यांची बैठक पार पडली. यावेळी तत्काळ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरू करण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करण्यात येणार असल्याचे ठरले.
मागील दोन वर्षापासून मंजूर असलेले हिंगोलीचे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय यंदाही सुरू होऊ शकले नाही. वैद्यकीय प्रवेशाची पहिली फेरी होऊनही हे प्रकरण शासन दरबारी प्रलंबित आहे. स्थानिक प्रशासन व राज्य शासन याकडे लक्ष देत नसल्याची जनभावना हिंगोलीत तयार झाली आहे. हिंगोलीचे वैद्यकीय महाविद्यालय चालू शैक्षणिक वर्षातच सुरू व्हावे. यासाठी हिंगोलीकरांच्या या मागणीकडे शासनाचे लक्ष वेधणे आवश्यक असल्याने हिंगोलीतील पत्रकार, व्यापारी व सामाजिक कार्यकर्त्यांनी पुढाकार घेऊन या बैठकीचे आयोजन केले होते.
शुक्रवारी दुपारी १ वाजता येथील हॉटेल गणेश इन च्या सभागृहात ही बैठकीत जोरदार चर्चा करण्यात आली. यावेळी माजी नगराध्यक्ष जगजीतराज खुराणा, सुधीरअप्पा सराफ, डॉ किशन लखमावार, डॉ जयदीप देशमुख, पत्रकार नंदकिशोर तोष्णीवाल, तुकाराम झाडे, वसंत भट्ट, प्रद्युम्न गिरीकर, गजेंद्र बियाणी, अनिल नैनवाणी, सोनी यांच्यासह व्यापारी, प्रतिष्ठित नागरिक यांची उपस्थिती होती.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# भटक्या व विमुक्तांना समाजाच्या प्रवाहात आणण्यासाठी सर्वांचा सहभाग महत्वाचा : राऊत

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,३० ऑगस्ट -**

रोजच्या जगण्यासाठी हातावर पोट घेवून संघर्ष करणाऱ्या भटक्या विमुक्तांना शासकीय योजनाचा लाभ मिळावा, त्यांना रहिवासी प्रमाणपत्रा सोबतच इतर सर्व प्रमाणपत्र मिळावेत यासाठी शासन- प्रशासन प्रयत्नशिल आहे. तसेच भटक्या विमुक्तांना शासकीय योजनांचा लाभ मिळून त्यांना समाजाच्या प्रवाहात आणण्यासाठी सर्वांचा सहभाग खूप महत्वाचा असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी केले.

आज महाराजस्व अभियानातर्गंत भटक्या व विमुक्त जातीतील लोकांना जातीचे प्रमाणपत्र, रहीवासी व शिधापत्रिका वाटपाचा कार्यक्रम त्यांच्या हस्ते तहसिल कार्यालयात झाला. यावेळी ते बोलत होते. यावेळी उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ, तहसिलदार संजय वारकड, भटके व विमुक्त जाती जमातीचे महाराष्ट्राचे उपाध्यक्ष देविदास हादवे, पारंपारिक वेशभुषा परिधान केलेले वासुदेव, गारुडी, मसणजोगी, जोशी, गोंधळी, पारधी, भोई समाजातील नागरिक आदीची उपस्थिती होती.



भटक्या विमुक्त जातीतील लोकाकडे कुठलाच पुरावा नसतो. त्यामुळे त्यांना रहीवासी प्रमाणपत्र मिळत नाही. म्हणून ते योजनांपासून वंचित राहण्याची शक्यता असते. यासाठी मागील काळात जिल्ह्यातील बळीरामपूर, चौफाळा, लोहा तालुक्यातील किवळा येथे शिबिराचे आयोजन करुन अनेक लोकांना रहीवासी प्रमाणपत्रासोबत इतर आवश्यक प्रमाणपत्राचे वितरण केले आहे. प्रमाणपत्राच्या उपलब्धीमुळे त्यांना शासकीय योजनांचा लाभ घेता येईल. त्यांना सर्व प्रकारचे प्रमाणपत्र मिळवून देण्यासाठी त्यांच्यापर्यत पोहोचून ते उपलब्ध करुन देण्यासाठी प्रशासनाच्यावतीने प्रयत्न करण्यात येत आहेत. आजच्या कार्यक्रमातही महसूल विभागातील अधिकारी-कर्मचाऱ्यांनीही भटक्या विमुक्तांना आवश्यक ते प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही तत्परतेने केली याबाबतही जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी कौतुक केले. तसेच सेवा देताना अधिकारी कर्मचारी यांनी माणुसकी आणि कर्तव्याच्या भावनेतून नागरिकांची प्राध्यान्याने कामे करण्यावर भर द्यावा असेही त्यांनी यावेळी सांगितले.

तसेच भटक्या विमुक्त जातीतील सुशिक्षित तरुणांनी समाजातील इतर लोकांची पुढे आणण्यासाठी पुढाकार घ्यावा असे आवाहन त्यांनी यावेळी केले. यावेळी जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांच्या हस्ते २८ शिधापत्रिका, दोन उत्पनाचे प्रमाणपत्र, दोन जणांना रहीवासी प्रमाणपत्र, ९ जणांना जात प्रमाणपत्राचे प्रातिनिधिक स्वरूपात वाटप करण्यात आहे.

भटक्या विमुक्त जातीतील लोकांना विविध योजनांचा लाभ मिळावा त्यांना समाजाच्या प्रवाहात येता यावे यासाठी विविध प्रमाणपत्र उपलब्ध होण्यासाठी भटके व विमुक्त जाती जमातीचे महाराष्ट्राचे उपाध्यक्ष देविदास हादवे यांनी खूप परिश्रम घेतले. याबाबत प्रशासनाच्यावतीने त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ व तहसिलदार संजय वारकड यांनी मनोगत व्यक्त केली.

## संक्षिप्त वृत्त

### अनिल जोशी हे प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त

**नवीन नांदेड** -श्री गुरुगोविंद सिंघजी अभियांत्रिकी महाविद्यालय विष्णुपुरी येथील प्रयोगशाळा परिचर या पदावरील अनिल दिगंबरराव जोशी हे दिनांक ३१ ऑगस्ट २०२४ रोजी नियतवयोमानाने प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त झाले. विष्णुपुरी येथील श्री गुरुगोविंद सिंघजी अभियांत्रिकी महाविद्यालय येथील प्रयोगशाळा परिचर या पदावर दिनांक २८ मे १९९२ रोजी नियुक्ती झाली होती नियतवयोमानाने दिनांक ३१ ऑगस्ट २०२४ रोजी ३२ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त झाले. सदरील सेवानिवृत्ती बद्दल महाविद्यालयाने सेवापूर्ती गौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते्. त्यांच्या या सेवानिवृत्ती बद्दल महाविद्यालयाचे संचालक डॉ. मनीष कोकरे, महाविद्यालयीन अधिकारी, कर्मचारी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व संघटना यांनी त्यांचे पुढील आयुष्य हे निरोगी व आनंदी राहावेत यासाठी शुभेच्छा दिल्या.



### पिंपळगाव नि. येथील वादग्रस्त मोकळी जागा प्रतिबंधीत क्षेत्र म्हणून घोषीत

**नांदेड** -भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ नुसार जिल्हादंडाधिकारी अभिजीत राऊत यांनी नांदेड तालुक्यातील मौ. पिंपळगाव नि. येथील सदर वादग्रस्त मोकळी जागा २८ ऑगस्ट रोजी २४ वाजेपासून ते ३१ ऑगस्ट २०२४ रोजीच्या २४ वाजेपर्यंत प्रतिबंधीत क्षेत्र म्हणून घोषीत केले आहे.तसेच मौ. पिंपळगाव नि. येथील वादग्रस्त जागेवरुन गावामध्ये कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही याची दक्षता घेण्याचे निर्देशीत पोलीस अधीक्षक नांदेड यांना दिले आहेत. संबंधीतास नोटीस बजावून त्यांचे म्हणणे ऐकून घेण्यास पुरेसा अवधी नसल्याने आणिबाणीचे प्रसंगी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ (२) अन्वये एकतर्फी आदेश २८ ऑगस्ट २०२४ रोजी जिल्हादंडाधिकारी अभिजीत राऊत यांनी निर्गमीत केले आहेत.

### नांदेड जिल्ह्यात ड्रोन कॅमेऱ्यासह मानवनिर्मित वस्तू उडविण्यास प्रतिबंध

**नांदेड** -जिल्ह्यात, शहरात, गुरुद्वारा परिसर व श्री गुरु गोविंदसिंहजी विमानतळाच्या परिसरात २ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजेपासून ते ४ सप्टेंबर २०२४ च्या मध्यरात्रीपर्यत ड्रोन उडवण्यावर बंदी घालण्यात आली आहे.भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ (१) नुसार ड्रोन कॅमेरा, ड्रोन सदृश्य वस्तु व हवेत उडविल्या जाणाऱ्या मानवनिर्मित वस्तू उडविण्यासाठी जिल्हादंडाधिकारी अभिजीत राऊत यांनी प्रतिबंध केले आहे. ४ सप्टेंबर २०२४ रोजी अतिमहत्वाच्या व्यक्ती हे नांदेड जिल्हा येथील कार्यक्रमासाठी येणार आहेत. त्यांच्या सुरक्षेच्यादृष्टिने जिल्हादंडाधिकारी अभिजीत राऊत यांनी याबाबतचा आदेश निर्गमीत केला आहे.

### जिल्हास्तरीय शालेय बॉक्सिंग आणि रायफल शुटिंग स्पर्धेतील खेळाडूंना बक्षीस वितरण

**नांदेड** -क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय नांदेड, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका यांच्या वतीने शालेय जिल्हास्तरीय ग्रामीण व शहरी बॉक्सिंग स्पर्धा आणि रायफल शूटिंग स्पर्धा नुकतीच येथील विक्रांत खेडकर स्पोर्ट्स अकॅडमी उर्वशी घाट, वजिराबाद, नांदेड येथे संपन्न झाली. स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी स्किल डेव्हलपमेंट भारत सरकारचे महाराष्ट्र प्रतिनिधी इंजि. अनिरुद्ध शिरसाट, कल्याणकर कोचिंग क्लासेसचे संचालक डॉ. नागेश कल्याणकर, एमजीएमचे पवार, माजी सैनिक सातपुते, डॉ. रमेश नांदेडकर यांच्या हस्ते श्रीफळ फोडून स्पर्धेची सुरुवात करण्यात आली.नांदेड जिल्ह्यातून व शहरी भागातून फार मोठ्या संख्येने विविध तालुक्यातून व शाळेतून बॉक्सिंग आणि रायफल शुटिंगचे खेळाडू सहभागी झाले होते. बक्षीस वितरण नांदेड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांच्या हस्ते करण्यात आले. प्रारंभी नांदेड जिल्हा हौशी बॉक्सिंग संघटनेचे सचिव आंतरराष्ट्रीय खेळाडू पोलीस कमांडो ट्रेनर विक्रांत खेडकर यांच्या हस्ते प्रमुख पाहुण्यांचा शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. ज्या विद्यार्थ्यांची विभागीय स्पर्धेकरिता निवड झालेली आहे. प्रथम व द्वितीय खेळाडूंना सुवर्ण व रौप्य पदक देऊन जिल्हाधिकारी यांच्या हस्ते व अकॅडमीचे व्यवस्थापक प्रमुख माधवदास स्वामी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.यावेळी बोलताना जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी भारतामधील खेळाबद्दलची माहिती सांगून भविष्यात नांदेडमधून सुद्धा दर्जेदार खेळाडू तयार होण्याच्या अपेक्षा व्यक्त केल्या. त्या दृष्टीने खेळाडूंना मार्गदर्शन केले आणि खेळाचा प्रसार व प्रचाराकरिता सहकार्य करण्याची भावना व्यक्त करत सर्व खेळाडूंचे कौतुक केले. ही स्पर्धा यशस्वी करण्याकरिता क्रीडा अधिकारी शिरशीकर, म.न.पा.चे पुरुषोत्तम, अझर तसेच ज्यांनी ही स्पर्धा अथक परिश्रम करून यशस्वी केली असे पंच व जजेस रेफ्री म्हणून विक्रांत खेडकर, सत्यपाल हनवते, लक्ष्मीकांत हाटकर, नागराज चावरे, अरविंद सावंत, मुंजाजी खराणे, सचिन पंडित, प्रांजल कुलकर्णी, कृष्णा भास्कर, प्रदीप वाघमारे, रुपेश भावरे, पवन धोंडगे, सुमेश, योगेश कटारे, रूपाली ऑस्टुरकर यांनी सहकार्य केले.

### अण्णाभाऊचे क्रांतिकारी विचार आत्मसात करा : विजय रणखांब

**नांदेड** -डॉ.अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य विज्ञानवादी असून ते साहित्य वाचून तरुणांनी अण्णाभाऊंचे क्रांतिकारी विचार आत्मसात केले पाहिजे,आणि शिक्षणाची कास धरली पाहिजे जो शिक्षण घेईल तोच समोर जाणार आहे. आपल्याला शिक्षणा शिवाय तरुणोपाय नाहीच . अण्णाभाऊंनी सांगितले आहे जग बदल घालुनी घाव सांगून गेले मज भीमराव, म्हणून आपण अज्ञानावर, अंधश्रद्धेवर , आळसावर व गुलामगिरी करणाऱ्या विचारावर घाव घातलाच पाहिजे असे मार्गदर्शन लसाकमचे नांदेड जिल्हाध्यक्ष विजय रणखांब यांनी लोहा तालुक्यातील आंबेसांगवी येथे डॉ.अण्णाभाऊ साठे जयंती निमित्त बोलताना व्यक्त केले आहे.

# हदगाव पोलीस प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह

**तभा वृत्तसेवा**
**हदगाव,३० ऑगस्ट -**

हदगाव शहरात झालेल्या घरफोडीच्या घटनेतील चोरट्यांना आतापर्यंत अटक न झाल्याकारणाने त्या चोरट्यांचे मनोबल वाढल्याचे दिसून येत आहेत. पोलीस प्रशासन आपला तपासकाम योग्य दिशेने करत आहेत की नाही याबाबत साशंकता निर्माण होत असून ही घरफोडीची मालिका कधी थांबणार असा प्रश्न हदगावकर उपस्थित करत आहेत. यावेळी वरिष्ठ अधिकारी यांनी एक पथक नेमून तांत्रिकदृष्ट्या या घटनांचा तपास लावून चोरट्यांना जेरबंद करावे अशी ही मागणी होत आहे.

घरफोडीच्या एकूण घटने पैकी तीन घटनेत प्रथमदर्शनी एक बाब साम्य असून चोरट्यांनी ज्यांचे घर कुलूप बंद आहेत त्याच ठिकाणी आपली मोहीम फत्ते केली असून यात स्थानिकांचा सहभागाशिवाय हे शक्यच नसल्याचे सुद्धा यावेळी बोलले जात असून रात्रीच्या वेळेस गस्त घालण्याची प्रक्रिया अत्यंत चोखपणे पार पडण्यात यावी अशी मागणी होत आहे. गस्त घालत असलेल्या कर्मचाऱ्यांपैकी काही कर्मचारी हे मद्यप्रशान करून असतात असा आरोप फिर्यादी मधून होत आहे. हदगाव शहरात सुरक्षेच्या दृष्टिकोनातून काही वर्षांपूर्वी लोकसहभागातून शहरातील महत्त्वाच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले होते. त्यानंतर काही महिन्यांनी त्या कॅमेराकडे दुर्लक्ष झाले. त्यामुळे या कॅमेरापैकी काही बंद अवस्थेत आहेत तर काही कॅमेऱ्यांची अज्ञात व्यक्तींनी मोडतोड करून त्या कॅमेरेचे तोंड खाली रोडवर करण्यात आले होते. हे कॅमेरे शासनाने व्यवस्थित रित्या चालू करावे अशी ही मागणी नागरिकांकडून होत आहे जेणेकरून भविष्यात होणाऱ्या अप्रिय घटना टाळता सुद्धा येतील व पोलीस प्रशासनाच्या तपास कमी याचा फायदा होऊन चोरटे ,समाजकंटक, भांडखोर व्यक्ती ,अवैधरित्या वाहनांद्वारे होणारे वाहतूक करणाऱ्यांवरती आळा बसेल असे मत नागरीक व्यक्त करीत आहेत.

# लेकीच्या वाढदिवसानिमित्त वडिलांचे रक्तदान..! राम गाढे पाटील यांनी पुरविला लेकीचा बालहट्ट...

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,३० ऑगस्ट -**

येथील आनंदनगर भागातील फायनान्शियल डव्हायझर राम गाढे पाटील यांनी त्यांच्या सहा वर्षीय कन्येच्या वाढदिवसानिमित्ताने लेकीच्या बालहट्टा खातीर रक्तदान करून वाढदिवस साजरा केला.

याविषयी सविस्तर वृत्त असे की राम गाढे पाटील यांची कन्या अयोध्या हिचा २७ ऑगस्ट रोजी वाढदिवस होता त्या वाढदिवसानिमित्त कुमारी आयोध्या हिने वडिलांकडे इच्छा व्यक्त केली ती म्हणजे ती म्हणाली की,पप्पा तुम्ही पण माझ्या बर्थडेला ला रक्तदान करा ना,लोकं कसे राजकारणी लोकांच्या बर्थडे ला ला रक्तदान करतात. तिच्या या बाल मनाच्या इच्छे खातीर वडिलांनी मुलगी अयोध्या च्या जन्मदिवशी जिजाऊ ब्लड बँक शिवाजीनगर येथे स्वतः आपल्या कन्या समवेत जाऊन रक्तदान करून समाजापुढे एक नवा पांयडा प्रस्थापित केला आहे



**मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांनीही केले होते अयोध्या हिचे कौतुक ...!**

मनोज जरांगे पाटील यांच्या जूलै महिन्यातील नांदेड दौऱ्या दरम्यान कू. आयोध्या हिने मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या जीवनावर कविता सादर करून अनेक उपस्थितांची मन जिंकली होती तिच्या या कवितेबद्दल मनोज जरांगे पाटील यांनी तिची जवळ घेऊन स्तुती केली होती व व या चिमुकलेच्या हुशारीचे तोंडभरून कौतुक केलं होतं.

# प्रफुल्लनगर येथे साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जयंती उत्साहात साजरी



**तभा वृत्तसेवा**
**भोकर,३० ऑगस्ट -**

साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची जयंती दि.२९ ऑगस्ट २०२४ गुरुवारी मोठ्या थाटामाटात ढोल ताशाच्या गजरात तैलचित्राची मिरवणूक काढून आण्णाभाऊ साठे यांच्या गाण्यावर ठेका धरून नव तरुणांनी उत्साहात व शांततेत जयंती साजरी करण्यात आली. प्रफूल्लनगर जयंती मंडळाकडून उत्कृष्ट नियोजन केले,प्रथम सत्रात प्रफुल्ल नगर येथील अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याच्या नियोजित जागेवर बहुजन नेते नागनाथराव घिसेवाड यांच्या हस्ते ध्वजारोहन करण्यात आले. दूपारी भोकर ग्रामीण रुग्णालयातील रुग्णांना अमोल बसवंते मित्रमंडळाकडून फळे वाटप करण्यात आले.यावेळी ओबीसीचे नागोराव शेंडगे बापू व युवा नेते शेख यूसुफ भाई गोटू क्षीरसागर घीसेवाड मित्र मंडळाचे निखिल हंकारे पत्रकार सिद्धार्थ जाधव उत्तम कसबे सुभाष नाईक संदीप नरवाडे रमेश गुंडेकर संदिप नरवाडे संदेश पोतरे साईनाथ बसवंते संभाजी बरगेवाड माधव यनूरवाड शूभम तेलंग नागेश मूळेकर गणेश पवळे साहेबराव वाहूळकर अर्जून जिनेवाड खंडू जिनेवाड अमोल सूर्यवंशी गंगा बसवंते अंकूश चव्हाण बालाजी बरगेवाड मूखीद शेख श्रीकांत नागठाणे आदी नवयुवक व महिला जयंती सोहळ्यात मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. यावेळी बहुजन नेते नागनाथराव घिसेवाड यांनी आण्णाभाऊ साठे यांच्या जीवनावर प्रकाश टाकला व नागोराव बापू शेंडगे यांनी सुद्धा अण्णाभाऊनी जग बदल घालुनी घाव सांगून गेले मज भीमराव असे संदेश दिला त्यांची फकीरा ही कादंबरी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना अर्पण केली अण्णाभाऊ साठे यांचे परिवर्तनवादी विचार लहु फुले शाहू आंबेडकर या महापुरुषांच्या विचारांची कास धरून आपण आपले जीवन अंगीकृत केले पाहिजे व त्यांच्या विचाराचे अनुकरण करून आपल्या जीवनात अमुलाग्र बदल घडवून समाज परिवर्तन केले पाहिजे असे ते यावेळी म्हणाले.

# सिडकोत अण्णाभाऊ साठे सार्वजनिक जयंती मंडळाच्या वतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड,३० ऑगस्ट -**

साहित्यरत्न, लोकशाहीर, डॉ. अण्णा भाऊ साठे सार्वजनिक जयंती मंडळाच्या वतीने अण्णाभाऊ साठे सभागृह सिडको येथे दोन दिवसीय विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास दिग्गज आजी-माजी राजकीय व सामाजिक पदाधिकारी यांची उपस्थिती लाभणार असून प्रबोधनपर गीतांचा कार्यक्रम सुकमलाताई वाघमारे व संच आणि शाहिरी जलसा शाहीर गौतम पवार व संच यांचे सादरीकरण होणार आहे.

लोकशाहीर आण्णाभाऊ साठे सार्वजनिक जयंती मंडळ २०२४ च्या वतीने सिडको येथील अण्णाभाऊ साठे सभागृह येथे दिनांक ३१ ऑगस्ट रोजी सकाळी ९ वाजता धम्म ध्वजारोहण माजी नगरसेविका सौ. बेबीताई जनार्धन गुपीले यांच्या हस्ते होईल. त्यानंतर १० वाजता रक्तदान शिबिर तर सायंकाळी ५ वाजता प्रबोधन सभा होईल. त्या सभेचे उद्घाटक आनंदराव पाटील बोंडारकर जिल्हाप्रमुख शिवसेना शिंदे गट नांदेड दक्षिण यांच्या हस्ते होईल. यावेळी प्रमुख



उपस्थिती मा.खा. प्रतापराव पाटील चिखलीकर, मा.खा. हेमंत पाटील यांची असेल तर या सभेचे अध्यक्ष चंद्रकांत मेकाले, प्रमुख वक्ते माजी प्रा. दयाराम मस्के यांचे मार्गदर्शन होईल. तसेच दुपारी ३ वाजता प्रबोधन गीतांचा कार्यक्रम सुकमलाताई वाघमारे आणि संचाच्या वतीने होईल. दिनांक १ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता मिरवणूक डॉ. अण्णा भाऊ साठे पुतळ्यापासून सिडको हडकोतील मुख्य रस्त्याने संभाजी चौक मार्गे अण्णाभाऊ साठे पुतळा येथे मिरवणूकीचा समारोप होईल. त्यानंतर लागलीच ४ वाजता शाहिरी जलसा शाहीर गौतम पवार आणि त्यांचा संच सादर करतील. त्यानंतर प्रबोधन सभा सायंकाळी ६ वाजता होईल या सभेचे उद्घाटन आ. मोहनराव हंबर्डे यांच्या हस्ते होईल. विशेष सत्कार मा.ना. कमलकिशोर कदम यांचा होईल यावेळी प्रमुख उपस्थिती आ. जितेश अंतापुरकर, सामाजिक कार्यकर्त्या आशाताई शिंदे, विनय पाटील गिरडे यांची राहील. या कार्यक्रमाचे अध्यक्ष माधवराव डोम्पले हे राहातील तर याकार्यक्रमाचे वक्ते गुणवंत काळे यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. त्यानंतर शाहिरी जलस सायंकाळी ४ वाजता शाहीर गौतम पवार व संच यांचे सादरीकरण आपणास ऐकावयास मिळणार असल्याची माहिती अण्णाभाऊ साठे सार्वजनिक जयंती मंडळाचे अध्यक्ष सचिन वाघमारे व कार्याध्यक्ष पप्पू गायकवाड यांनी दिली. सदरील जयंती मंडळाचे कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी सुरेश कांबळे, आनंदा वाघमारे, पप्पू कांबळे, ईरवंत सूर्यकर, दशरथ कंधारे, अंबादास मेकाले, निवृत्ती गायकवाड, राजेश गायकवाड, बालाजी वाघमारे, सचिन मांजरमकर, संजय गायकवाड, स्वप्निल गव्हाणे, प्रा. बालाजी गवाले, नवनाथ कांबळे हे जयंती मंडळ संयोजन समिती परिश्रम घेत आहेत.

# लोहा नगर परिषद पथ विक्रेता समिती बिनविरोध

**तभा वृत्तसेवा**
**लोहा ,३० ऑगस्ट -**

दीनदयाळ अंतोदय योजना राष्ट्रीय उपजिविका अभियान अंतर्गत लोहा नगर परिषद पथ विक्रेता सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम घेण्यात आला. एकूण आठ जागांपैकी सहा जागा बिनविरोध निवडण्यात आल्या तर दोन जागा रिक्त राहिल्या. निवड झालेल्या उमेदवारांना सहाय्यक निवडणूक अधिकारी तथा न. प. चे कार्यालयीन अधीक्षक उल्हास राठोड यांच्या हस्ते प्रमाणपत्र वितरित करण्यात आले.



महाराष्ट्र उपजिविका संरक्षण समिती अर्थात लोहा नगर परिषद पथ विक्रेता समितीच्या पाच वर्षांच्या कालावधीसाठी आठ जागे करिता नुकतीच निवड प्रक्रिया पार पडली. दि. १६ ऑगस्ट रोजी नामांकन दाखल करण्याच्या अखेरच्या दिवशी आठ पैकी सहा नामांकन अर्ज निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना प्राप्त झाले तर नामांकन अर्ज दाखल केले नसल्यामुळे दोन जागा रिक्त रहिल्या. निवड घोषणा होण्यापूर्वीच सर्व सहा उमेदवार बिनविरोध ठरले होते. सदरील निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून प्रभारी मुख्याधिकारी तथा तहसीलदार विठ्ठल परळीकर यांनी काम पाहिले तर सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून न. प. चे कार्यालयीन अधीक्षक उल्हास राठोड यांनी काम पाहिले. दि. ३० रोजी शुक्रवारी दुपारी नगर परिषद कार्यालयात आयोजित कार्यक्रमात सहाय्यक निवडणूक अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक उल्हास राठोड यांच्या हस्ते निर्वाचित उमेदवार दत्तात्रय कांबळे (अनुसूचित जाती), सय्यद सिकंदर (सर्वसाधारण), सोहेल मुस्तफा (सर्वसाधारण), सुमनबाई संगेवार (विकलांग महिला), युनूस नजीर शेख (इमाव), लक्ष्मीबाई नागेश्वर (सर्वसाधारण महिला) आदींना प्रमाणपत्र वितरित करण्यात आले. यावेळी पालिकेच्या सहाय्यक प्रकल्प अधिकारी मंजुषा जाधव यांनी यांची उपस्थिती होती.

लोहा नगर परिषदेचे माजी गटनेते व बांधकाम सभापती करिमभाई शेख यांनी या निवडणुकीत मोलाची भुमिका घेवून या निवडणुकीत पॅनल तयार करुन बिनविरोध कसे काढता येईल या विचाराने सर्वांशी चर्चा केली .पुढील काळात रस्त्यावरील पथ विक्रेतेना शासन स्तरावरुन योजना व आडीआडणी सोडवेल असे उमेदवाराची निवड करायची हा दृष्टिकोनात ठेऊन संघर्ष शहर विकास आघाडी पॅनल तयार केली आणि त्याच्यां नेतृत्वाखाली खेळीमेळीच्या वातावरणात निवडणुका पार पडली या निवडणुकीत करिमभाई शेख यांनी मोलाची भुमिका बजावली त्यामुळे या निवडणुकीत यश मिळावता आले.यावेळी काँग्रेस तालुका अध्यक्ष व उपानगराध्यक्ष शरद पाटील पवार,खा.प्रताप पाटील यांचे खंदे समर्थक माजी उपनगराध्यक्ष दत्ता वाले, रिपाईचे तालुका अध्यक्ष सुरेश महाबळे,खरेदी विक्री संघाचे संचालक भिमराव पाटील शिंदे,माजी नगरसेवक नबी शेख, माजी नगरसेवक केतन खिलारे,आंबेडकर चळवळीचे जेष्ठ नागरिक गंगाधर महाबळे यांनी बिनविरोध पॅनल शुभेच्छा दिल्या बिनविरोध सदश्यने आभार मानले.